REGISTERED No. N 4

बाहेरगांवीं टपालहांशिलांसह ........ २ ६
वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ॥ १ ॥
दुसरे खेपेस.... ........॥

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line ,, 2as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 2 MAY 1904 NO 17

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २ माहे मे सन १९०४ इ० अंक १७

*FORM No. 143*
Class No. XIX

Under Section 69 act V of 1881 Mis: Civil Suit No 4 of 1904.

In the Court of the Deputy Commissioner Amraoti District.

*APPLICANT*

R. H. Menasse Railway Guard now living at Budnera.

The applicant having applied to this court for the grant of a probate of the estate of the deceased Annie Emily Maria Menasse spinster of Amraoti Camp. All persons claiming to have any interest in the estate of the deceased to come and see the proceedings before the grant of the probate on the 18th day of June 1904 at 11 O'clock in this camp at Amraoti.

*Dated Amraoti the 19th April 1904* H. GODWIN AUSTEN District Judge *Amraoti.*

---

## बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा ! किंमत पाऊण आणा प्रती बेताच्याच आहेत.

इन्फंट क्लासांतील मुलांस मुळाक्षरांची व दहा अंकाची माहिती लौकर व उत्तम करून देणारें सोपें साधन (१० शेवडे, जोगदंड, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळीचे अभिप्राय. पुस्तकें मेलद्वारे मिळतील. मेचे आंत एक रुपयाची घेणारांस टपाल खर्च माफ.

पत्ता— नारायण रामचंद्र नागलकर शेगांव जि० आकोला ( वऱ्हाड )

---

किरकोळ दि० मु० नंबर $\frac{१}{१९०४}$

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे आकोले.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं नारायण शामराव जोशी राहणार पातुर्डे तालुके जळगांव जिल्हे आकोलें याची वऱ्हाडांत सोबत यादी दिली आहे त्या बद्दलचें प्रोबेट सर्टिफिकीट मिळण्या करितां सखाराम गोपाळ ब्राह्मण राहणार पातुर्डे तालुके जळगांव यानें त्याजवर मयतानें जे ता० १७।७।०२ इ० रोजीं करून दिल्याचे मृत्यु पत्रावरून आमचेकडेस अर्ज दिला आहे तो किरकोळ दि० मु० नंबर $\frac{१}{१९०४}$ चा फैल होऊन त्याची चौकशीची तारीख २६।५।१९०४ इ० रोजीं नेमली आहे तरी सदहू नारायण शामराव जोशी याचें सोबत असलेल्या यादीत नमूद केले त्या जिन्नगीवर ज्या ज्या लोकांचा हक्क संबंध असेल त्यांनीं आपले हक्क संबंध दाखविण्या करितां सदहू तारीख २६।५।०४ इ० रोजीं दिवसा दहा वाजतां आमचे कचेरींत अकोलें येथें हजर होऊन दाखवावेत. तसे न केल्यास त्या पुढें कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें. ता० २१ माहे एप्रिल सन १९०४ इ०

R. P. COLOMB
डेपुटी कमिशनर साहेब
जिल्हे अकोलें.

## वऱ्हाडांतील जंगम स्थावर मालाची यादी.

९०० कसबे खामगांव ता० खामगांव येथील जव्हाल पुऱ्यांतील घरें ४ वोडनाटीची अजमासें रुपये ९००

१२५ कसबे खामगांवता० खामगांव येथील जव्हाल पुऱ्यांत वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी शेअर पांच आहेत त्याची किंमत १२५ रुपये

१२५ आकोला येथील वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी लिमिटेड शेअर पांच आहेत याची किंमत रुपये १२५

३६५ किसनलाल रुपचंद अगरवाले राहणार पातुर्डे साळबंदीचा दस्तऐवज आहे.

५५० सालरबेग वलद इमामबेग राहणार पातुर्डे याचा सालबंदीचा दस्तऐवज आहे.

३७५ रावजी वल्लद रामजी झाडोकार राहणार पातुर्डा खुर्द हुकूमनामा तेल्हारें कोर्टांत झाला आहे.

६६ तुकाराम भगवान झाडोकार खुर्द गाऊत गाहाणखत आहे. दस्तऐवज फिर्यादींत दाखल केला आहे.

४६ मारुती वल्लद कृष्णा सुतार राहणार पातुर्डे तुर्त गाहाणखताचा दस्तऐवज फिर्यादींत दाखल केला आहे.

१४९ लहू वल्लद निंब्या महार राहणार कं.द्री खुर्द हुकूमनामा आहे.

६६ पुतळ्याची माळ पुतळ्या १५ अजमास तोळे ८३ किंमत ६६

१२ वजरटीक वजन मासे ८८६ अजमास रुपये १२

३६ सोन्याची मुद्री वजन तोळे ८१॥ अजमास किंमत ३६

४५ मोत्याची नथ किंमत अजमासे ४५रु.

६० चांदीच्या साखळ्या भार ८० किंमत ६० रुपये

११ बाळ रुपयान वजन १० भार किंमत ९ रुपये व जोडवे वजन भार १२ किंमत ६ रुपये

५५ तांब्याची भांडीं अजमास ३० रुपये व पितळीचीं भांडीं अजमास २५ रु.

---

## नोटीस

मंजाई मर्द तुकाराम कुणबीन राहणार मौजे वरुड पोस्ट— तेल्हारा तालुके आकोट यांस:—

सोनाई मर्द करणाजी तर्फे मुखत्यार रामजी विठोबा फेळीवेळी तालुके आकोट याजकडून

तुजपासून कर्जाऊ घेतले रुपये ४०० चारशे याचे बद्दल खुद्द माझे मालकीची जमीन मौजे मनवद तालुके आकोट येथील ३ शेतें तारणगहाणखत तुम्ही लिहून घेतल. याचे बद्दल मी तुमचे व्याजासमेत मुद्दल रुपये समेत सर्व एकंदर रकम रुपये तुमचे देण्यास आलों तर तुम्ही घेत नाहीं व मी तर रकम रुपये व्याजानी लोकाची आणिली आहे तर तुम्हास या नोटिसीनें कळवितो कीं एक तर रुपये नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत घ्यावे आणि दस्तऐवज परत द्यावे आपले रकमेचे व्याज तारीख ७।४।०४ पासून बंद असे. आता जर तुम्ही पुढें दिवाणी कोर्टांत दावा केला तर सर्व खर्च तुम्हावर बसेल. आम्ही तुमचे रुपये देण्यास तयार असतां घेतले नाहीं दुसरे आमचे शेतांची लागवण ज्यास्ती रकमेस लोक घेत असून तुम्ही कमी किंमतीस करितां व तुमचे मनांत आमची शेती पचविण्याचे दिसत आहे सबब या नोटिसीचे बद्दल विचार करून लेखी जबाब द्यावा. नाहीं तर आम्ही आमच्या जमीनीची वाही पेरे करूं. या प्रमाणें कळावें. तारीख २७।४।१९०४ इसवी.

सही
सोनाई मर्द करणाजी तर्फे मुखत्यार रामजी विठोबा दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

चिरंजीव राजश्री गोविंद त्रिंबक देशपांडे मुक्काम तांदळी खुर्द तालुके बाळापुर यांस:—

कळविले जाते कीं तुम्ही कोमीराम मारवाडी तांदळी बुद्रुककर याचे घरीं तुम्ही आपले नांवची १५ दिवसाचे करारानी चिठ्ठी देऊन माझे घरचे डागीनें नेऊन गाहाण ठेविले असून आज पावेतो सोडले नाहींत सबब मी त्याचे घरीं जाऊन तसेच बद्दल रकम रुपये १९८ एकशे अठ्याण्णव देऊन डागीनें सोडवून आणले आहेत म्हणून तुम्हास कळविले आहे सदहू रुपये तुम्ही आठ दिवसांत आणून द्यावेत न दिल्यास पुढील मालचे तारीख हिशानें व्याजासह रकम घेऊन दरशेकडा दोन रुपये प्रमाणें व्याजासुद्धां रकम काढली जाईल. नोटिसीचा खर्च तुमचे वर असे. कळावें, तारीख २८-४-१९०४ इसवी.

सही
नारायण त्रिंबक देशपांडे तांदळी खुर्द दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

बेशमी अंबरबाई जवंज कुंदलमल मारवाडी राहणार दर्यापूर बाजार ओळइमलः—

खालीं सही करणार याजकडून सविनय या नोटिसीनें कळविलें जातें कीं मी व माझा धाकटा बंधु हरकचंद असे आम्हा उभयताचे मालकीचे शेती जमीन अजमासे बत्तीस तिफणीची तुमचे नेमधर्म, लग्न, लागेपागे, व वस्त्रावर्णे करितां तुमचे तब्यांत राहणे विषयीं दिली होती याचे उत्पन्नातून तुम्ही दरसाल कसा व किती खर्च करितां याचा आजपर्यंतचा जमाखर्च पाहणें आहे तर ही नोटीस पावतांच ८ दिवसाचे आंत खालीं लिहिलेले पंच म्हणजे:—

मि. आत्माराम पंत घैद्रे वकील
मि. नागोराव शंकरराव देशमुख
मि. दवलतसिंग नारायणसिंग जमादार
मि. यादोबा दिवाणजी
मि. गणेशराम मानकचंद चौबी

यांचे समोर दाखवावा या शिवाय तुमचे पाशी सोन्याचे डागिने नग ८ आठ पंचा समक्ष सामाईकांतील ठेविले आहेत ते अफरा तफर न करितां योग्य रितीनें ठेवावे या प्रमाणें तुमचे कडून न झाल्यास तिमे जमीन मी आपली मी आपले ताब्यांत पंचाकडून घेईन मग तुमची तक्रार ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली तारीख २८ माहे एप्रिल सन १९०४ इसवी०

सही
तनसुखदास कुंदलमल मारवाडी दुकान दर्यापूर दस्तुर खुद.
दस्तुर— भगवंत रावजी उमदवार

---

## नोटीस

बेशमी सूर्यभान वल्लद सोनाजी होळे राहणार एकरी तालुके दर्यापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे एरेरी येथील सर्वे नंबर २६७ पैकीं हे शेत माळीम व सर्वे नंबर १८५ यांतील आठ आण्यांचे हिश्शांचीं जमीन मजपासून रुपये ७०० देण्याचे कबूल करून सात आणलेले उभे पीकासह जमीन माझे कबज्यांत दिल्ही व इसाराबद्दल

रुपये ११ घेतले. नंतर दर्यापूर येथें येऊन तुह्मी खरेदीचा दस्तऐवज लिहिला व नोंदण्यास दाखल केला. नंतर मजला समजलें कीं सर्व्हे नंबर १८९ यातील आठ आण्याचा हिस्सा लिहिण्याचे ऐवजी तुह्मी च्यार आण्याचा हिस्सा लिहिला. वरून मी तुह्मास नोंदणार अंमलदारा समक्ष रुपये दिले नाहींत. जमीन माझे ताब्यांत असतां तुह्मी जबरीनें सर्व्हे नंबर २६७ पैकीं यातील गहू, अजमासें खंडी ८ किंमत रुपये २०० व कुटार अजमासे रुपये २९ असे रुपये २२९ चा माल घेऊन गेले. सबब नोटीसीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत राहिलेले रुपये ४७९ मजपासून घेऊन एक शेत सालीम व एक शेतातील आठ आण्याचे हिशा बद्दल खरेदीखत लिहून नोंदुन द्यावे. तसे न केल्यास जमीनीचा कबजा मी आपले कडेस कायम ठेऊन दस्तऐवज करून घेणे संबंधानी जसी सला मिळेल त्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २८ एप्रिल सन १९०४ इ. या नोटीसीचा खर्च तुमचेवर बसेल. कळावें.

सही.

सरावण वाा इक्कमजी सपेरे कोळी याची निशानी.

शामराव वाा गोविंदा सपेरे कोळी याची निशानी.

---

## नोटीस

बेशमी गोपाळ कृष्णाजी अज्ञान पालन करणार चुलता हरी वल्लद रामाजी मोरखडे राहणार मोरझाडी तालुका बाळापूर पोस्ट—शेगांव यांस—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिरखबरीनें कळविण्यांत येते कीं तुमच्या विश्वासावर व सचोटीवर मी तुह्माला २५० रुपयांचा गहाणाचा दस्तऐवज तारीख २४ मार्च १९०४ रोजीं करून दिला आणि तुमच्या ह्मणण्या प्रमाणें भरणा कबूल करून नोंदून आणून तुमच्या हवाली केला तेव्हां तुह्मी रोख ३० रुपये दिले व बाकीचे रुपये आज उद्यां देतो असें ह्मणून तुह्मी मला चाळवीत आला. तुमची नीती लबाडीची दिसते. मी ज्या कामाकरितां कर्ज काढलें तें माझें कामही तुमच्या लबाडीमुळें बिघडलें. गहाणाचा रोखा पोकळ आहे. माझ्या इस्टेटीवर त्याचा बोजा बसणार नाहीं. तुह्मी बाकीचे २२० रुपये देऊन टाकावे. तसें करण्यास दोन दिवसांची मुदत देत आहे. नोटीस पोचल्या नंतर वरील मुदतींत न केल्यास तुह्मावर फौजदारींत फिर्याद करीन आणि गहाणाचा कागद रद्द करण्याचीही तजवीज करीन या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. कळावें. तारीख १ मे १९०४ इसवी.

सही

अंबादास जैकृष्ण कुळकर्णी मौजे उरळ बुजरुक दस्तुर खुद्द. पोस्ट— शेगांव

---

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ३ शके १८२६

## नको तो फेरफार

मध्यप्रांताची व्यवस्था हळूंहळूं आमच्या प्रांताला सुरूं होत आहे. त्यांतल्या त्यांत शाळाखात्याची व्यवस्था मध्यप्रांताच्या रहाटी प्रमाणें इकडे विशेष जोरानें अंमलांत येत आहे. इतर खात्यामधून इतकी जलद दवळादवळ सुरूं झाल्याचें दिसत नाहीं. आमच्या शाळाखात्याचा मुंबई कडील शिक्षणाशीं असलेला संबंध तुटल्यामुळें पुष्कळच फेरफार होण्याचें घाटत आहे. मुंबई युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम काढून अलाहाबाद युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम सुरूं करण्या विषयीं हुकूम सुटले आहेत आणि त्याप्रमाणें पुढील वर्षापासून सर्व गोष्टी अमलांत येतील असा रंग दिसतो. परीक्षांच्या वार्षिक वेळांहि नवीन धोरणाप्रमाणें बदलण्यांत येतील. अभ्यासक्रमांतील फेरफार आमच्या प्रांताला उन्नतीकारक नसून इकडील लोकांच्या दळणवळणाचा प्रघात सुद्धां बदलण्यांत येईल. मुंबई पुण्याकडील दळणवळण आपोआपच कमी कमी होऊन आतां अलाहाबाद युनिव्हर्सिटीशीं मिळणाऱ्या अशाच गोष्टी प्रचारांत येऊं लागतील. महाराष्ट्राशीं संबंध असल्या मुळें जें मराठी भाषेचें सौंदर्य या प्रांतांत विद्यमान आहे तें या पुढें कायम राहील असें आह्मांस वाटत नाहीं. आमच्या प्रांतांतील मराठी भाषेंत पुष्कळच भेसळ होण्याचा संभव आहे आणि या दृष्टीनें हा नवीन घडलेला संबंध आह्मांस हितकर वाटत नाहीं. अलाहाबाद युनिव्हर्सिटीपेक्षां मुंबई युनिव्हर्सिटीची प्रगती अधीक बलवत्तर आहे आणि अशा उच्चतर विद्याशक्तीचा संनिकर्ष आह्मापासून दूरावेल ही गोष्ट अगदीं वाईट होय. डाक्टर सिंक्लेर साहेबांनीं या प्रांतांतील विद्याखात्याची उभारणी मुंबई इलाख्यांतील पद्धतीप्रमाणें केली या गोष्टीस आज अर्ध्या शतकाचा काल होत आला आहे. इतक्या वर्षांचें दळणवळण आतां मोडूं पहात आहे ह्मणून साहजिकच वाईट वाटतें. या प्रांतांतील मुख्य शिक्षक वर्गही मुंबई इलाख्यांतील सुशिक्षित मंडळींतूनच घेतलेला आहे. कदाचित या पुढें तिकडचे शिक्षकहि इकडे येण्याचा संभव कमी कमी होत जाईल. हीं देखील गोष्ट पुष्कळ दिवसांच्या अनुभवाला आवडणारी नाहीं.

वर निर्दिष्ट केलेल्या फेरफाराला बरें वाईटपणा देण्यापासूनहि आतां कांहीं लभ्यांश नाहीं. प्रस्तुत जी क्रांती डोळ्यापुढें उभी आहे तिचा स्वीकार करण्यालाच आपण शिकलें पाहिजे. नवीन स्थित्यंतरहि कदाचित अधिक सुखावह होईल पण मागील आठवणीमुळें ही नवीन स्थिती स्वीकारण्याकडे मनाची प्रवृत्ती वळत नाहीं हें सांगण्या पलीकडे आमच्या वरील विधानाचा दुसरा कोणताच भावार्थ नाहीं. पण ज्या अर्थी मुंबई इलाख्याचा पूर्व संबंध तुटला जात आहे त्या अर्थी त्या संबंधाच्या संकलित सौख्यराशी पुनः पुन्हां स्मरण देतात आणि ह्मणूनच त्यांचा पुनः पुनः उल्लेख केल्यापासून मनाला एका प्रकारें काल्पनिक ऋणापासून मुक्त झाल्या सारखें वाटतें. हा फेरफार सांगण्याचा दूसरा हेतु असा आहे कीं, मुंबई युनिव्हर्सिटीच्या उच्च संस्कारामुळेंच आमच्या विद्याखात्याचें पाऊल विशेष पुढें आहे. ही आमची प्रौढी आमच्या विद्याखात्यानें विसरतां कामा नये आणि या गर्वोक्तीला शोभेल अशा रीतीनें अलाहाबाद युनिव्हर्सिटीला चलन देण्याला अंशतः तरी आह्मी कारणीभूत आहों असें आपल्या भावी विद्याप्रसारानें सिद्ध करून दाखविलें पाहिजे. ही फारच मोठी जबाबदारी वऱ्हाडच्या विद्याखात्याच्या शिरावर आली आहे आणि ती तें आतां चांगली संभाळील आणि वेळोवेळ आपल्या पूर्व संबंधाची अलाहाबाद युनिव्हर्सिटीला आठवण देईल अशी आह्मांस बळकट आशा आहे.

---

## स्पृहणीय स्वाभिमान

आज एक वर्ष झालें; लाहोरच्या सरकारी कॉलेजचे प्रिंसिपाल साहेबांच्या मनानें एक विशेष सुधारणा करण्याचें ठरविलें. आपल्या कालेजांतील मुलांचे पेहराव सर्वांचे एकजात सारखे युनिफार्मचे नसतात ही गोष्ट ठीक नाहीं. हें लक्ष्यांत येऊन त्यांनीं एक शार्ट कोटाचा व ट्रौझर्सचा युनिफार्म सर्व मुलांनीं घातला पाहिजे असा एकवट हुकूम सोडला होता. त्या वेळीं मुलांनीं साहेबांस विनंती केली कीं, आपला राष्ट्रीय पेहराव सोडून देऊन दुसरा इंग्रजी पेहराव करण्यास आमचीं वडील माणसें तयार नाहींत तर हा हुकूम रद्द करावा. साहेबांनीं मुलांचें हें रडगाणें ऐकून घेऊन त्या वेळी तो हुकूम बाजूस सारला. पण पुन्हां या वर्षी ह्याच हुकुमाची अमलावारी करण्यासाठीं साहेबांच्या मनानें उचल खाल्ली. अर्थात् पुन्हां पुष्कळ मुलांनीं एकत्र जमून एक विनंती अर्ज साहेबापुढें ठेविला कीं:—

(१) आह्मी पुष्कळजणांनीं परदेशी कपडा न वापरण्या विषयीं आणाशपथा घेतल्या असल्यामुळें इंग्लिश कापडाचे युनिफार्म वापरणें अशक्य होय. आह्मी आपलें वचन भंग करून मानसिक दौर्बल्य प्रकट करावें हें आपणांसहि पसंत पडणार नाहीं.

(२) आह्माला व आमच्या घरच्या माणसास इंग्रजी फॅशनचा हा युनिफार्म बिलकुल आवडत नाहीं. सबब वरील हुकूम मेहेरबानगीनें रद्द व्हावा.

वरील आशयाची छात्र वर्गाची विनंती साहेब बहादुरास कटू वाटली व आपला हुकूम मान्य केलाच पाहिजे असा हुकूम देतांना त्यांनीं सांगितलें कीं:— हा युनिफार्म सर्व मुलांच्या चांगल्या सोईच काढला आहे. ही गोष्ट त्यांच्या आज लक्ष्यांत येत नाहीं तरी ती पुढें त्यास कळून त्याचा अभिमान त्यांस वाटेल. इंग्रजी कपडा न वापरण्याचा कट करणें ह्मणजे राजद्रोहीपणा, अदूरदर्शित्व व अज्ञान होय. असाच कट हिंदुस्थानच्या माला संबंधानें दुसऱ्यांनीं केला तर हिंदुस्थान धुळीस मिळेल.

येणें प्रमाणें प्रिंसिपाल साहेब आपल्या मुलांस आपलें वचन राजनिष्ठेच्या दृढ पायावर आपटून मोडण्यास उपदेशित आहेत. हा उपदेश तीं मुलें कितपत मनांत वागवितील हें निराळें. खरें पाहतां, मुलांस आपलें पवित्र दत्तवचन खोटें करण्यास सांगून आणि अशा रीतीनें आपलीं मुलें परदेशी बनविण्याचा सरकारचा इरादा आहे अशी लोकांच्या मनांत भलतीच शंका व भिती उत्पन्न करण्यास कारणीभूत होऊन तेच स्वतां राजद्रोह करीत आहेत. ह्या मुलांचें वर्तन राजद्रोहीपणाचेंच बिलकुल नसून उलटें स्वदेशाभिमानाचें, व अत्यंत दूरदर्शीपणाचें अतएव ज्ञानीपणाचें द्योतक होय. हिंदुस्थानचा कपडा न वापरण्याचा इतर लोकांनीं कट केला तर इंडिया धुळीस मिळेल ही गोष्ट खरी आहे. पण हिंदुस्थानांत अजिबात कपडाच उत्पन्न न होऊं देणारीं विलायतचीं यंत्रें इंडियास सध्यां कांहीं कमी धुळीस मिळवीत आहेत काय ?

हिंदुस्थानच्या लोकांचा व्यापारधंदा सर्वस्वी बुडाला आहे तो उर्जितावस्थेस आणण्यास अशीच तरुण मंडळी मोठ्या अभिमानानें पुढें सरसावली पाहिजे. इंडियाच्या मनुष्यांनीं ही स्वदेशहिताची गोष्ट मनावर घेतली नाहीं तर दुसरा कोणीहि त्यांच्या बुडित काळीं हात देऊन वर सावरून धरणार नाहीं हें खास. ही गोष्ट अनुभवानें प्रत्येकाच्या चांगली प्रत्ययास आलेली आहे. आपला स्वदेशी कपडाच मी सदोदीत आंथरीन, पांघरीन, देईन, व घेईन असा मनाचा पक्का निर्धार अद्यापहि सर्व लोकांचा झाला नाहीं हें पाहून प्रत्येक राष्ट्रभक्ताचें मन दुःखाविष्ट झाल्याखेरीज राहणार नाहीं. वरील कालेजच्या मुलांनीं जो देशभक्ताचा व करारीपणाचा धडा वाघला आहे तो सर्व मुलांनीं आजन्म विसरतां कामा नये.

वरील मुलांनीं देशी कपडा वापरण्याची जी आणभाक घेतली ह्मणून लिहिलें आहे त्याचे मुळाशीं एक गमतीची गोष्ट आहे. त्याच कॉलेजांतील तत्वज्ञानाचे गुरु आरनोल्ड नांवाचे एक इंग्लिश साहेब होते. एकदां वर्गामध्यें सहज गोष्ट निघाली कीं, स्वदेशीच कपडा वापरायाचा असा ज्याचा निश्चय आहे असे कोण विद्यार्थी आहेत! सर्व क्लासामध्यें एकटाच विद्यार्थी उभा राहिला. हें पाहून साहेबांनीं उद्गार काढले कीं, आपण दोघेच काय ते खरे देशभक्त आहेत. तूं जसा फक्त स्वदेशीच कापड वापरतोस, तसा मीहि स्वदेशी ( अर्थात इंग्रजीच ) कपडा वापरतो. या उत्तेजित संभाषणानें सर्व मुलांस स्वदेशीच कपडा वापरण्याची गोष्ट पुरती पटली व तेव्हांपासून सभा भरवून त्यांनीं स्वदेशी कपडाच घेईन अशा शपथा घेतल्या. जी गोष्ट एका इंग्रजी मनुष्यास मोठ्या स्वदेशप्रीतीची व अभिमानाची वाटली तीच गोष्ट दुसऱ्या साहेबांस राजद्रोहीपणाची दिसावी हें मोठें आश्चर्य होय.

---

## नवीन होमकुंड

पत्रकाराला बातमी मोठी प्रिय असते व

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या शास्त्रीय औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपर्युक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं पुरलेले विकार, मूत्रभं, कोष, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, सूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत राखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—–अलिकडे २।३। वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी



# ORIENTAL

**GOVERNMENT SECURITY**

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the " Oriental " keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the " Oriental " are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life ssurance, is a means by which this danger is got over. Lfe being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the ' Oriental ' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER-SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and, Khandesh*



## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक ⎫ J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ ⎭ एजंट



## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.

जनरल मरचन्टस्

काळबा देवी पोस्ट

मुंबई.



## जाहिरात

## कोडावर खात्रीचें औषध

हटकून गुण फीस २ रुपये.

व्ही. एम. जोशी

पोलिस टाऊन नजीक उमरावती

प्रांत वऱ्हाड.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.



जाचें विसर्जन करितांना समयोचित उत्तेजनपूर्वक असें भाषण केलें. ह्या संस्थेचें चालकत्व मि० व्यास यांचेकडेसच आहे. व त्यांनीं व त्यांचे मित्रांनीं ह्या महोत्सवाचे कामीं बरेच परिश्रम केले हे खामगांवचे लोकांवर त्यांचे असंख्य उपकार होत. अशा आशयाचें भाषण झाल्यावर पानसुपारी, हार तुरे वगैरे जमलेल्या सर्व मंडळीस दिले. आणि पुन्हा एकदां श्रीरामदास स्वामी श्री छत्रपति शिवाजी महाराज व महाराणा श्री प्रतापसिंग ह्यांचा त्रिवार " जयघोष " करून समाजविसर्जन पावला.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**– उन्हाळ्याचें प्रखर स्वरूप वाढत चाललें आहे उष्णतेचें मान ११२ अंशा पर्यंत वाढतें तथापि ते ७५ अंशापर्यंत उतरत असल्यामुळें रात्रींचा काळ सुखावह असतो. रोगराई कांहीं नाहीं.

आकोल्यास नळाच्या पाण्याचा पुरवठा बरा आहे पण तें पाणी सोडण्याच्या वेळा व वाटणी हीं यथायोग्य होत नाहीं ह्मणून म्युनिसिपालिटी या बाबतींत विशेष लक्ष्य पुरवील असें आह्मी इच्छितों.

**यज्ञपर्वणी**– सध्यां वऱ्हाडांत यज्ञाची पर्वणी आली आहे. नुकताच उमरावतीचा यज्ञसमारंभ समाप्त झाला तोंच आतां वाशिमासहि एक यज्ञ येत्या आठवड्यांत सुरू होणार आहे. ह्या यज्ञास वे. शा. सं. रा. रा. गोविंदभट मामू अग्निहोत्री हे येत्या वैशाख वद्य ९ ला आरंभ करणार आहेत. पूर्णाहूति अमावास्येच्या दिवशीं होणार असून दुसरे दिवशीं ह्मणजे सोमवारीं अवभृत स्नानाचा समारंभ होणार आहे. या यज्ञाला लोकाश्रय मोठा असून आज पर्यंत झालेल्या यज्ञापेक्षांहि हा समारंभ अधिक उत्तम होईल असा अंदाजा आहे.

**अभिनंदन**– मध्यप्रांताचे डायरेक्टर साहेब रा. मनरो हे पेनशन घेऊन विलायतेला गेल्या शनिवारच्या आगबोटीनें गेले असल्यामुळें त्यांच्या जागीं नवीन डायरेक्टर येई पर्यंत रा. रा. कँडी साहेब इन्स्पेक्टर आफ् स्कूल्स वऱ्हाड यांस आफिशिएटिंग डायरेक्टर नेमण्यांत आलें. साहेब बहादुरांचा हा झालेला बहुमान चांगला गौरव करण्यासारखा होय.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ५०–५२ | कवस ७२ |
| गहू काठे ८५ | बनशी ९५ |
| सरकी | ५॥ |
| मीठ | ३। रु. मण |
| चणे | २॥। रु. मण |
| तूप | ९॥ रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |
| रुई जीन | ८२ |
| कापूस | ५७ |

## वर्तमानसार

ती बरी असो किंवा वाईट असो ती छापण्या साठीं त्याचा उतावळेपणा व अधीर वृत्ती केवढी असतें हें तज्ञ लोकांसच चांगलें कळ ण्या सारखें आहे. आमच्या येथील वातावरणांत अनेक लोकवार्ता गुणगुणत असतात, त्या पैकीं एका बातमीचा उल्लेख केल्यावांचून गत्यंतर दिसत नाहीं. थोडे दिवसापूर्वी येथील तुरुंगांतील दप्तराला आग लागल्या संबंधानें आह्मी प्रसिद्ध केलें होतें आणि त्या नंतर त्या आगीची सरकारी चौकशी झाली आणि ही आग कांहीं आकास्मिक कारणानें लागली असावी असाहि निर्णय झाल्याचें आह्मी कळविलें होतें. असा निर्णय झाला तेव्हांच लोकांच्या चौकस मनाची शांती झाली अशांतला पर्याय नव्हता तथापि सरकारी चौकशींत अधिक कांहीं निष्पन्न होण्यासारखें नाहीं असें पाहून आह्मीहि स्तब्धतेचा स्वीकार केला. पुढें ही आगीची हकीकत जेव्हां चीफ कमिशनर साहेबापुढें मांडण्यांत आली तेव्हां त्यांनीं झालेल्या चौकशी संबंधानें रुष्टता दर्शविली आणि असें प्रसिद्ध केलें कीं ज्या अर्थी ही आग कोणा तरी आगलाव्यानेंच लाविली असावी असा सरकारचा पक्का समज आहे त्या अर्थीं ह्या आगीचा सुगावा लावून देणाराला २०० रुपये बक्षीसहि देण्यांत येतील असें जाहीर करण्यांत आलें. या जाहिरातीची प्रत तुरुगांतील मुख्य मुख्य ठिकाणींहि लावण्यांत आली आणि या आगी संबंधाची चौकशी चांगल्या कसोशीनें करण्या विषयीं हुकूम देण्यांत आले. आतां असें ऐकतों कीं, हें आगीचें प्रकर्ण बरेंच पेटलें असून या मध्यें जेलांतील अंतर्गत पुष्कळच गोष्टींचा स्फोट आपोआप होऊं लागला आहे. आह्मी ऐकतों तें खरें असेल तर फौजदारी खटल्यांचें एक मोठें होमकुंडच तयार होत आहे असें ह्मणतात; अशा वेळीं आमच्या जेलाचे सुपरिंटेंडंट डाक्टर रेली साहेब हे रजेवर थंड हवेच्या ठिकाणीं गेले आहेत व त्यांच्या हाताखालील जेलर रा. रा. गोपाळराव टोकेकर हेहि रजेवर बाहेर गेले आहेत. अशा चौकशीच्या प्रसंगीं ते जरूर हजर असावयास पाहिजे होते. ते गैर हजर असल्यामुळें पुष्कळशा शंका कुशंका निघूं लागल्या आहेत. या उभय अंमलदारांची देखरेख नाहीं ह्मणून कांहीं कैदी नानाविध गोष्टी सांगतात असें लोक बोलतात. या पुढील हकीकत कशी काय होईल याचें अनुमान बांधतां येण्या साठीं आज आह्मी लोकवार्तेतील सारांश ध्वनित केला आहे.

---

## लढाईची धामधूम

प्रत्यक्ष लढाईस तर कोठें ठिकाणाच नाहीं, पण लढाईच्या तयारीच्या धामधुमीचीच गर्दी आहे. जपानी लोकांचा आपल्या देशासाठीं लढण्याचा उत्साह फार विलक्षण व अनिवार आहे. आणि जों जों त्यांची सरशी होत आहे तों तों वीरश्री त्यांच्या अंगी नखशिखांत स्फुरत आहे. लहान मोठ्या वयाच्या आणि गरीब व श्रीमंत वगैरे सर्व दर्ज्यांच्या मुलामाणसांनीं आपणांस लढाईवर पाठविण्या विषयीं अर्जावर अर्ज केले आहेत. स्वदेशावरील आपलें उत्कट प्रेम व्यक्त करण्यासाठींच जणु काय कित्येकांनीं हे अर्ज रक्तानें लिहिले आहेत. ज्यांची नोकरीची मुदत भरून गेलेली आहे असे शिपाई पुन्हां सैन्यांत नोकर होत आहेत आणि लढाईवर जाण्यासाठीं आज नाहीं तरी ५ लाख व्हालंटीअर्स एका पायावर तयार आहेत. जपानी हेर शत्रूकडील वितंबातमी काढण्यासाठीं चोहोंकडे फिरत आहेत. येणें प्रमाणें जपान कडेकोट तयारी करीत आहे. यालू नदीच्या कांठीं जपानी सैन्याची छावणी ३० मैल पसरलेली आहे. जपानी लोकांनीं रशियनास कोरियांतून हाकलून दिलें आहे. विजूचें ठाणें जपाननें घेतलें आहे. जपानच्या एका कामगारानें विश्वासघात केला ह्मणून जपानचे पूर्वीचे लढाईचे बेत बदलले. जेथें जपानी सैन्य जमिनीवर उतरणार होतें तेथें आग लावण्याची तयारी करून ठेविलेली लक्ष्यांत आल्यावरून वरील विश्वासघात बाहेर पडला व अनर्थ टळला.

जपानी लोकां प्रमाणें रशियन लोकांची हि तयारी सुरूच आहे. लढाईसाठीं रशिया ३२० लक्ष पौंड कर्ज काढणार आहे. पाच सहा बुडणाऱ्या आगबोटी गुप्तपणानें बाल्टिक समुद्रांत नवीन बांधीत आहे. तसेंच नऊ जर्मन आगबोटी रशियानें विकत घेतल्या आहेत. रशियन अॅडमिरल अलेक्झिफ यांनें कांहीं बिनसल्यामुळें राजिनामा दिला होता. पण झार साहेबानीं असा उपदेश केला कीं सध्यांच्या आणिबाणीच्या वेळीं आपसांतील मतभेद विसरून एका जुटीनें राहणें हें प्रत्येक रशियनाचें कर्तव्य होय. हा उपदेश सर्व रशियन लोक विशेष लक्षांत घेत आहेत. जपानी सैन्याच्या हालचालीची बातमी समजण्यासाठीं एक जपानी नकाशा रशियानें ४० हजार पौंडास विकत घेतला आहे. इकडे चीनाला धमकावणीही दिली आहे कीं चिनी, लोकांनीं रशियनाशीं प्रेमानें व सख्यत्वानें वागावें. कोणी द्वेष केल्यास त्याजवर बिलकुल दयामाया दाखविली जाणार नाहीं. हार्बिन ( रशियन छावणी ) येथें एक रशियन विलक्षण सामान सुमान घेऊन आला आहे. याजपाशीं पुष्कळ वावड्या आहेत व त्यास एक गाडी जोडली आहे. ह्या वावड्या हवेंत उडवून आपण गाडींत बसून आकाशपंथें सर्व लढाईची टेहाळणी करण्याचा त्याचा इरादा आहे. रशियानें दोन जपानी हेरास पकडून त्यांस तोफेच्या तोंडी दिलें; त्यांनीं जिवें मारूं नये ह्मणून विनंती केली पण त्यांचें ऐकिलें नाहीं.

दोन जपानी लोकांनीं चिनी लोकांचा वेष घेऊन निवच्यांग येथें जनरल क्युरोपाटकीन यांशीं बोलत असतां त्यांचा जीव घेण्याचा बेत होता. पहारेकऱ्यास संशय आल्यावरून त्यांस एकदम पकडलें. दोघांजवळ सुरे होते. सध्यांच्या लढाईचा प्रसंग साधून पोलंडची राजधानी वार्सा येथें रशिया विरुद्ध एक कट झाला होता पण तो उघडकीस आला व त्या बंडखोरांस फांशीवर चढविलें.

अॅडमिरल मेकेराफ हा योद्धा मृत झाल्यामुळें त्याच्या जागीं अॅडमिरल स्क्रिडलॉफ हे नेमिले आहेत. त्यांच्या मतें:—

" जपानी लोक पहिल्या प्रतीचे दर्यावर्दी आहेत; त्यांना भीति कशी ती ठाऊक नाहीं. थक्क करून टाकण्यासारखी कृत्यें करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आहे. मानविषयीं ते फार आधाशी आहेत. ते अत्यंत उद्दाम आहेत. त्यांच्यापाशीं उत्तम आरमार असल्यामुळें, ते योग्य प्रतिस्पर्धी आहेत. परंतु रशियन खलाशाच्या अंगीं जे गुण खिळले आहेत व ज्यांच्या योगानें त्याला कशाची व कोणाचीही भीति वाटत नाहीं, ते गुण त्यांच्या अंगीं नाहींत.

---

खामगांव ता. २९।४।०४

## तालीमखाना.

वऱ्हाडामध्यें मुंबई इलाख्या प्रमाणें तालमींचा शोक कोठेंच दिसून येत नाहीं ही खरोखर मोठीच शोचनीय गोष्ट होय. असो ह्या गोष्टीकडे लोकांचें लक्ष लागावें ह्मणून येथील सभ्य गृहस्थ रा. रा. पृथ्वीराज शिवलाल व्यास यांनीं येथें एक तालीमखाना ता. २२-१०-१९०१ ह्या सालीं स्थापन केला. ह्या तालीमखान्याचें नांव श्री उदेपूरचे अति-पराक्रमी व धीरवीर महाराणे श्रीप्रताप सिंग ह्यांचें स्मारक ह्मणून " श्री प्रताप तालीमखाना " असें ठेविलें आहे. रा. व्यास ह्यांचा हा तालीमखाना स्थापन करण्याचा हेतु असा आहे कीं, अलीकडे सर्वत्र शारीरिक दौर्बल्य दृष्टीस पडतें तें होतां होईल तितकें घालवून लोकांचे अंगी नष्ट झालेला जोम आणावा व त्यांची स्वदेशप्रीति जागृत करावी. वऱ्हाडामध्यें तीन चार तालीमखाने स्थापन झालेले आहेत. पण सर्वांमध्यें हाच तालीमखाना आज पावेतों व्यवस्थित रीतीनें चाललेला आहे.

## शिवजयंती

गेल्या १७ व्या तारखेस ह्या तालीमखान्यांत श्रीशिवजन्मोत्सव करण्यांत आला, त्या वेळीं तालीमखाना फारच सुशोभित केला होता. तालीमखान्याच्या मुख्य दरवाज्यावर रा. रा. नि. रा. पेंटर खामगांव ह्यांनीं आपल्या हस्तकौशल्यानें श्री छत्रपति शिवाजी महाराज ह्यांची भव्य तसबीर [ प्रसिध्द चित्रकार रविवर्मा ह्यांनीं काढलेल्या तसबिरी सारखी ] मोठ्या, जाड, लांब व रुंद अशा पृष्टावर काढून लाविली होती. हा समारंभ तीन दिवस पर्यंत चालला होता. तिन्ही दिवस हा मनोहर देखावा पहाण्याच्या जिज्ञासेनें बराच लोकसमूह जमला होता. पहिले दिवशीं गांवांतील शेटसावकार व इतर सभ्य गृहस्थ यांस या महोत्सवाचे ठिकाणीं हजर राहण्या करितां निमंत्रण पत्रिका पाठविल्या होत्या. प्रथम सकाळीं सुमारें सात वाजतां श्रीरामदासस्वामी, श्री छत्रपती शिवाजी महाराज वगैरे विभूतींची पूजा करून खिरापती वाटल्या व सायंकाळीं सहा सातचे सुमारास मि० व्यास व त्यांचे तालीमखान्यांतील त्यांचे शिष्य मि० त्र्यं. गो. क्षीरसागर या दोघांनीं " शारीरीक शिक्षणाचें महत्व " व अशा उत्सवाची महति " या विषयांवर इंग्रजींत, मराठींत व हिंदींत जोरदार, सुरस व सुश्राव्य अशीं व्याख्यानें दिलीं. व्याख्यानें आटोपल्यावर तालीमखान्यांतील मुलांनीं मल्लखांबा वरील उड्या व कुस्त्या वगैरे मर्दुमकीचे खेळ जनसमुहापुढें करून दाखविले. येथील सभ्यगृहस्थ रा० आणेकर वकील यांनीं या समाजाचें विसर्जन करितांना समयोचित उत्तेजनपूर्वक असें भाषण केलें. ह्या संस्थेचें चालकत्व मि० व्यास यांचेकडेसच आहे. व त्यांनीं व त्यांचे मित्रांनीं ह्या महोत्सवाचे कामीं बरेच परिश्रम केले हे खामगांवचे लोकांवर त्यांचे असंख्य उपकार होत. अशा आशयाचें भाषण झाल्यावर पानसुपारी, हार तुरे वगैरे जमलेल्या सर्व मंडळीस दिले. आणि पुन्हा एकदां श्रीरामदास स्वामी श्री छत्रपति शिवाजी महाराज व महाराणा श्री प्रतापसिंग ह्यांचा त्रिवार " जयघोष " करून समाजविसर्जन पावला.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— उन्हाळ्याचें प्रखर स्वरूप वाढत चाललें आहे उष्णतेचें मान ११२ अंशा पर्यंत वाढतें तथापि ते ७५ अंशापर्यंत उतरत असल्यामुळें रात्रींचा काळ सुखावह असतो. रोगराई कांहीं नाहीं.

आकोल्यास नळाच्या पाण्याचा पुरवठा बरा आहे पण तें पाणी सोडण्याच्या वेळा व वाटणी हीं यथायोग्य होत नाहीं ह्मणून म्युनिसिपालिटी या बाबतींत विशेष लक्ष्य पुरवील असें आह्मी इच्छितों.

**यज्ञपर्वणी**— सध्यां वऱ्हाडांत यज्ञाची पर्वणी आली आहे. नुकताच उमरावतीचा यज्ञसमारंभ समाप्त झाला तोंच आतां वाशिमासहि एक यज्ञ येत्या आठवड्यांत सुरूं होणार आहे. ह्या यज्ञास वे. शा. सं. रा. रा. गोविंदभट मामू अग्निहोत्री हे येत्या वैशाख वद्य ९ ला आरंभ करणार आहेत. पूर्णाहूति अमावास्येच्या दिवशीं होणार असून दुसरे दिवशीं ह्मणजे सोमवारीं अवभृत स्नानाचा समारंभ होणार आहे. या यज्ञाला लोकाश्रय मोठा असून आज पर्यंत झालेल्या यज्ञापेक्षांहि हा समारंभ अधिक उत्तम होईल असा अंदाजा आहे.

**अभिनंदन**— मध्यप्रांताचे डायरेक्टर साहेब रा. मनरो हे पेनशन घेऊन विलायतेला गेल्या शनिवारच्या आगबोटीनें गेले असल्यामुळें त्यांच्या जागीं नवीन डायरेक्टर येई पर्यंत रा. रा. कँडी साहेब इन्स्पेक्टर आफ् स्कूल्स वऱ्हाड यांस आफिशिएटिंग डायरेक्टर नेमण्यांत आलें. साहेब बहादुरांचा हा झालेला बहुमान चांगला गौरव करण्यासारखा होय.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| ज्वारी ५०—५२ | जवस ७९ |
| गहू काठे ८५ | बनशी ९५ |
| सरकी | ५॥ |
| मीठ | ३। रु. मण |
| चणे | २॥। रु. मण |
| तूप | ९॥ रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |
| रुई जीन | ८२ |
| कापूस | ५७ |

---

## वर्तमानसार

**काळ फिरला झणजे सर्वच फिरतें-** इंदूरचें संस्थान झणजे निवळ मराठीशाही होय. आज नाहीं तरी शें दोनशें वर्षे तेथील दरबारदप्तरांची राजभाषा मराठीच होय. मराठी राजधानींत मराठी, भाषेवाच संसारव्यवहार दिसावयाचा. मराठी दरबारची सरस्वती मराठीच भाषा होय. मराठीची सौभाग्यश्री तरी मराठीशाहीच्या नंदनवनांतच नांदणारी आहे. परंतु कांहीं कणाच्या शिरश्रीनें ह्या मराठीश्रीस पदच्युत करून तिच्या जागीं रांगडी भाषा अधिष्ठित करण्याचें सुरुंगतीवर योजिलें आहे. अर्थात ह्या कार्यात मतभेद विघ्न करणार कोण समर्थ आहे ? हें कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल यांत शंका नाहीं. जेथें प्रत्यक्ष राजानेंच सदनुमति सहमी होते तेथें ह्या मराठीश्रीचा कोण त्राता आहे ! काळ फिरला झणजे सर्व फिरतें तें असेंच.

**लिहिणें वाचणें एकदम नको-** लहान मुलांस लिहिणें व वाचणें हें एकदम शिकविण्यापेक्षां त्यांस प्रथम नुसतें घडघड वाचणें शिकवावें. आणि नंतर सावकाश लिहिणें शिकवावें असें केलें असतां वाचन चांगलें व लौकर येऊन लिहिण्याची कला सहाजिकच लवकर साध्य होते. ही अनुभविक गोष्ट मुलांच्या शिक्षकांनीं मुद्दाम ध्यानीं आणावी.

**अंधळ्यांची शिक्षणाची उत्कृष्ट सोय-** अनाथ अंधळ्या मुलांस कांहीं उपयुक्त धंद्याचें शिक्षण देऊन भिक्षेकरांच्या स्थितींतून काढणारी एक शाळा सुमारे सहा वर्षांपूर्वी कलकत्त्यास स्थापन झाली आहे. या शाळेंत अंधळ्या मुलांची राहण्याची, जेवणखाण्याची आणि शिक्षणाची वगैरे सोय अगदीं फुकट करण्यांत येते. ह्या शाळेस दिवरा येथील महाराजांच्या मदतीनें सध्यां एक छापखाना जोडला असून त्यांत अंधळ्यांस वाचतां येण्यासारख्या पद्धतीनें पुस्तकें छापतात. असला छापखाना निदान आपल्या हिंदुस्थानांत तरी हा पहिलाच आहे या शाळेंतील अंध मुलांस लिहिणें, वाचणें, गणित करणें वगैरे विषय शिकवून शिवाय वेताचें काम, सुतारकाम वगैरे धंद्याचें शिक्षण देतात.

चमत्कार—न्यू इंग्लिश प्रांतांत व्हाईमौंटन नांवाचा एक डोंगर नाहींसा होऊन त्याच्या जागीं एकाएकीं एक नवीनच सरोवर आलें आहे असें सांगतात. २१ मार्च रोजीं त्या प्रांतांत व न्यू इंग्लंड मध्यें जो धरणीकंपाचा धक्का बसला त्याचा हा परिणाम असावा असा अनुमान आहे !

**सहा माणसें बुडतां बुडतां वांचलीं-** अमदाबाद नजीक सरखेज नांवाच्या गांवीं गेल्या तारीख १४ रोजीं तलावावर एक बाई तोंड धूत असतां तिचा एक नऊ वर्षांचा मुलगा अकस्मात पाण्यांत पडून गटंगळ्या खाऊं लागला. त्याबरोबर त्यास बाहेर काढण्याकरितां तिनें तलावांत उडी घातली. पण मूल बाहेर निघण्याच्या ऐवजीं तीं दोघेंही बुडूं लागलीं तेव्हां त्या मुलाची बहिण तलावांत शिरली. पण तिचीही तीच अवस्था होऊं लागली. या तीन माणसांस वांचविण्या करितां दुसरे तीन इसम तलावांत शिरले पण त्यांचाही कांहीं इलाज न चालतां हीं सहा माणसें गटंगळ्या खाऊं लागून मृत्यूच्या पंथास लागलीं. पण इतक्यांत सुदैवानें तेथें दोन उत्तम पोहणारे इसम येऊन दाखल झाले व त्यांनीं या सर्व माणसांस तावडतींतून सुखरूप बाहेर काढिलें.

**चौर्य कलेची शाळा-** सेंटपिटर्सबर्ग येथें एक विलक्षण कॉलेज स्थापण्यांत आलें असून तेथें विद्यार्थ्यांस चोरी कशी करावी, घरफोडीची चोरी करण्यास कोणत्या हत्यारांचा कसा उपयोग करावा वगैरे विषयीं उत्तम प्रकारें शिक्षण देण्यांत येतें सदरहू कॉलेजाचें नांव पोलीस कॉलेज असें ठेवण्यांत आलें आहे.

**यमनीचें पद्याल-** एका स्वीस कारागिरानें विजेच्या साह्यानें एक घड्याळ तयार केलें आहे. तें किल्ली दिल्यावांचून पंधरा वर्षे चालू शकतें.

**पुन्हां हिंदु होणार-** पूर्वी इटावीच्या आसपास जे सुमारें तीन हजार रजपूत लोक जुलमानें मुसलमान बनविण्यांत आले होते, त्यास परत हिंदुधर्मांत घेण्याचा विधी आर्यसमाजा कडून लवकरच होणार आहे. व त्या प्रसंगाकरितां जोधपूरच्या महाराजांस निमंत्रण करण्यांत आलें आहे.

**प्लेगावर उपाय—** प्लेगाच्या गांठीवर पाडल्या चित्रकाच्या मुळीचा लेप दररोज ५।६ वेळां दिल्यानें मनुष्य बरा होतो असा अनुभव आला आहे, हा उपाय वैद्य व डाक्तर यांना संमत आहे.

**बर्फापासून अग्नी—** स्वच्छ बर्फाचा एक इंच जाड तुकडा घेऊन त्याला गोलाकार करावें. नंतर तो दोन्ही तळहातांनीं रगडून भिंगाच्या कांचे प्रमाणें चपटा गोल करावा. या तुकड्यांतून सूर्याचें प्रतिबिंब विस्तवावर पाडलें असतां विस्तव पेटतो.

**दुधाची पूड---** दुधांत एक प्रकारचें असिड अथवा रनेट नांवाचा पदार्थ घालून आटवलें पाणी निराळें निघतें. व बाकी चा घट्ट पदार्थ यंत्रांत घालून वाळवित येतो. आपणास पाहिजे तेव्हां पाणी घालावें झणजे ह्या पदार्थाचें फिरून उत्तम दूध बनतें.

**सुमेरसिंग जुबिली--** पुणे येथील राहणारे व महाराष्ट्रभर नांवाजलेले प्रसिद्ध नट रा० गोपाळराव दाते यांची आंग्लपद्धतीनुरूप जुबिली करण्याचा मुंबईतील रा० हरिश्चंद्रपंत तालचेरकर बी. ए. यांचा हेतु आहे.

**टाकणखाराचा उपयोग—** टाकणखाराचे अंगीं बरेच गुण आहेत. टाकणखार पाण्यांत टाकून त्या पाण्यानें स्नान केलें असतां त्वचारोग होत नाहींत व झालेले त्वरित बरे होतात. डोळे आले असतां ते धुण्याच्या कामीं टाकणखाराचा उपयोग चांगला होतो.

**सुखकारक दिवा—** सध्यां हातांत धरण्याचे कंदील सर्वत्र वापरण्यास येतात. हे हातांत धरण्याचे श्रम वाचविण्या जोगे नवीन कंदील निघाले आहेत. कंदील गळ्यांत अडकवून छातीवर टेकवावयाचा आहे. छाती भाजत नाहीं. हात मोकळे राहतात, आणि पुढील रस्ता वगैरे स्पष्ट दिसतो.

**कशांत काय असावें** (१) सेवांत नम्रपणा आणि सावकाशपणा. [२] पेशाखांत स्वच्छता आणि साधेपणा. [३] बोलण्यांत आवेश आणि प्रेमदान. (४) व्यवहारांत उद्योगशीलता आणि निष्कलंकपणा (५) मसलतींत कौशल्य आणि दूरदर्शीपणा. (६) विपत्तींत शौर्य, विवेक, आणि धैर्य. (७) मत्यांत नम्रता आणि उदारपणा (८) नजरेंत सौजन्य आणि प्रसन्नता. [९] कृतींत सत्य आणि समंजसपणा. (१०) धर्मांत ईश्वरभक्ति आणि परोपकारपणा.

**आख्यायिक—** एके दिवशीं नुरजहा बेगम ही जाहांगीर बादशहास झणाली कीं तुमचे तोंडची घाण येते. बादशहानें ही गोष्ट अंगास चोंबीला कळवून झणाला कीं तुझीतर आमचे तोंडाची वाईट घाण दाखवीत नाहीं. आणि नुरजहान ही वाईट दाखवीत आहे. मोठ्या धीरानें उत्तर दिलें कीं स्त्री एक च पुरुषाचें तोंड पाहाते तिला दुसऱ्याचें तोंडाची काय परिक्षा होणार आणि मी या कृतीच्या उलट आहे. तिला तर घाण येणारच. सत्य आहे नुरजहान ही पहिली बायको शेर अफगन याची होती. नंतर जहांगीर बादशहानें केली.

**अंधद्विपांतील चमत्कारिक लोक-** हे अगदीं ठेंगू, काळेकुट, कुरूप वाकड्या छातीचे, ढेरपोट आहेत. त्यांकडे वस्त्र पांघरणें हें स्त्रियांना व पुरुषांना देखील ठाऊक नाहीं. कोणीकोणी झाडांच्या पानांनीं अथवा कोंबडकुत्र्यांच्या चामड्यांनीं शरीराचा अपकृष्ट भाग आच्छादितात. परंतु अशांची संख्या शेंकडा एकापेक्षां अधिक नाहीं. येथील स्त्रीजातीला लज्जा मुळींच नाहीं. बायका तांबड्या मातीनें आपलें अंग रंगवितात व मृत मनुष्यांच्या हाडांच्या माळा करून गळ्यांत घालतात. अंदमानी लोक कंदमुळें, मास व मध यांवर निर्वाह करितात. मासे धरणें व समुद्रांत डुबणें हे त्यांचे दोन मोठे उद्योग होत. आश्चर्याची गोष्ट ही कीं, हे लोक दिसण्यांत अगदीं ठेंगू असून मोठे मजबूत व जबर आहाराचे असतात. एकएक जण एका बैठकीला सात शेर मांस सहज फस्त करितो ! या लोकांच्या स्त्रिया झणजे सगळ्या सूर्पणखाच होत ! यांचीं पोटें फार मोठालीं असतात. एकाएका घरांत शंभरशंभर माणसें सहज राहतात. हे लोक केव्हांही अनाथ करून रहातात यांच्यांत पुनर्विवाहाची चाल नाहीं. पति मेला झणजे त्याच्या कवटीची कवटी काढून ती त्याची बायको अलंकार झणून गळ्यांत घालिते. अशा रानटी लोकांतसुद्धां स्त्रियांचें अंगीं पतिभक्ति, ब्रह्मचर्य व साधेपणा सुशिक्षित समाजापेक्षांहि अधिक दिसावा, हें आश्चर्य वाटलें पाहिजे.

**सुवर्णतुला—** कोल्हापूर सरकार श्री० बापासाहेब ह्या पौर्णिमेच्या दिवशीं सकाळीं सिरमनजीक सिरगांवात आपली सुवर्णतुला करणार आहेत असें समजतें. दुर्दैवानें नुसत्या हिंदु राष्ट्रांतील अशा गोष्टी आतां नामशेष झाल्या आहेत.

**स्तुत्य कृत्य-** मुंबई येथील कंट्राक्टर शेट गंगाराम सावळ पुरी हे आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ श्री क्षेत्र नरसोबाची वाडी येथें यात्रेकरू लोकांस राहण्या करितां दहा हजार रुपये खर्च करून एक मोठी धर्मशाळा बांधणार असून, या इमारतीकरितां कोल्हापूरचे श्री. छत्रपती महाराज साहेब यांनीं त्यास जागा देण्याचें मंजूर केलें आहे.

**महा तपस्वी स्त्री.—** एक २२ वर्षांची तरुण तापसी ब्राह्मण स्त्री हिमालयांतून दर्भंगा येथें आली असून ती भगवद्गीतेचें विवरण फार सुरेख करते. ही सांप्रत इतर अशक्य योगही करितांना सुद्धां करीत असें झणतात. २० दिवस पूर्व कोलीत निरखून ती दुसऱ्या खोलीत बसून एकाग्र चित्तानें तिचा अभ्यास करीत होती.

**प्रकाशकिरण—** जर्मनींतील नावाजलेल्या एका जर्मन रसायनशास्त्रज्ञानें कांहीं एक प्रकारचे प्रकाश किरण शोधून काढिले. या किरणांत आणि सूर्यप्रकाशाच्या किरणांत मोठा भेद आहे कीं, सूर्यप्रकाश ज्या वस्तूंच्या पार जाऊं शकत नाहीं अशा कांहीं वस्तूंच्या पार रन्टजनकिरण जाऊं शकतात. साधारणतः लोकांचे पेटींत किंवा कपड्यांच्या बंद्यांतून ठेविलेल्या पदार्थांचा फोटो या किरणांच्या सहाय्यानें काढितां येतो. त्याप्रमाणें शरीराच्या कित्येक भागांतील अस्थींचेंही फोटोग्राफ हे किरण त्वचेंतून शिरून काढूं शकतात.

**स्वयं प्रकाशक धातु—** युरेनिअम धातु स्वयंप्रकाशक असून तो अंधारांत चकाकतो. इतकेंच नव्हे, तर किती वर्षे झालीं, तरी त्याच्या स्वयंप्रकाशित्वांत कमीपणा होत नाहीं, किंवा त्या प्रकाशितपणानें त्या धातूच्या वजनांतही कमीपणा होत नाहीं. युरेनिअमचा क्षार कांहीं धातूंच्या पत्र्यांच्या पाठमागावर लाविल्यास ह्या धातूंतून युरेनिअमचे प्रकाश किरण पार जातात.

तसेंच रेडिअम ही धातु (१) स्वयंप्रकाशी आहे. (२) या प्रकाशीपणानें तिच्या वजनांत कमीपणा होत नाहीं.

हे स्वयंप्रकाशी धातु सांप्रतच्या आजपर्यंतच्या शास्त्रीय ज्ञानांत फार मोठ्या क्रांत्या होणार आहेत. आजपर्यंत साधारणतः अशी समजूत व अनुभव होता कीं, कोणत्याही पदार्थाच्या जळण्यानें उष्णता व प्रकाश हीं बाहेर पडतात व त्यामुळें त्या पदार्थाचें वजन कमी कमी होत जातें. परंतु रेडिअम सारखे धातु किती वेळही प्रकाशीतपणा करीत राहिले तरी त्यांच्या वजनांत कमीपणा होत नाहीं. अर्थात आजपर्यंतच्या ज्ञानांत भर पडल्यामुळें समजूत बदलणें भाग आहे. सूर्याचे अंगीं रेडिअम सारखे अनेक धातु असले, तर तो कधीं तरी विझणार, ही भीति व्यर्थ होय.

रेडिअम धातूचे किरण कधीं प्रकाश देतात. झणून त्याचा उपयोग कित्येक हितकारक होण्याचा संभव आहे.

रेडिअमचे किरण इतके पारगामी आहेत कीं, डोळ्यावर जाड जाड असे पडदे बांधिले आणि त्याच्याहीवरून आपले व इतर हात ठेविले तरच त्यांचा प्रकाश आत शिरावयाचा नाहीं. यावरून कित्येक अंधांनाही दृष्टीचा उपयोग या किरणामुळें होण्याचा संभव आहे.

REGISTERED No. N 4

बाहेरगावी टपालहाशीलासह ........

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास..................२ आणे

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस.........०।१०

दुसरे खेपेस.... .......०।

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 as

dvertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......3 as

Repetitions Per line ,, 2as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 9 MAY 1904 NO 18

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ९ माहे मे सन १९०४ इ० अंक १८

### नोटीस

रा० रा० रामप्रताप रघुनाथदास मारवाडी राहणार ताजनापेठ आकोला. यासः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, माझी मालकीची मौजे मायगांव येथील दोन शेते सर्वे नंबर ३४ आणि ३९ हीं तुमचेपाशीं तात्रगहाण आहेत. आपण हीं दोन्ही शेतें दुसऱ्यास अगदीं थोड्या पैशाला लावून काढता हे ठीक नाहीं. मी पुष्कळ वेळां जास्त पैसे देऊन शेती लावून घेणारे लोक तमचेकडे घेऊन आलों पण ही गोष्ट तुमचे मनांत येत नाहीं. यामुळें माझें फार नुकसान होतें याची वाट काय! काळ रोजींच मी स्वतां रा. सडसळ मारवाडी यांस तुमचेकडे घेऊन आलों होतों. ते पुढील १३१४ सालचे ३६० रुपये आगाऊ रोख नगदी रुपये देऊन शेती लावून घेण्यास तयार असतां तुम्ही इनकार करितां सबब या जाहीर नोटिशीनें कळवितो कीं आपण मी आणलेल्या मनुष्यास शेती वाहण्यास द्यावी. असें चार दिवसांत न करितां तुम्ही तुमच्याच पक्षियाचा कोणी मनुष्य उभा करून त्यास थोडक्या पैशांत लावून काढाल तर जी नुकसानी माझी झाली आहे व होईल ती सर्व तुमचे कडून भरून घतली जाईल. कळावें तारीख २-५-०४ इसवी.

सही

शेरअली वल्लद मुनातअली इनामदार राहणार ताजनापेठ— आकोला.

### नोटिसीचे उत्तर

रा. रा. किसनसिंग वल्लद तानासिंग रजपूत राहणार अडगांव खुर्द जहागीर पोस्ट- अडगांव यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही तारीख २१।४।०४ चे शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटिस दिली पावली मजकूर सर्वत्र खोटा आहे. माझी बहीण काशी इजपाशीं तुमचा भाउ नारायणसिंग वल्लद बबूसिंग हा राहत होता. हा नुसता दोन तीन आण्याची मजुरी करून राहत असे. यानें मुळींच इस्टेट कमाविली नाहीं. यांस सर्व लोक साक्षी आहेत. ती इस्टेट सर्व माझे बापाची आहे. माझा बाप मरण पावला त्या नंतर माझी सापत्न आई भोनाई ही आपले मुलीचे येथें ह्मणजे काशीचे येथें सर्व इस्टेटीसह गेली. माझें सावत्र आईशी बनत नसल्यामुळें मी मोठे अडगांव येथें राहत असें. मझ्या पश्चात सर्व इस्टेटीसह माझी आई आपले मुलीकडे गेली. पुढें माझी नाईही वारली. ह्मणून मी आपली इस्टेट मी आपलें घरी नेत होतो. परंतु पंच लोकांनीं मला समजाविलें कीं, काशी गरीब आहे ह्या वेळेस तिला त्रास न देतां ती जो पर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत इस्टेटीचा उपभोग तिला घेऊ दे. ती मेल्या नंतर सर्वच तूं संभाळावें. ह्मणून मी अडगांवीं मुक्कामीं गेलों. माझे बहिणीचे मुले वगैरे सर्वच मरण पावले ह्मणून मी माझी इस्टेट घेऊ लागलो असतां तुम्ही हरकत करता हे तुह्मास योग्य नाहीं मी तुमचे हरकतीस जुमानणार नाहीं. माझे इस्टेटीचा मी पूर्ण मालीक आहे. यांत तुम्ही हात घातल्यास मी तुमचेवर फिर्याद करीन. दुसरे रा. वासुदेव भटजी याचे जवळ आमचे कांहीं चांदी सोन्याचे डागीने आहेत ते मी त्यास मागितले असतां तुम्ही त्यास न देण्याविषयीं सांगतां. असे करणें बरोबर नाहीं. दुसरे तुम्ही दोन कालवडी, बैल एक, गाय एक अशी चार जनावरें मला न कळत तुम्ही घेऊन गेले तरी ही नोटीस पावताच ८ दिवसांत आमचीं जनावरें व आमच्या घराच्या खिडक्या भांडाभांडीच्या गडबडीमुळें तुम्ही न कळत घेतल्या त्याही आमचे ताब्यांत द्याव्या. असें मुदतींत न केल्यास व जनावराचे जीवास कांहीं धोका झाल्यास तुमचे पासून त्या जनावराबद्दल पंच मार्फत किंमत भरून घेऊ ह्मणून दिली नोटीस. कळावें तारीख ३।५।०४ इसवी.

सही

नारायणसिंग वल्लद लछीरामसिंग राहणार अडगांव खुर्द जहागिर निशाणी खुद्द हातची कट्यार.

### नोटीस

बेशमी रंगुबाई जवजे रावजी जोसी राहणार खामगांव हल्लीं वस्ती नांदुरा तालुके मलकापूर इजला.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तू माझे साक्षात चुलत भावाची बायको असुन माझा बंधू नामें रावजी सुमारें २ वर्षांपूर्वी प्लेगांत मरण पावला. त्याची स्थावर व जंगम जिनगी सालीम तुझे कबजांत राहिली. त्या जिनगीचा मी योग्य व कायदेशीर वारस आहे. जंगम जिनगीची तूं अफरा तफर केलीस व स्थावर जिनगीची विल्हेवाट करूं पाहत आहेस सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तूं सदरील जिनगी कोणास गहाण, खरीदी किंवा बक्षीस देऊं नये किंवा दुसरे कोणतेच तऱ्हेची तिची व्यवस्था करूं नये. तसें केल्यास तुमचा व्यवहार रद्द व बातल कोर्टमार्फत केला जाऊन त्याजबद्दल खर्च वगैरे जो होईल तो तुमचे पासून भरून घेतला जाईल. फक्त तुम्ही अन्नवस्त्राचे मालक आहांत. जास्त भानगडींत पडूं नये ह्मणून ही नोटीस दिली तारीख ४ माह मे सन १९०४ इसवी.

सही

आत्माराम धरणीधर जोशी खामगांव.

### जाहिरात.

खालीं सही करणार याजकडून सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं रंगुबाई जवंज रावजी जोशी खामगांवकर हल्लीं वस्ती नांदुरा तालुका मलकापूर ही मझ्या साक्षात चुलत बंधूची बायको असून माझा चुलत बंधू समारे दोन वर्षपूर्वी प्लेगनें मरण पावला. त्याजला योग्य व कायदेशीर जवळचा वारिस मी आहे. सदरील रंगबाई हिनें मयत नवऱ्याचे जंगम जिनगीची अफरातफर केली व स्थावर जिनगीचीहि गैर व्यवस्था करूं पाहत आहे सबब ह्या नोटिशीने कळविण्यांत येते कीं सदरील स्थावर मिळकत कोणी गहाण, खरीदी किंवा बक्षीस घेऊं नये. घेतल्यास सदरील व्यवहार रद्द व बातल असे. कळावें. ता. ४।५।०४ इ.

सही

आत्माराम धरणीधर जोसी खामगांव

### नोटीस.

बेशमी सांगवीदास रामचंद्र जिनिंग फाक्टरी आकोला मालक राजश्री सांगवीदास यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मजकडून आकोला येथें तारीख १८।८।०३ इसवी रोजीं करारनामा लिहून घेतला आहे. त्यांतील शर्ती येणें प्रमाणें आहेत.:—तुमचे फाक्टरीमध्यें एन्जिनकडे ह्मणजे यांत्रिक कामाकडे जे तुह्मी सांगाल ते काम मी करावें व त्याबद्दल तुह्मी मजला हंगामाचे दिवसांत ६ महिने अगर हंगाम आहे तो पावेतों दरमहा ६० रुपये व इतर दिवसांत ह्मणजे ज्यावेळीं हंगाम नाहीं अशा दिवसांत दरमहा ४० रुपये पगार द्यावा व त्या प्रमाणें मी तुमचे जिनिंग फाक्टरीमध्यें तारीख १८।८।०३ पासून ते तारीख १५।४।०४ पावेतों नोकरी केली. व तारीख ३१।१२।१९०४ पावेतो तुमचे जवळून ६० रुपये दरमहा प्रमाणें पगार घेतला. पुढें ता० १६-४ १९०४ रोजीं मी तुमचे जिनिंगमध्यें नोकरी करण्यास खुष असतां व माझा कांहींच कसूर नसतां "तुमची नोकरी नको" व "तुह्मी जा" असा जबाब देऊन मजला तुह्मी ता० १६-४-०४ पासून घरीं बसविले. यामुळें करारनामा तुह्मी मोडला व माझें नुकसान करविले. करितां आतां कळवितों कीं माझें झालेलें नुकसान ह्मणजे हंगामाचे दिवस पावेतो ४० रुपये प्रमाणें पगार ही नोटीस दिल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत आणून द्यावा. नाहीं तर मजला कायदेशीर रीतीनें कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटिशीचे खर्चासुद्धां रकम वसूल करावी लागेल. कराराप्रमाणें तुमची कामगिरी करण्यास मी तयार आहे. मला निरोप येत जाईल तेव्हां तेव्हां मी हजर होत जाईन. माझ्या रिकाम्या वेळांत जर मी कांहीं दुसरी पैदास केली तर माझी नुकसानी भरून देते वेळीं ती गोष्ट लक्षांत घेतला जाणार नाहीं. कळावें. तारीख ९ माहे मे सन १९०४ इ.

सही

बिसन शिवचरण फिटर राहणार अकोला.

### नोटीस

रा. गणू व० विठोबा पाटील दुकान बटवाडी बुजरुक तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानचे नांवानें ९०० नवशे रुपयांचे किस्तींचे गहाणखत मी लिहून दिलें असून पन्नास रुपये किरत आहे पैकीं ४ किस्तीची तुह्मास अदाई केली. हल्लीं सालासुद्धां दोन किस्ती देणें असून गुदस्त सालास तुह्मास किस्तीची रकम घेऊन पावती देण्यास ह्मटलें तुह्मी पावती देण्याचें नाकारल्यावरून तुह्मास किस्तीचे रुपये दिले नाहींत. हल्लीं गुदस्त सालची व या सालची असे दोन्ही किस्तीं बद्दल शंभर १०० रुपये रा. तुकाराम वल्लद महादाजी दारमोडे वस्ती कदमापूर तालुके खामगांव याजपाशीं जमा ठेविले आहे. त्याज पासून तुह्मी घेऊन त्यास पावती द्यावी. तुह्मी किस्तीचे रुपये घेण्यास वरील कारणामुळें हरकत केली असून वरील किस्तीचे गहाणखतांत तीन किस्ती एकदम पडल्यास एकदम रक्कम सालीम घेण्याची शर्त आहे याज करितां तुह्मास कळविण्यांत येते कीं तुह्मी किस्तीची पावती देत नसल्यामुळें किस्तीं पडल्यास त्या गहाणखतांतील शर्तीचा मी जबाबदार राहणार नाहीं हें आपणास कळावें. तारीख ४ माहे मे सन १९०४ इसवी. दस्तुर— रामकृष्ण राजाराम उमेदवार आकोला.

सही

अवधूत वल्लद सुरभान देशमुख राहणार कदमापूर तालुके खामगांव पोस्ट बाळापूर दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १० शके १८२६

## अरण्य रुदितम्.

( उत्पन्नाच्या करा वरील आक्षेप )

मामुली प्रमाणें १९०४ च्या एप्रील पासून सरकारी हिशोबी साल सुरू झालें आहे. याच साला पासून आमच्या प्रांतांत नवा बादशाही कर बसविण्यांत आला आहे आणि सध्यां सर्व प्रांतभर ह्या कराच्या आकारणी संबंधानें मोठी गडबड चालू आहे. ह्या कराच्या आकारणीचे तक्ते तयार करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें असून ह्या कामा करितां सध्यां कामगारांचा एक आमळाही तोडून देण्यांत आला आहे. ह्या नव्या बादशाही कराचें उत्पन्न फार दांडगें होणार आहे आणि हा कर यंदाच वसूल करिते वेळीं लोकांस फार नाचणार आहे. हा उत्पन्नावरील कर सुखवस्तू लोकांकडून वसूल केला जातो ही गोष्ट सकृत दर्शनीं ठीक दिसते पण या सुखवस्तू लोकांच्या वर्गांत मोडणाऱ्या पुष्कळशा लोकांची गृहस्थिती फारच असमाधानकारक असते असें आढळून येईल.

या उत्पन्नावरील करा संबंधानें आमचा अभिप्राय फार विरुद्ध आहे. याला पहिलें कारण असें कीं, आमच्या प्रांतांत शेती शिवाय दुसरा धंदाच नाहीं. शेती खेरीज दुसरे जे कांहीं जुजबी धंदे आहेत ते मुख्यत्वें करून शेतीतील मालाची विलायतेकडे रवानगी करण्या संबंधाचेच आहेत. उदाहरणार्थ, कापूस वटण्याच्या फॅक्टरी व सरकी काढलेल्या रुईचे बोजे दाबण्याचे कारखाने. या शिवाय जे आणखी व्यापार व उद्योग आहेत ते बहुतेक येथील कच्चा माल विलायतेला पाठविण्याचेच होत. धनोत्पादक स्वतंत्र असे धंदे या प्रांतांत नाहींत अशीं विधानें सरकारी रिपोर्टांतहि आढळतील. तेव्हां उत्पन्नावरील कर हा अप्रत्यक्ष रीतीनें जमिनीच्याच उत्पन्नावर निराळा कर होय. वऱ्हाडांत साऱ्याचें उत्पन्न पुष्कळ मोठें आहे आणि या साऱ्याला दुसरी भर घालण्याला हा अप्रत्यक्ष दुसरा साराच होय. शेतीच्या धंद्यावर जसा सारा तसा इतर धंद्यावर हा उत्पन्नावरील कर असतो. पण आमच्या या शेतीच्या प्रांतांतील दुसरे धंदे केवळ शेतीच्याच अंगभूत आहेत आणि त्या मानानें इतर धंद्यावरील कर ह्मणजे शेतीवरच बसविलेला निराळा कर होय. वऱ्हाडांतील शेतकऱ्यांची स्थिती असावी तशी अगोदरच चांगलीशी नाहीं. आणि तशांत शेतकऱ्यांचेंच रक्त शोषून प्रतिष्ठेला पोंचलेल्या इकडील उद्योगी मंडळीच्या वर्गावर इन्कम टॅक्स बसविल्यामुळें तो कर शेवटीं गरीब शेतकऱ्यांवरच लादला जाणार आहे; किंवा असें ह्मणण्या पेक्षां हा कर त्यांच्या शेतीवरच आकारला जात आहे हें ह्मणणें विशेष बरोबर दिसेल. सारांश शेतीच्या प्रांतांत हा उत्पन्नावरील कर फार जुलमाचा व अन्यायाचा होय. शेतीच्या कच्च्या मालाचें रूपांतर करणारा जर एखादा धंदा प्रचलित असेल तर तो धंदा उत्पन्नावरील कराला सत्पात्र होय. पण येथें असा एकही धंदा विद्यमान नसून येथील मालांचें रूपांतर करणारे सर्व धंदे विलायतेस चालतात तर आमचा प्रांत ह्या कराला बिलकूल पात्र नाहीं हें उघड आहे.

हा नवा कर ज्या लोकांवर बसविला जाणार आहे त्यांची गणना आह्मी सुखवस्तू लोकांच्या वर्गांत केलेली आहे. जेथें धनोत्पादक उद्योग चालतात. तेथील सुखवस्तू लोकांचा वर्ग ह्मणजे एक राष्ट्रीय शक्तीच होय. अशा सुखवस्तू लोकांचा वर्ग आमच्या प्रांतांत नाहीं. इकडील सुखवस्तू लोक ह्मणजे जळू सारखे होत. दहा शेतकऱ्यांना भिकारी करून एक सुखवस्तू मनुष्य उभा राहतो आणि आमच्या मतें निवळ शेतीच्या प्रांतांमध्यें जेथें पूर्वीं लोक सुखसंपन्न होते अशा ठिकाणीं जो सुखवस्तू लोकांचा मध्यम वर्ग ब्रिटिश अमला खालीं बनत चालला आहे तो पुष्कळशा सुखी शेतकऱ्यांना ऱ्हासास पोंचवून बनलेला आहे. हा श्रीमान् लोकांचा नवीन वर्ग राष्ट्राला हितकारक असो वा नसो पण त्यांची उत्पत्ती वरील धोरणावर आहे. अशा लोकांकडून कर घेणें कदाचित रास्त दिसेल पण त्याचा परिणाम शेवटीं असा होतो कीं, ज्या लोकांकडून सरकारच्या मनांत हा कर घ्यावयाचा नाहीं त्याच लोकांना हा कर द्यावा लागणार आहे. गेल्या आठ वर्षांतच जेव्हां दोन दुष्काळ पडले तेव्हांच आमच्या सुखवस्तू लोकां विषयींची कल्पना चांगलीच निदर्शनास आली. त्या दुष्काळामुळें शेती बुडाल्याबरोबर किरकोळ शेतीवाले खडी फोडायास गेले. त्यांच्यापेक्षां किंचित् अधिक सुखी अशा लोकांची गाळण किती उडाली त्याची आठवण देखील महत् दुःखदायक आहे. आणि जे कांहीं थोडे धनिक लोक होते त्यांनीं मात्र विपन्नावस्थेस पोंचलेल्या लोकांची मालमता आपलीशी करून घेतली. सारांश इकडील सुखवस्तू लोक हे गरीब लोकसमूहाला प्रसंग विशेषीं पोसण्याला अगदीं असमर्थ असतात इतकेंच नाहीं तर १८९९ च्या दुष्काळाच्या साला सारख्यां भयंकर काळीं हा सुखवस्तू लोकांचा वर्ग अगदीं लुप्तप्राय होऊं लागतो व त्यांचे शेतीवर चालणारे सर्व धंदे एकदम बसतात. इतर राष्ट्रांमधील सुखवस्तू लोक एक शेती बुडाली तर तिकडील गरीब लोकांस आपल्या नानाविध कारखान्यांत पोसूं शकतात. पण तशी स्थिती इकडे नाहीं ही गोष्ट अलीकडील दुष्काळाच्या अनुभवानें चांगली सिद्ध झालेली आहे. इंग्लंडा सारख्या राष्ट्रांत लोक उत्पन्नावरील कर सुखानें देतात याचें कारण त्यांचे नानाविध उद्योग होत. पण तशी स्थिती निवळ शेतीच्या प्रांतांत नसते ह्मणूनच हा बादशाही कर ह्या प्रांतास लागूं करूं नये असें आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे.

आमच्या ह्या आक्षेपांना पुष्कळजण अरण्यरुदिताची उपमा देतील आणि त्याची किंमत त्या पेक्षां कांहीं अधिक असेल असें आह्मांसहि वाटत नाहीं. पण आमच्या ह्या प्रांतभर हा नवा कर बसविण्याचा हुकूम फिरल्यापासून आह्मी आमचे दुःखोद्गार परिस्फुटतेनें वारंवार प्रदर्शित केले आहेत आणि आज ज्या मुख्य दोन कारणाविषयीं उल्लेख केला आहे त्या शिवाय इतर राजिक कारणांचा व राज्यकारभाराच्या कारणांचा उल्लेख आह्मी पूर्वींच केलेला आहे. एकंदरीनें, वऱ्हाड प्रांत हा बादशाही मुलूख नसल्यामुळें या बादशाही करास तो पात्र नाहीं; राज्यकारभाराच्या खर्चासाठीं ह्या कराची अद्याप जरूर दिसत नाहीं; आणि आमचे नवे स्थानिक सरकार ह्मणजे मध्यप्रांताचे सरकार यांनीं ही जरूरी सिद्धहि करून दाखविली नाहीं; सुखवस्तू लोकांच्या दृष्टीनें या कराची आकारणी त्यांस फार जबर जाईल; आणि वऱ्हाडांतील शेतीच्या दृष्टीनें देखील हा कर अर्थशास्त्राला मान्य आहे असें आह्मांस वाटत नाहीं. आमची ही लांबलचक मीमांसा स्थानिक सरकारांनीं ध्यानांत घेतल्या वरहि जरी त्यांस आमची ही मागणी मान्य करितां आली नाहीं तरी या विचारसरणीनें आमच्या प्रांताची अंतस्थ लोकस्थिती जर सरकारच्या डोळ्यांस दिसून येईल तरी देखील आमचा पुष्कळसा कार्यभाग झाला असें आह्मी समजूं.

---

## भयंकर खून

उमरावतीस एका लग्न समारंभाचे अखेरीला एक भयंकरच प्रसंग ओढवला. ती गोष्ट ऐकिली ह्मणजे अंगावर शहारे उभे राहतात. रा. रा. मारुती नाईक डांगे कुऱ्हेकर हे आपल्या वडील मुलाच्या लग्नासाठीं उमरावतीस आले होते. यांचा जानोसा तेथील दत्त मंदिरांत होता. लग्न समारंभ चार दिवस साजरा झाल्यानंतर हे गृहस्थ कांहीं शिष्ठ मंडळींच्या पाहुणचारासाठीं मुद्दाम राहिले होते. गेल्या ३० तारखेला ह्मणजे शनिवारीं रात्रीं मेजवानीचे थाट चालले असतांना रा. मारुती नाईक यांचा दुसरा लहान आठ वर्षांचा मुलगा आनंदानें खेळत होता. आणि ते दिवशीं नाटक पाहण्यास जाण्याच्या उत्सुकतेनें तर तो विशेषच आनंदी होता. पण अशा वेळीं एकदमच त्याच्या मृत्यूची घटका भरून आली ! घरांतील सर्व मंडळी आपापल्या नानाविध कार्यांत मग्न आहेत अशा समयीं हा मुलगा एकदम नाहींसा झाला. दोन तासपर्यंत ह्मणजे रात्रींच्या ९-१० वाजेपर्यंत त्या मुलाची कोणासच आठवण झाली नाहीं. परंतु पुढें मुलगा कोठें आहे यांचा शोध करितां त्याचा पत्ताच लागेना ! जिकडे तिकडे शोध केला आणि शेवटीं तो घरांतील कोणा बरोबर तरी नाटकाला गेला असावा अशा समजुतीमुळें नाटकगृहींहि शोध केला आणि तो तेथेंहि दिसेना तेव्हां मात्र सर्वांचा धीर सुटला व त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. अशा दुःखद स्थितींत शनवार पासून बुधवार पर्यंत चार दिवस एकसारखा तपास चालूच होता. बुधवारीं एका जुन्या राहत्या बंगल्याच्या पडवींत छिन्नभिन्न झालेलें असें एक प्रेत सांपडलें, आणि तें प्रेत त्या लहान मुलाचेंच होतें ! त्या मुलाचे हातपाय तोडलेले असून तोंड ठेंचून त्यावर काळ फासलें होतें! हें प्रेत पाहून त्या बिचाऱ्या राजश्री मारुती नायकाच्या अंतःकरणाची स्थिती काय झाली असेल ती कल्पनेनेंच समजणार आहे! आनंदाचा प्रसंग तो कोण आणि तेथें असा हा भयंकर खून ! त्या मुलाच्या अंगावर हजार दोन हजाराचा दागदागिना होता. आणि त्याच्या लोभामुळेंच हा खून कोणीतरी दुष्टानें केलेला आहे पोलिस तपास बारकाईनें चालू आहे पण अद्याप कांहींच सुगावा लागलेला नाहीं.

---

आमच्या वऱ्हाडांत वरील प्रकारासारखा खून क्वचितच घडला असेल. अशी गोष्ट मुंबई सारख्या शहरीं घडण्याचा संभव विशेष असतो आणि या बाबतींत मुंबई जवळ जवळच उमरावतीची स्थिती येऊन पोहोंचली ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. हा खून होण्याच्या अगोदर १९ दिवसापूर्वीच एका वेश्यांगनेचा खून दिवसा ढवळ्या तिसरे प्रहरीं तिच्या राहत्या घरांतच झाल्याचें ऐकिलें होतें. तोहि खून तिच्या जवळील दागदागिन्या साठींच करण्यांत आलेला आहे. तिचें नाक तोंड दाबूनच तिला ठार करण्यांत आलें आणि तिची सर्व मौल्यवान् चीजवस्त त्या चोरट्यांनीं नेली. तिच्या घराचें दार अर्धवट उघडेंच टाकलेलें होतें आणि तें वेश्येचें घर असल्यामुळें तेथें सायंकाळपर्यंतहि हालचाल दिसली नाहीं तेव्हां लोकांचें लक्ष्य सहाजिकच तिकडे गेलें आणि पहातात तों सर्व प्रकार खुनाचा ! अद्याप पर्यंत ह्याहि खुनाचा पत्ता नाहीं आणि आमच्या ऐकण्यांत असेंहि आलें आहे कीं, याच सुमाराला एक प्रेत बडनेऱ्याच्या वाटेवर सांपडलेलें आहे. याहि खुनाचा अद्याप मागमूस नाहीं. उमरावतीच्या पोलिसावर या खुनांच्या बाबतींत फारच मोठी जबाबदारी आलेली आहे आणि ते आपल्या चौकशींत बिलकुल हयगय करणार नाहींत अशी लोकांना उमेद आहे. वरील प्रकारच्या खुनाच्या हकीकती मुळें एक मोठी दहशतच बसलेली आहे. आणि या प्रकरणांतील खुनी लोकांचा तपास लागे पर्यंत लोकांच्या चित्ताला अगदीं स्वस्थता वाटणार नाहीं. या चौकशींत पोलिसच्या कारवाईची खरी परीक्षाच होणार आहे आणि या खुनाचा पत्ता लागणार नाहीं तर ती गोष्ट अगदीं बरी होणार नाहीं.

---

लोकांनींहि या हृदय द्रावक गोष्टी पासून एक दोन गोष्टी अवश्य शिकल्या पाहिजेत. दागदागिना वापरण्याची हौस तर सर्वांनाच असते आणि खून होतात ह्मणून तो अंगावर घालूं नये असा बोध करण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. परंतु दागदागिन्याच्या जपणुकी संबंधानें फारच खबरदारी घेतली पाहिजे. आणि तो लहान मुलांच्या अंगावर घालून त्याचा आनंद घेते वेळीं जितकी खबरदारी मनुष्याच्या हातून घेववेल तितकी थोडीच होय. नेहमींच लग्नकार्यादि मंगल प्रसंगीं मुलांच्या अंगावर दागिने घालण्याची घरच्या माणसास अती हौस असते; पण मुलें हीं स्वभावतः खेळकर असल्यामुळें त्यांना खेळण्यासाठीं सगळें घरदारहि पुरत नाहीं आणि तीं घरच्या वडील माणसांस

न कळत त्यांची दृष्टी चुकवून चटदिशी कोठें तरी जातात ही गोष्ट तीं वडील माणसें विसरतात व मुलें आपल्या नजरेखालीं न ठेविल्यामुळें असा एखादा भयंकर प्रसंग ओढवतो, आणि मागाहून आपण दागिने त्यांच्या अंगावर उगीच घातले व त्यामुळें-च त्या मुलाचा जीव घेण्यास आपण कारणीभूत झालों ह्मणून दुःखानें अनिवार पश्चात्ताप होतो ! अशी दुष्ट वेळा टाळण्या सार्ठी मुलांच्या अंगावर दागिने घालूं नयेत, किंवा घातल्यास त्यांस आपण बिल्कुल विसंबूं नये ही गोष्ट सर्वांनीं मुद्दाम ध्यानांत धरावी.

—०—

## परीक्षेचें खूळ

येथें गेल्या सोमवारीं वऱ्हाडांतील शाळाखात्याचे डेपुटी इन्स्पेक्टर मंडळींची परीक्षा झाली. ही परीक्षा मध्यप्रांतांतील शाळाखात्याच्या म्यान्युअल मध्यें घेण्यांत आली. हें मध्यप्रांताचें म्यान्युअल इकडे लागूं केल्यामुळें इकडील इन्स्पेक्टर मंडळींना त्या विषयांत परीक्षा देण्यासाठीं बसणें भाग पडलें. इन्स्पेक्टर मंडळी चांगली जुनी अनुभवी असल्यामुळें त्यांची प्रत्यक्ष परीक्षा न घेतांच त्यांची परीक्षा उतरलेलीच आहे असेंच गृहित धावयास पाहिजे होतें. हा नवीन अंमल सुरूं करितांना शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनीं असें धोरण ठेविलें असतें तर त्यांच्या नियमांची शोभा विशेष राहिली असती. इकडील इन्स्पेक्टर मंडळीला आपलें काम शिकविण्यासाठीं त्यास जबलपुराकडेहि पाठविण्यांत आलें होतें. मध्यप्रांतातील परीक्षेचा नमुना इतका विलक्षण व लोकोत्तर असेल असें आह्मांस वाटलें नव्हतें. तिकडील व्यवस्था पाहून आलेली मंडळी सांगतात कीं, मध्य प्रांतांतून ह्या बाबतींत कांहीं विशेष गोष्ट घेण्या सारखी आहे असें आह्मांस दिसून आलें नाहीं. आणि तिकडील नवलाच्या किंवा चमत्काराच्या गोष्टींनीं आमचे डोळेहि बिलकुल दिपले नाहींत.

या शिवाय शाळाखात्याचे श्रेष्ठ अधिकारी ही गोष्ट अगदींच विसरले कीं, इन्स्पेक्टर मंडळींना परीक्षा द्या असा हुकूम सोडणें फार सोपें आहे पण जर त्यांनीं स्वतांस डिपुटी इन्स्पेक्टरच्या स्थितींत ठेविलें असतें तर त्यांस चांगलें कळून आलें असतें कीं, पेनशनीच्या काला जवळ जवळ येऊन पोचलेल्या गृहस्थांना परीक्षा देणें ह्मणजे मोठें संकटच होय; पुष्कळ गोष्टी आपणांस माहित असल्या तरी त्यांत परीक्षा देणें ह्मणजे एक निराळें दिव्य आहे, आणि अलीकडील कागदावर उत्तरें लिहिण्याच्या परीक्षेची पद्धती तर विद्यार्थी दशा सुटल्या नंतरच्या वयामध्यें अगदीं अप्रासंगिक आहे. आणि ह्मणूनच हें परीक्षेचें खूळ आहे असें आह्मी ह्मणतों.

## वृथा विरस

लग्नादि मंगलकार्यांचे समारंभ ह्मणजे प्रत्येक गृहाच्या इतिहासांतील सोन्यासारखे दिवस होत. त्या प्रसंगीं त्या त्या गृहाचे शिष्टाचार, श्रीमंती, आदरातिथ्य इत्यादि राजमान्य सद्गुणांचें प्रदर्शनच असतें. त्या वेळीं सर्व कुलदेवता गृहांत नांदत असतात आणि घरची मंडळी शूचिर्भूतपणा, आनंदोत्सव व प्रसन्न मुद्रा इत्यादि प्रेमचिन्हांनीं सर्व आप्तमित्रांचें स्वागत करीत असतात. अशा प्रसंगीं जो गृहस्वामी व जी गृहिणी असते त्यांच्यावर सर्वांस परोपरीनें सुखविण्याची मोटीच जबाबदारी असते. आणि त्यांच्या सद्गुणांची खरी परीक्षा तरी याच प्रसंगीं होत असते. सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पडावें ह्मणून प्रथमतःच श्रीगणपतीची आराधना करितात. आणि अशा मंगल कार्याच्या वेळीं सर्वजणांची शुभेच्छाच नाना विघ्न कार्यभाला चालवित असते आणि सर्वांच्या नैसर्गिक मनोवृत्ती देखील परस्परांस संतुष्ट व सुप्रसन्न करण्याकडेच लीन असतात. असा सर्वच सुयोग असूनही लग्नप्रसंगीं जेव्हां कलहाचे कळस दृष्टीस पडतात तेव्हां त्रयस्थ प्रेक्षकांसही फार खेद होतो मग प्रत्यक्ष त्या मंगल कार्यांतील निरनिराळे अधिकार ज्यांच्याकडे असतात त्यांच्या मनाचा क्षोभ अधिकार परत्वें किती होत असतो हें अनुभवानेंच चांगलें कळण्या सारखें आहे.

लग्न कार्यांतील भांडणाची रीत इतकी साधारण झाली आहे कीं, भांडण ह्मणजे लग्नांतील एक प्रकारची शोभाच आहे असें कित्येकजण विनोदानें प्रतिपादनहि करितात. सुखाची रुसवारुसवी जों पर्यंत विकोपाला पोचली नाहीं तोंपर्यंत ही रुसवारुसवी सुखच देते, परंतु जेव्हां हा भांडणाचा विषबिंदू उभय पक्षाकडील लोकांचीं मनें दूषित करितो तेव्हां त्या मंगल कार्याच्या आनंदाचा सर्व विरस होतो. पैशा अडक्याच्या बाबीपेक्षां आणि अंतरव्यवस्थेच्या दोषा पेक्षां हीं भांडणें मानापमानासाठींच होत असतात. माझा बहुमान व्हावा असें ज्याला त्याला वाटत असतें आणि त्याचा तितका तो गौरव झाला नाहीं ह्मणजे मनाचा क्षोभ होतो. अशा कार्यामध्यें जो बहुविध समाज जमतो त्यांचें मानधन नीट संभाळण्या विषयीं जितकी झीज पुरस्कर्त्या मंडळींनीं ध्यावयास पाहिजे तितकी घेतली जात नाहीं आणि कित्येकदां पाहुणे मंडळीहि उण्या उत्तरानें बोलून मनाच्या क्षोभांत अधिक भर घालतात.

आमच्या लिहिण्याचा हेतु इतकाच कीं, पैशापरी पैसा खर्च होतो, प्रसंग तर निवून जातोच आणि कवनें मात्र पाठीमागें उरतात. समाजांतील अनंत सुधारणा करण्यापेक्षां ह्या सामान्य सुधारणा अगोदर झाल्या पाहिजेत. ह्या सुधारणा ह्मणजे समाजांत विनयानें, नम्रपणानें आणि गोडीगुलाबीनें वागण्याचा पहिलाच धडा होय.

## रणसंग्राम

आज बरेंच दिवस यालूनदीवर एक मोठी लढाई होणार ह्मणून गर्जत होतें त्या प्रमाणें शेवटीं गेल्या आठवड्यांत एक लढाई झाली. ही लढाई जपानानें जिंकली; रशियास मागें हटावें लागलें, आणि यालूनदी ओलांडून म्यांचुरियांतील मुलखीं जपानचें सैन्य जाऊन पोंहोंचलें. जमिनीवरील ही पहिली लढाई जपानानें मोठ्या शिताफीनें व हिंमतीनें मारली यांत शंका नाहीं. आतां या पुढील लढाईंचा जपानचा जम विशेष चांगला जमेल. मँचुरियांतील लोक जपानास विशेष अनुकूल असल्यामुळें या पुढील लढाईच्या तयारीला ते सर्व तऱ्हेनीं जपानास मदत करितील. यालू नदीच्या कांठचीं मुख्य मुख्य लढाईचीं नाकींहि जपानच्या ताब्यांत आलीं आहेत. तसेंच पोर्टआर्थर येथेंहि रशियाच्या आगबोटींची पिच्छेहाट झाली आणि तेथील वेढ्यानें रशियाचा कोंडमारा झाला आहे.

जपानची सध्यां होत असलेली अव्याहत सरशी ही त्या राष्ट्राच्या भावी वैभवाचें द्योतक होय. जपानचें राष्ट्र लहान दिसतें तरी हें पूर्व राष्ट्र पुष्कळशा पाश्चात्य राष्ट्रांची खबर घेईल अशी उमेद वाटत आहे. इतकीं वर्षें असा समज होता कीं, पाश्चात्य राष्ट्रांना एशिया खंड हें अलोट संपत्ती मिळविण्याची रणभूमि होय. आणि या समजा प्रमाणें पश्चिमेकडील बलिष्ठ राष्ट्रांनीं आपलें साम्राज्य ह्या पूर्व खंडांत बरेच लांबवर पसरलेलेंहि आहे. सध्यां तर चिना सारख्या अती जुनाट राष्ट्रांवर उडी घालण्याचा सर्व पाश्चात्य राष्ट्रांचा रोख आहे. आणि या दूरवरच्या दृष्टीनें प्रत्येक पाश्चात्य राष्ट्र आपलें पाऊल पुढें सरकवून चिनाला जवळ जवळ करीत आहे. अशा राष्ट्रांपैकींच रशिया हें एक असून तें मँचुरिआ व कोरिआ हे प्रांत काबीज करण्याच्या उद्योगांत आहे. ही रशियन साम्राज्याची लाट दुसऱ्या राष्ट्रांस गिळंकृत करीत आहे. तोंच जपाननें ही लाट थोपविली, तिला मागें सारलें व तिचा पूर्वेकडील वाहता ओघहि अजिबात बंदच केला ह्या पराक्रमाबद्दल जपानचें वर्णन करावें तेवढें थोडेंच होय. जपानचा हा पराक्रम रशियालाच काय पण इतर युरोपियन राष्ट्रांनाहि आपली साम्राज्यतृष्णा थोडी बहुत आवरून धरण्यास शिकवील. एशिया खंडांत बहुतेक पादाक्रांतीच झालेली आहे अशा वेळीं एकटेंच पूर्वेकडील राष्ट्र डोकें वर काढीत आहे हें पाहून आनंद वाटणें साहाजिक होय. जपानच्या उदाहरणानें चीनच्या राष्ट्राला नवीन वीरश्री चढेल असा सुयोग दिसतो. पश्चिमेच्या साम्राज्याशीं टक्कर मारणारा असा एक साम्राज्यदिनकर पूर्वक्षितिजाच्या वरवर येत आहे हें पाहून आह्मी जपानचा जो धन्यवाद गातों त्याची यथार्थता कळेल. कालचक्रच असें आहे कीं, पश्चिम समुद्रांत बुडालेला सूर्य जेव्हां पुन्हां पूर्वेकडे उदय पावतो तेव्हां त्याची प्रभा फांकत फांकत सर्व भूमंडल व्याप्त करीत जाते. तद्वतच हें पूर्वेचें जपानी साम्राज्य वाढत वाढत सर्व पश्चिमखंडें व्यापून सोडील असें भविष्य मागील इतिहास वर्तवीत नाहीं काय ?

## मलकापूर ता. २५।४।०४

ह्या गांवची संख्या १३ हजारांवर असून येथें व्यापार उदीम पुष्कळच वाढला आहे सराफीची पेठही मोठी आहे. अशा गांवाला म्युनसिपालिटी असावी असें लोकमत आहे. कुमार श्री हरभामजी साहेब हे येथें म्युनसिपालिटी स्थापित करण्याविषयीं वरिष्ठाकडे शिफारस करितील अशी आशा आहे.

येथें पाण्याचा पुरवठा अगदीं नाहींच ह्मटलें तरी चालेल. नदीचें पाणी १२ महिने पुरण्या सारखें नसून ऐन उन्हाळ्यांत तें दूषित ही होतें. येथील लोकप्रिय अधिकारी रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर यांनीं येथील तहशिलदार रा० चांदेकर व गांवची शिष्ट संभावित व शेटसावकार मंडळी यांस मिळवून घेऊन पाण्याचा पुरवठा करण्याची एक नवीनच योजना मनांत आणिली आहे. गांवचे पूर्वभागीं मोठी विहिर खणून इंजिनानें तिचें पाणी सर्व गांवांस पुरवावें असा संकल्प आहे ही मोठ्या खर्चाची बाब आहे ह्मणून मे० निकोलेट साहेब यांस हा प्रश्न तसाच बाजूला ठेवावा लागला होता. पण आतां येथील भरभराटी व श्रीमंती लक्ष्यांत आणून पाण्याची उणीव दूर करण्याचा प्रयत्न पुन्हां होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. या कार्याच्या उभारणी संबंधानें रा. दांडेकर प्रभृति मंडळी उद्युक्त आहेत आणि अशा सत्कार्यास कुमारश्री हरभामजी साहेबहि सरकारी मोठाच आश्रय संपादन करून देतील अशी सर्वांस आशा आहे.

## वऱ्हाडवृत्त

उमरावतीचे सिव्हिल सर्जन डाक्टर रो साहेब हे दीड वर्षाच्या फर्लो रजेवर विलायतेस ह्या आठवड्यांत आणार आहेत.

गेल्या फेब्रुवारीच्या २३ सावे तारखेपासून कै० महमद साहेब नायब तहशिलदार वर्ग १ यांच्या जागीं खालील प्रमाणें बदल्या देण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | नायब तहशिलदारीचा |
|---|---|
| शेखमहमद अबदुल अझीज | वर्ग १ला |
| मिरजा हुसेनअल्ली बेग | वर्ग २ |

सदर्हू रा. रा. शेख महमद अबदुल अझीज हे सध्यां रा. रा. सोराबजी शापुरजी तहशिलदार यांच्या १॥ महिन्याचे रजेमध्यें उमरावतीस तहशिलदारीचें काम पहात आहेत.

रा. रा. जोन्स सुपरिंटेंडंट निसबत ज्युडिशिअल कमिशनर उमरावती यांस पेनशनींत काढल्यामुळें त्यांची जागा वाशिमचे हेडक्लार्क रा. रा. चार्लस साहेब यांस देण्यांत आली.

घरफोडीचा पत्ता — येथील व्यापारी रा. रा. गिरधारीलाल चिमणलाल यांच्या दुकानांतील तिजोरींतून थोड्या महिन्यापूर्वीं ३—४ हजारांचे बंद्रे एकाएकी चोरीला गेले. ह्या चोरीची हकीकत ऐकिली तेव्हांच वाटलें होतें कीं, ही चोरी घरच्याच अंतर्भेद्यानें केली असावी. गिरधारीलाल शेटच्या धोंडोपंत नांवाच्या एका गुमास्त्यानें आपल्या मुलाची मौंजकर्तव्य आहे असें पाहून आपल्या राहत्या घरांतील विहिरींतून तो गुप्त रीतीनें माणसा करवीं धन काढूं लागला. ही बातमी फुटतां फुटतां पोलिसांत जाऊन बद्र्यांतील रुपयांचा पत्ता लागला आहे असें कळतें. येथील चीफसाहेब रा. रा. मन्नुप्रसाद व रा. रा. माधवराव हेडकानस्टेबल ह्यांची फार बारकाईनें चौकशी चालूं असून कदाचित आणखी कांहीं द्रव्यलोभी सावजें सरकारी पिंजऱ्यांत गवसतील असा अदमास आहे.

## वर्तमानसार

**बिनचूक नेम**-इतिहास प्रसिद्ध पृथ्वीराजा चव्हाण याच्या अचूक नेमाच्या आख्यायिका सुप्रसिद्धच आहेत. या सारखीच खालील गोष्ट होय. केळशी येथील रहिवाशी रे. रा. राजाराम सखाराम वर्तक यांनीं आवाज ऐकून नेमकें निशाण मारण्याची कला फारच उत्कृष्ट साध्य केली आहे आहे येथें त्यांनीं त्याचा अनुभव दाखविला त्यांचें कसब खरोखरच थक्क करून सोडणारें आहे. वस्तूकडे पाठ करून बसावयाचें आणि समोरील आरशांत त्या वस्तूचें प्रतिबिंब पाहून पाठी मागील वस्तू गोळीनें टिपून काढावयाची, एका मोठ्या फिरत्या मांड्यांत ठेविलेल्या निरनिराळ्या ४ अदृश्य वस्तूंपैकीं सांगावी त्या रंगाची वस्तू अचूक टिपणें, निरनिराळ्या रंगाच्या हारीनें ठेविलेल्या ४ मांड्यां पैकीं पाहिजे त्या रंगाचें मांडें नुसत्या आवाजावरूनच त्या मांड्याची जागा बदलली तरीही टिपून काढणें, पायानें बंदूक उचलून सुद्धां निशाण मारणें इ. प्रकार प्रेक्षकांस आश्चर्यचकित करून सोडतात.

**एका तासांत १८० मैल गति**-जर्मनींत बर्लिन व हेमबर्ग यांच्या दरम्यान विजेनें चालणाऱ्या रेल्वे करतां एक सडक हल्लीं बांधण्यांत येत आहे. या सडकवर रेल्वे ट्रेन एक तासांत १२० मैल त्वरेनें जाईल असा अंदाज आहे. जर्मनीचें हें उदाहरण पाहून फ्रान्सनें पारीसपासून मार्सेल्स दरम्यान अशाच तऱ्हेची रेल्वे सरू करण्यासाठीं आवश्यक अशा रस्त्याची सर्व्हे करण्याचें सुरू केलें आहे. पण फ्रान्स एका तासांत १२० मैल गतींत संतोष न मानून या सडकेवर एका तासांत १८० मैल ह्मणजे दर मिनिटास ३ मैल गतीनें आगगाड्या धांवविण्याची व्यवस्था करणार आहे.

**दुःखाची आवश्यकता**- जगांत दुःख नसतें, तर आपण आपल्या शारीरिक शक्तीच्या बेतानें कामें केलीं नसतीं व आपल्या सोसण्याच्या बाहेर श्रम केले असते. आपण अगदीं आकंठ जेवलों असतों. मुलें इतकीं धावलीं असतीं कीं, पुनः त्यांना पायाचा उपयोग करतां आला नसता. आपल्या स्नायूंना विश्राति पाहिजे, हें आपणास शारीरिक दुःखानेंच कळतें. हें नसतें तर आपण ते अगदीं निरुपयोगी होईपर्यंत श्रम केले असते. एवंच, जगांत दुःख आहे ह्मणून सर्व व्यवहार सुरळीत चालले आहेत. सर चार्लस बेलसाहेब एक रोग्याबद्दल लिहितात कीं. त्यानें विस्तवांत पडलेला तवा तो अति तापला आहे हें न समजतांच उचलून घेतला व त्याचें हातानें कातडें चांगलें करपलें, तरी त्यास समजलें नाहीं !

**वाऱ्याच्या जोरानें आगगाडी उभी राहते**- स्काटलंडमधील पर्थ स्टेशना पासून उत्तरेकडे जाणाऱ्या आगगाड्या कधीं कधीं ग्रामपियन पहाड ओलांडतांना वाऱ्याच्या जोरानें एकाएकी थांबून उभ्या रहातात.

**लार्ड रिपन**-यांनीं हजारो ढोरास चरण्याकरितां एकंदर २२००० एकर जमीन ठेवली आहे! या सर्व ढोरांचें दूधदही विकण्याचा ते धंदा करीत आहेत ह्मणतात.

**बाराशनकांचें जुनें घर**-जपानांत एक लांकडाचें मोठें घर आहे. तें तयार करून आज १२०० वर्षें होऊन गेलीं. त्यांत जपानांतील कलाकौशल्याचे पदार्थ ठेविले आहेत.

**जपानी वीर**- जपानी शिपायांचें निशाण कधीं चुकत नाहीं. देशांत कोठें काय आहे यांची त्यांना चांगली माहिती असते. २४ तासांत फक्त ३ तास विश्रांति घेऊन ते २१ तास चांगल्या तऱ्हेनें काम करूं शकतात.

**कांचेचा पर्वत**—अमेरिकेंतील वायोमिंग नामक प्रांतांत २९० फूट उंचीची एक कांचेची टेकडी आहे. ही टेकडी अर्धा एक मैल पसरलेली आहे या टेकडीच्या पायथ्याशीं ७५ पासून १०० फुटापर्यंत जाड कांच सांपडतें. हल्लीं तयार होत असलेल्या कांचे सारखीच ही कांच आहे.

**लिंबा संबंधीं उपयुक्त माहिती**—तांदळाच्या भाताला कढ आला ह्मणजे त्यांत थोडासा लिंबाचा रस टाकल्यास भात अगदीं गुरगुरीत मोगऱ्यांच्या कळ्या सारखा पांढरा शुभ्र होतो.

लिंबे थोडा वेळ तव्यावर घालून त्यांना थोडा शेक द्यावा नंतर पिळवीं ह्मणजे रस चांगला दळदळीत निघतो.

अगदीं सुकलेली वाळू घेऊन त्यांत लिंबें दूर दूर एकास एक न चिकटतील अशा रीतीनें पुरून ठेवल्यास तीं महिनेची महिने चांगलीं राहतात. हा अनुभव सर्वांनीं अवश्य घ्यावा.

---

## बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा ! किंमत पाऊण आणा
प्रती घेताच्याच आहेत.

इन्फंट क्लासांतील मुलांस मुळाक्षरांची व दहा अंकाची माहिती लौकर व उत्तम करून देणारें सोपें साधन. रा० शेवडे, जोगदंड, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळीचे अभिप्राय. पुस्तकें मेपर्यंत निघतील. मेचे आंत एक रुपयाची घेणारांस टपाल खर्च माफ.

पत्ता-- नारायण रामचंद्र नागलकर शेगांव
जि० आकोला ( वऱ्हाड )

---

### नोटीस.

रा. महादू वलद शिवाजी लोहार सांगवीकर हल्लीं वस्ती उगवें पोस्ट—उगवें यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, उगवे येथें आमचे घरा शेजारींच तुह्मी मारुती वलद जानबा लोहार यांच्या जागेंत राहात आहा. दोन्ही घरामध्यें एक लहान बोळ आहे तेथें आमच्या छपराचें पाणी पडत असतें. असें असतां तुह्मी आतां तेथें नवीन घर बांधीत आहां व असें करण्यात तुह्मी आमचे छपर मोडून टाकलें आहे. व माझ्या घरच्या चाकरमाणसांस शिवी गाळहि केली. आह्माबरोबर तुमचें वर्तन दांडगाईचें असून वाईट तसें तुह्मी आह्मांस अपशब्दानें बोलतां हें बरें नाहीं हे ध्यानांत ठेवावें. शिवाय तुह्मी तो बोळ बंद करून टाकून माझ्या छपराच्या पाण्याची जागा बंद करणार आहांत तेव्हां कळवितों कीं, तुह्मी आमचे छपर मोडल्यामुळें जें नुकसान झालें आहे तें भरून द्यावें आणि तें छपर नीट करून द्यावें आणि बोळांची पूर्वीप्रमाणें जशाच्या तशीच ठेवावी. असें न करितां जबरदस्तीनें कांहीं कराल तर फौजदारी व दिवाणी कोर्टांतून योग्य दाद मागितली जाऊन त्याचा अखेरपर्यंतचा खर्च तुह्मावर पडेल. कळावें ता० ६।५।०४ इ.

सही

सखाराम दत्तूजी साहू
राहणार उगवें दस्तुर
खुद.

---

### नोटीस.

बेशमी अबदूल अजिझ वलद अबदूल रहिमान हास्पिटल असिस्टंट, हल्लीं वस्ती पेठ बाळापूर यांस:—

खालीं सही करणार यानकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं माझा वडील बंधु दामोदर मोहन पांडे गौड ब्राह्मण हा तुमच्या हाताखालीं कंपौंडर होता. त्यानें हाच्या तेव्याचें खळशींचें शेत २९० रुपयास विकत घेतें. पैशाची सोय नव्हती ह्मणून त्यानें कर्जाऊ रुपये तुमचे काढले व त्या रुपयांच्या तारणार्थ त्यानें खरेदीखत तुमच्या मुलाच्या नावानें करून दिलें. रुदहू कर्जा पैकीं २०० रुपये त्यानें तुह्मास देऊन टाकले. बाकीचे रुपये देण्यापूर्वींच तो प्लेगानें आकस्मात मरण पावला. मरते वेळीं त्यानें सांगितलें कीं तुमचे २०० रुपये दिले, ५० रुपये तुमचे देणें राहिले आहेत आणि १० रुपये त्या तेव्याचे खातें बदलते वेळीं द्यावयाचे आहेत. तो मेल्या नंतर तुह्मी मजजवळून ५० रुपया ऐवजीं ६० रुपये घेऊन वायद्याचे १५ रुपये मिळून ७५ रुपये वसूल केले. शेताचें उलट खरिदी करून मागितलें असतां तुह्मी हांय होय ह्मणून ती गोष्ट विश्वासानें लांबणीवर टाकली. पुढें मी अज्ञान असल्यामुळें तुह्मी लबाडीच्या व्यवहाराला प्रारंभ केला. शेताची खरिदी तर तुह्मी अजून दिली नाहींच पण शेताचा ताबाही दडपून जबरीनें घेतला आहे. ही नोटीस पोचताच शेताची परत खरेदी करून शेत आमच्या स्वाधीन करावें, व गेल्या सालच्या स्वामित्वा बद्दलचा रक्कम चुकती करावी. असें आठ दिवसांत न केल्यास तुह्मांवर दिवाणींत दावा करून या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ६ मे १९०४ इसवी.

सही.

छोटू मोहन पांडे गौड ब्राह्मण
अज्ञान पालन करणार आजी
सुंदरबाई नवजे जगन्नाथ
पांडे राहणार पेठ बाळापूर निशाणी —

---

### नोटीस

बेशमी कन्हयालाल हेमचंद गुजराथी राहणार पेठ बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यानकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं माझा वडील बंधु दामोदर मोहन पांडे याला तुह्मी मौजे काळबाई येथील सर्व्हे नंबर ४ एकर गुंठ १३-२६ आकार रुपये १० चें शेत ४०० रुपयांस खरिदी दिलें; आणि त्या पैकीं रुपये १०० शंभर तुह्माला पोचले आहेत व त्याबद्दलचा तुमच्या वहिखात्यांत जमाखर्च आहे. बाकीचे रुपये ३०० व्याजानें त्याच्याकडे राहिले. तुह्माकडे ते रुपये व्याजासुद्धां आह्मी एका सावकाराच्या मार्फतीनें आणिले असतां तुह्मी तो खरिदीचा व्यवहार पुरा करून शेतीचा ताबा, खरेदीखत, व खात्याचा वर्ग हीं करून दिली नाहींत. नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आत शेताचा व्यवहार संपूर्ण करून न दिल्यास दिवाणी कोर्टामार्फत सर्व नुकसानीसुद्धां एकंदर दाद मागण्यांत येईल. आणि तुम्हास देणें असलेल्या ३०० रुपयांच्या रकमेवर व्याज या तारखे पुढें बंद राहील. कळावें तारीख ६ मे १९०४ इसवी.

सही

छोटू मोहन पांडे गौड ब्राह्मण अज्ञान तर्फे पालन करणार आजी
सुंदरबाई नवजे जगन्नाथ पांडे
निशाणी हातची रेघ—

---

### नोटीस

रा. महादु वलद शिवाजी लोहार राहणार उगवें. यांस :—

मी खालीं सही करणार या जाहीर लेखानें कळवितो ऐसाजे— ५-६ वर्षांपूर्वीं मी अज्ञान असतां माझ्या आईनें आमचें उगवे येथील घर, रा. सखाराम दत्तूजी यांच्या घराजवळील बोळा नजीकचे, ज्यांत सध्या तुह्मी राहत आहा, तें तुह्मांस प्रेमानें चार दिवसासाठीं राहण्यास दिलें होतें. मी एक वर्ष झालें मोताळ्याहून परत आलों व घर खालीं करून मागितलें पण तुह्मी तें खालीं करून देत नाहीं. शिवाय मी भोळा व अडाणी असें पाहून मजपासून तुह्मी एक टिकीट लावून कागद लिहून घेतला आहे त्यांत काय लिहिलें न काय नाहीं हें मला कांहींच माहीत नाहीं. पण त्यांत कांहीं तरी लबाडी असावी व मला कांहीं फसविलें असावें असें वाटतें तर त्या कागदांत काय मजकूर आहे त्याचा खुलासा व्हावा. नाहीं तर मला फसविल्या बद्दल मी तुमच्यावर फौजदारी करीन हें पक्कें समजावें. ही नोटीस पावल्या पासून १ महिन्यांत घर खालीं करून द्यावें नाहीं तर कोर्टांकडून घर ताब्यात घेतलें जाईल. व सर्व खर्च तुह्मावर पडेल.

शिवाय तुह्मी तेथें नवीन इमला उभारणार आहा असें समजतें तर तसें आपण कांहीं करूं नये ह्मणून तुह्मांस या नोटिशीनें मनाई केली असे. यास न जुमानतां तुह्मी घर उठवाल तर त्याबद्दलचे पैसे मी देणार नाहीं व घर ताब्यात घेईन हें समजावें. कळावें. ता० ६।५।०४ इ०

सहीची निशाणी.

संपत वलद मारुती लोहार
राहणार उगवे याची
हातची रेघ—

बोहरगावीं टपालहाशिलांसह ........ २ ८
वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........ ४१ ०६
दुसरे खेपेस .... ......०१

Mofussil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as

dvertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line ,, 2as

REGISTERED No. N

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 16 MAY 1904 NO 19

वर्ष ३८ आकोला सोमवार तारिख १६ माहे मे सन १९०४ इ० अंक १९

## नोटीस

रा० रा० रामकृष्ण योगाजी वेणी राहणार पातूर शेखबाबू तालुका बाळापूर—यास.

खाली सही करणार याजकडून या जाहीर खबरीनें कळविण्यांत येते कीं मला मयत सिलीमखा दाऊदखा सौदागर आकोला यांच्या दुकानाची बाकी देणे होती आणि तुम्ही ९०० रुपये त्यास देण्याचा हवाला घेतला आणि त्या हवाल्याच्या मोबदल्यांत मी तुम्हास माझें आगीखेडें येथील शेत १९०२ सालीं १८ वर्षांच्या कौलपत्यानें दिलें. कौलपट्टा लिहून नोंदून दिला. तुम्ही ती हवाल्याची रकम पटविली नाहीं म्हणून माझ्या त्या शेताबद्दल पुढील सरकारी कारवाई चालू आहे. तुमचा हवाला न पटल्यामुळें तुम्हा जवळ असलेलें पट्टापत्र रद्द व बातल आहे. तें तुम्ही ही नोटीस पोचतांच परत करावें आणि तुम्ही हवाला न भरल्यामुळें माझी जी इतर नुकसानी झाली व पुढें होईल ती सर्व तुम्हाकडून भरून घतली जाईल. या प्रकरणांत सरकार दरबार करावें लागल्यास याचा खर्च तुम्हावर पडेल. कळावें ही विनंती. तारिख १३ मे १९०४ इ०

सही.

नाहर रावत ढवळे राहणार पातूर दस्तुर खुद्द.

## नोटिशीचें उत्तर

नोटीस घेणारी तनसुकदास मारवाडी राहणार दर्यापूर यांस:—

खाली सही करणार इजकडुन नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं तुम्ही वऱ्हाड समाचारांत तारीख २ माहे मे सन १९०४ इसवीचे अंकांत नोटीस दिली त्याचा जबाब देण्यात येतो कीं माझा दुसरा मुलगा हरकचंद व तुम्ही असे दोघे मिळून बत्तीस तिफणची जमीन नेमणूक, खाणेपिणें व कपडालत्ता करितां दिली असें तुम्ही लिहिलें व त्याचा हिशोब पंचास दाखवावा असेंहि तुम्ही लिहिलें. हें तुमचें लिहिणें उपयोगाचें नाहीं कारण तुम्ही व हरकचंद असे उभयतां मिळून मजशीं सेटलमेंट करून नोंदून दिलें त्यात फक्त हद्द जमीन माझे जीवमान असे पर्यंत अन्नवस्त्रा करितां माझे ताब्यात राहणार आहे व त्या दस्तऐवजांत असेंहि लिहिलें आहे कीं उत्पन्नाचा वाटेल त्या रीतीनें खर्च करावा. वरून तुम्हास व पंचास हिशोब दाखविण्याचा मजला काहीं जरूरी नाहीं सदरहू शतावर जें उत्पन्न होतें त्यावर माझी एकट्याची मालकी आहे तुम्हास हिशेब मागण्याचा अधिकार नाहीं. व मीहि हिशोब दाखवीत नाहीं. माझें अंगावर सोन्याचे दागिन्याचे आठ नग आहेत असे तुम्ही लिहितां तर जे काहीं नग माझे अंगावर आहेत ते तुम्ही काहीं घातले नसून माझें भ्रतारापासून माझे अंगावर आहेत ते मी मेलें आहे तोपर्यंत तुम्हास मिळण्याचे नाहींत. माझें स्वतंत्र रीतीनें चालत असलेलें शेताचे कबज्यास हरकत कराल तर जशी सल्ला मिळेल त्याप्रमाणें तजवीज करीन व हा जबाब विनाकारण द्यावा लागला सबब यास लागलेला खर्च तुमचे कडून भरून घेतला जाईल. कळावें. ता. ७।५।०४ इसवी.

सही

आंबाबाई जवजे करमचंद मारवाडी हिचे हातची बांगडी.

## नोटीस.

—:०*०:—

कौतकी मर्द चंद्रभान पाटील गावंडे चिंचोनेवाली राहणार आकोट इजला खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं माझ्या सख्या चुलत भावाची तूं विधवा आहेस त्याचे स्थावर जंगम जिनगीचा मी वारस आहे. तुझा फक्त अन्न वस्त्राचा हक्क आहे. तुझे कांहीं आपमतलबी असे व लबाड लोकांच्या सांगण्यावरून मयत चंद्रभान याचे स्थावर जंगम जिनगीची विक्री गहाण वगैरे अफरातफर करण्याचा तुझा इरादा आहे असें समजतें करितां या नोटिशीनें कळवितों कीं तुम्ही कोणतेही प्रकारें सदरहू जिनगीची विल्हेवाट करूं नये केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. तारीख ९।५।१९०४ इसवी.

सही

रामजी व० भोनाजी पाटील राहणार आकोट दस्तुर खुद्द.

उमरावती; ता० १५।५।०४ इ०

## डा० रो साहेबांचा बहुमान

आमचे येथील सिव्हिल सर्जन कर्नल रो आय. एम. एस. यांनीं दीड वर्षांची रजा घेऊन ते कालच्या गुरुवारच्या संध्याकाळच्या मेलनें विलायतेस स्वदेशी गेले. यांच्या सन्मानार्थ येथील लोकांनीं गेल्या सोमवारीं त्यास इव्हिनिंगपार्टी (संध्या समयींची मेजवानी) दिली. पार्टीचा बेत येथील विश्रांतिगृहांत मोठा उत्कृष्ट ठेविला होता. विश्रांतिगृह उत्तम दीप प्रकाशानें मोठें रमणीय दिसत होतें; स्वागतसूचक तोरणें व कमानीं यांनीं मोठी शोभा आली होती. आंतील दहा पंधरा फूटावर उंच उडणाऱ्या कारंजांतील जल तुषारांनीं व सभोवतालच्या हिरव्यागार कुंड्यांनीं येणाऱ्या मंडळींचीं मनें अत्यंत सुप्रसन्न व आनंदभरित करून त्यांची तहानभूक हरून सोडली. बँडवाजाचे सुस्वर आलाप तर कानास फार गोड वाटत होते. टेनिस कोर्टावर आजच्या समारंभासाठीं म्हणून एक तात्पुरतें नाटकगृह मुद्दाम तयार केलें होतें. साहेब लोकांच्याकरितां एक शामिआना तयार करून तेथें सुंदरशा टेबलावर फळफळावळ मांडली होती.

बरोबर ९॥ वाजतां डाक्टर रो साहेब आपल्या मित्र मंडळीस बरोबर घेऊन तेथें आले. या आनंद प्रसंगास मेसर्स हेअर साहेब, मॉडवी साहेब, मुएल साहेब, मॉरिस साहेब, गॉडविन आस्टीन साहेब, क्यांडी साहेब, डायर साहेब आदिकरून युरोपियन गृहस्थ आणि मिसेस जोन्स आदि करून युरोपियन स्त्रिया मुद्दाम आल्या होत्या. तसेंच रा. रा. दादा साहेब खापर्डे, बंधूजी जनार्दन, अण्णा साहेब तळवळकर. आरदेसर दिनसाजी चिनाय जमनादास भाई श्राफ, नवाब मीर मेहेदी खान माजिस्ट्रेट साहेब आदि करून वकील मंडळी, व्यापारी मंडळी, पारशी व मुसलमानी मंडळी मिळून बहुजन समाज दीडशें दोनशेंवर जमला होता. रा० दादा साहेब खापर्डे यांनीं सर्वांचें स्वागत केल्यावर डा० रो साहेबांच्या स्तुतीपर अशीं पद्यें तयार केलेल्या रंगभूमीवर मित्रसमाजाच्या नाटक मंडळीनीं म्हटलीं आणि ताराविलास नाटकाचा दुसरा अंक करून दाखविला. नंतर ११॥ वाजतां साहेब मंडळी शामिआनामध्यें फराहार करण्यास गेली आणि इतरेजन टेनिस कोर्टावर एकीकडे पद्धा स्वस्थ राहिली. पुढें साहेब लोकांच्या भोजनें चा विडे, हारतुरे व अत्तर गुलाब हे चंद्रम्याचे तीव्र दैदिप्य प्रकाशांत वाटल्यावर समोरील मैदानांत दारूकाम पहाण्यासाठीं मंडळी उठली. नळे, चंद्रज्योती, झाडे, तारे, बार वगैरे दारूकाम प्रेक्षणीय होतें. दारूचें काम खुद्द येथेंच केलें होतें. येणेंप्रमाणें २॥ तासाचा समय मोठ्या आनंदांत घालवून सर्व मंडळी १२ चे सुमारास स्वगृहीं गेली. या समारंभाच्या कामीं आमच्या येथील डाक्टर भट एल. आर. सी. पी. आणि डाक्टर चिखलया हास्पिटल असिस्टंट यांनीं फार परिश्रम घेतले.

कालरोजीहि म्हणजे गुरुवारीं संध्याकाळचे ४ चे सुमारास येथील स्टेशनावर रो साहेबांसाठीं पानसुपारीचा थाट करण्यांत आला. निशाणांनीं, तोरणांनीं, व फुलझाडांच्या कुंड्यांनीं स्टेशन मोठें सुशोभित दिसत होतें. स्टेशनवर बहुतेक आफिसर मंडळी आली असून नवीन सिव्हिल सर्जन डाक्टर फौलर साहेबहेहि आले होते. यांनी व गांवांतील कांहीं प्रमुख गृहस्थांनी डाक्टर रो साहेबांनीं ओळख करून दिली. रीतीप्रमाणें हारतुरे झाल्यावर जमलेल्या लोकांचा निरोप घेऊन डाक्टर रो साहेब आगगाडींत बसले आणि रुळावर ठेविलेले फटाके उडवीत उडवीत गाडी मोठ्या आह्यतेनें निघून गेली.

डाक्टर रो साहेब हे फार लोकप्रिय होते. आज बरीच वर्षे ते येथेंच सिव्हिल सर्जनचें काम करित होते हे मोठे अनुभवी असून लोकांच्या दुःखाची जाणीव यांस चांगली असे. यांच्या हाताला यश आहे. असें सर्वजण बोलतात. प्लेगाच्या दिवसांत यांच्यावर लोकांची फार भिस्त होती आणि यांच्यामुळें येथील लोकांस त्या वेळीं विशेष त्रास झाला नाहीं.

## काबुली कावा

काबूलच्या अमीर साहेबांनीं सरहद्दी प्रकर्णाबद्दल एक चमत्कारिक निकाल सांगितला. अमिरानें सरहद्दीवरील लोकांची सभा भरवून त्यांस भर सभेंत सांगितलें कीं, एका बाजूनें इंग्रज व दुसऱ्या बाजूनें रशिया हे दोघे आपली सरहद्द निश्चित करण्याबद्दल आपणास सांगत आहेत तर तुमचें मत काय आहे तें कळवा. हें भाषण ऐकून जमलेल्या लोकांनीं उत्तर केलें कीं, मागें अमिरांनीं आम्हांस न विचारतां आमचा प्रांत इंग्रजांस देऊन टाकला ही गोष्ट आम्हास आवडली नाहीं. पण त्यांच्या मनाविरुद्ध आम्हांस काहीं च करितां येईना. आपणासही कांहीं प्रांत कोणाहि इतर राष्ट्रास द्यावयाचे असतील तर आम्ही काय बोलू शकणार ! परंतु जर कोणी आपला देश आपल्यापासून हिसकावून घेत असेल तर, आम्हांस तुम्ही शस्त्रांची वगैरे चालीच यांचें योग्य परिचय केल्या शिवाय आम्ही स्वस्थ बसणारच नाहीं. हें बोलण्याचें उत्तर अमिरानें लिहून घेऊन त्यावर त्यांच्या सह्या घेऊन तो खलिता इंग्रजसरकाराकडे पाठविण्यासाठीं म्हणून मुद्दाम पाठविला आहे म्हणतात. यां प्रश्ना बरोबर दुसऱ्याहि एका प्रश्नाचा उलगडा यानें केला आहे. मला इंग्रजसरकार हिंदुस्थानांत येण्याविषयी पुष्कळ दिवसापासून बोलावीत आहेत तर मी जाणें रास्त आहे की नाहीं याचा विचार करून मला सांगा म्हणून आपल्या मंत्रिमंडळास त्यानें सल्ला विचारली. यावर त्या मंत्रिमंडळीची अशी सल्ला ठरली कीं आपल्यास राज्यांत अद्याप बरोबर स्थिरस्थावर झालेले नाहीं तर अशा वेळीं आपण बाहेर जाणें बरोबर होणार नाहीं. हेंच उत्तर आतां इंग्रज सरकारास मिळणार आहे. या वरून अमिराचें धोरणी कारस्थान सहज समजण्या सारखें आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेठ शुद्ध १ शके १८२६

## पुनश्च रुदितम्.

( इनकमटॅक्सवरील आक्षेप. )

उत्पन्नावरील करा संबंधानें आमच्या प्रांताचा मोठा आक्षेप आहे, आणि या बाबतींत सरकारांनीं लोकांच्या ह्मणण्याचा अवश्य विचार केला पाहिजे. हा बादशाही कर या प्रांताला अगदीं नवीनच आहे आणि तो कर इकडे अमलांत आणण्या पूर्वी लोकमत कांहीं विचारण्यांत आलें नव्हतें. हा कर लागू केल्या विषयींचे हुकूम सुटले तेव्हा च त्या संबंधानें चर्चा करण्याचा अधिकार आह्मांस पोंचला असें आह्मी समजतों. वराती पाठी मागून जसा घोडा सजवून उभा करावा तद्वतच आमचे लेख आहेत असें वाटण्याचा संभव आहे पण त्या बाबतींत आमचा इलाज नाहीं. जेथें नवीन कर एकदम बसविण्यांत येतात तेथें त्या करासंबंधानें प्रतिकूल टीकाही मागाहूनच आली पाहिजे हें उघड आहे. अर्थात् आमच्या लेखांचा उद्देश असा आहे कीं, जर सरकारास आमचे विचार पसंत पडतील तर त्यांनीं हा बसविलेला कर रद्द करावा; पण या प्रकरणीं निदान लोकांच्या मनोदयाला अनुरूप असा सरकारचा अभिप्राय पडेल अशी आशा फारशी आह्मांस वाटत नाहीं. तरी पत्रकाराच्या संकल्पाला धरून आह्मी हा सार्वजनिक विषय मुद्दाम हातीं घरला आहे. आमच्या ह्या प्रयत्नाला आह्मी पूर्वीच अरण्यरुदिताची उपमा दिलेली आहे. तथापि आमच्या लेखाबद्दल रोष न करितां त्यांतील तथ्यातथ्याची निवड करावी अशी सरकारापाशीं आमची विनंती आहे.

हा बादशाही कर सर्व इंडिया भर प्रचलित आहे, असें असतांना आमच्या वऱ्हाडासारख्या लहानशा प्रांतवाल्यांनीं त्याबद्दल आक्षेप घ्यावेत हें गैरशिस्त आहे आणि साम्यतेच्या न्यायानें तर हा कर या प्रांतींहि बसविण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं असेंहि प्रतिपादन केल्याचें आमच्या ऐकिवांत आहे. साम्यतेच्या तत्त्वावर रचलेला हा कोटीक्रम पुष्कळशा बाजूंनीं चुकीचा आहे.

हा उत्पन्नावरील कर अगोदरच इंडियामध्यें पुष्कळशा कारणामुळें त्याज्य आहे. या देशांमध्यें शेती शिवाय धनोत्पादक उद्योग धंदे फारसे नाहींत आणि त्या मुळें हा उत्पन्नावरील कर या देशांत कोठेंहि बसविण्या सारखा नाहीं. आणि जर कांहीं कर कमी करण्याची पाळी येईल तर प्रथमतः हाच कर कमी करण्यांत येईल अशीं अभिवचनेंहि सरकारनें पुष्कळदां दिलेलीं आहेत आणि याच धोरणाला अनुसरून उत्पन्नावरील कराची अंतिम मर्यादा ५०० रुपयांची होती ती १००० पर्यंत नेल्याच वर्षी वाढविण्यांत आली; आणि सरकारी खजिन्याची भरभराटी अशीच कायम राहील तर हा कर अनिबात बंद करण्याचें आश्वासन सरकारांतून देण्यांत आलेलें आहे. खजिन्याची तूट भरून काढण्याकरितां निरुपायानें हा कर सरकारनें चालू केला आणि सध्यां अंशतः तरी ह्या कराचें ओझें सरकारनें हलकें केलें आहे त्या अर्थी हा त्याज्य कर विद्यमान काळीं वऱ्हाडाला तरी नव्यानेंच लागू करण्याची गरज नाहीं हें निराळें सांगणें नकोच. शिवाय या कराचें मावंड ह्मणून पूर्वींपासूनच जर टाऊन फंडाचा कर इकडे अमलांत आहे तर हा जबर बादशाही कर आमच्या प्रांतावर लादावा इतकी या प्रांताची सांपत्तिक स्थिती वाढत्या कळेवर नाहीं. त्या शिवाय हा प्रांत निव्वळ शेतीचाच असल्यामुळें या प्रांताला हा बादशाही कर बिलकुलच झेंपणार नाहीं. सारांश, साम्यतेचा न्याय चांगल्याच गोष्टींना लागू करितात ह्मणजे एका ठिकाणची फक्त चांगलीच गोष्ट अन्यत्र सुरू करावी हाच शिष्ट मार्ग होय. पण त्या साम्यतेच्या न्यायाची व्याप्ती त्याज्य गोष्टींचें इतरत्र अनुकरण करण्याकडे लागू करणें बरोबर नाहीं. याच दृष्टीनें आह्मी ह्मणतों कीं, उत्पन्नावरील कराचा कायदा आमच्या प्रांताला लागू करण्यांत येऊं नये. किंबहुना, हा कर जर दुसऱ्या प्रांतीं त्याज्य व निरुपायाचा असा लेखिला असून हा खजिन्याची तूट भरून काढण्या पुरताचा बसविला आहे असा जर सरकारी अभिप्राय आहे तर त्याच विचारसरणीनें असें स्पष्ट सिद्ध होतें कीं, वऱ्हाडासारख्या दांडग्या उत्पन्नाच्या प्रांतांत, पुष्कळशा खर्चाच्या बाबी कमी करण्याचें सत्र चालूं असतांना, राज्यकारभाराच्या कार्याचें निमित्त दाखवून आजपर्यंत कधींच न बसविलेला हा उत्पन्नावरील जबरदस्त कर इकडे एकदम चालूं करावा हें युक्तीला मुळींच जुळत नाहीं. या करा संबंधानें नुसतें प्रांतिक साम्य ठेवण्यापेक्षां या कराच्या युक्तायुक्ततेच्या विचारांचें साम्य इकडे ठेवावें असें इंडिया सरकारास आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे.

या बादशाही करा संबंधानें दुसरा एक महत्वाचा आक्षेप आहे आणि त्याचा विचार कायद्याच्या दृष्टीनें करावयाचा आहे. या मुद्यासंबंधानें आह्मी पूर्वींच पुष्कळ वेळां उल्लेख केलेला आहे तथापि त्याची पुनरावृत्ती फार जरूरीची आहे. इनकॅमटॅक्सच्या कायद्यामध्यें असें स्पष्ट सांगितलें आहे कीं या कायद्याची अंमलबारी ब्रिटिश इंडियामध्यें होईल, शिवाय ब्रिटिश सरकारच्या साम्राज्याखालीं नेटिव संस्थानांतून जो इंडिया सरकारचा आमला राहील त्यांतील सरकारी चाकरांसच हा कायदा लागूं आहे. आणि या शेवटच्या कलमान्वयें आमच्या प्रांतांतील फक्त सरकारी चाकरांसच हा कर आज पावेतों द्यावा लागत असे आणि बिन—सरकारी अशा इतर प्रजाजनांवर हा कर लादण्यांत येत नव्हता. या कायद्याच्या व्याप्तीच्या कलमान्वयें पूर्वी जसा हा कायदा वऱ्हाडला लागूं होत नव्हता तसाच तो आताहि पण लागूं होत नाहीं असा कित्येक कायदे पंडितांचा अभिप्राय आहे. आमच्या सामान्यदृष्टीनेंहि वऱ्हाड प्रांत हा पूर्वी जसा अमानी मुलुख ह्मणजे निजाम सरकारचा मुलुख गणला जात असे तसाच तो अजूनहि निजाम सरकारचाच आहे. कौलपत्र्यानें ह्या प्रांताचें स्वामित्व निजाम सरकाराकडेच राहतें. सध्यां हा प्रांत जरी मध्यप्रांताच्या स्थानिक सरकाराकडे वहिवाटीला दिला आहे तथापि त्याचा समावेश ब्रिटिश इंडियांमध्यें कांहीं होऊं शकत नाहीं. आणि जो मुलुख 'ब्रिटिश इंडिया' या संज्ञेखालीं येत नाहीं त्यांतील सरकारी चाकराशिवाय इतर कोणीहि गृहस्थ हा कर देण्याला पात्र नाहीं. शिवाय कायद्यामध्येंहि ब्रिटिश इंडिया खेरीज इतर प्रांतांना हा कायदा लागूं करण्याचा अधिकार इंडिया सरकारास या कायद्यानें दिलेला नाहीं; तेव्हां इतर कायद्याप्रमाणें हा कायदा या प्रांतास लागूंच होत नाहीं असा तज्ज्ञ पंडितांचा अभिप्राय पडतो. आणि अशीच जर खरोखर स्थिती आहे तर १९०४ सालापासून हा कर या प्रांतास लागूं केला तर ही मोठी चूक होय. आतां हें खरें कीं हा आक्षेप निवळ कागदी आहे याचें निरसन करण्याची शक्ती सरकारच्या हातींच आहे आणि त्या शक्तीचा उपयोग केव्हांहि करण्यास ते समर्थ आहेत आणि ह्मणूनच आमचा जोर या मुद्यावर विशेषसा नाहीं.

एकंदरीनें या बादशाही कराला आह्मी लायक नाहीं. हा कर इकडे चालूं करण्याची गरज दिसत नाहीं, कां कीं या प्रांताचें उत्पन्न नवीन साऱ्याच्या आकारणीमुळें पुष्कळसें वाढविलेलें आहे आणि पूर्वींचें उत्पन्नहि दांडगेंच आहे. तेव्हां राज्यकारभाराच्या दृष्टीनें हा कर लोकमान्य होण्यासारखा नाहीं. लोकस्थितीच्या बाजूनें पाहतां लोक सुखसंपन्न नाहींत, त्यांची दैना मोठी असून ती वाढत्या प्रमाणावर आहे आणि चालू नानाविध करांच्या बोजानें ते इतके ग्रस्त आहेत कीं, त्यांच्याकडून दुसरा कोणताहि कर या पुढें तोलवणार नाहीं. अशा स्थितींत त्यांच्यावर हा भारी व निर्वाणीचा कर बसवावा असें कोणतेंहि सूज्ञ सरकार प्रतिपादन करणार नाहीं. अर्थशास्त्राच्या दृष्टीनेंहि हा कर गर्हणीय होय. आमच्या प्रांतांत जर शेतीच्या मालाच्या सामान्य व्यवस्थेशिवाय दुसरा कोणताच धनोत्पादक धंदा चालत नाहीं तर हा नवा कर ह्मणजे एका प्रकारचा अप्रत्यक्ष दुसरा साराच होय. ह्मणजे या करानें शेतीवर आणखी एक नवीन कर बसविल्या सारखें होणार आहे. शेतीवर साऱ्याशिवाय दुसरा कर असूं नये असा सरकारचाहि हेतू आहे आणि तो हेतू अबाधितपणें कायम राखण्यासाठीं निदान या प्रांतावर हा नवीन कर बसविण्यांत येऊं नये अशी आमची आग्रहाची सरकारापाशीं विनंती आहे.

---

## क्रमिक पुस्तकें.

( वऱ्हाडची प्राथमिक पाठमाळा. )

आमच्या प्रांतांत प्राथमिक शाळांतून जीं पहिलीं तीन पुस्तकें चालतात तीं इतर प्रांतांतून इकडे आणिलेलीं नसून या प्रांताकरितांच मुद्दाम तयार करण्यांत आलेलीं होतीं. वऱ्हाडच्या प्राथमिक पाठमालेंत ही विशेष गोष्ट आहे कीं, इकडील लोकस्थितीला अनुरूप असे पुष्कळसे धडे मुद्दाम या पुस्तकांतून घातलेले आहेत. शेती संबंधाची माहितीहि या पुस्तकांत अधिक सांपडेल. या शिवाय गांवच्या कामदार लोकांना लागणारी माहिती व इतर व्यवहारोपयोगी गोष्टीहि या पुस्तकांत दिलेल्या आहेत. मुंबई इलाख्यांतील क्रमिक पुस्तकां पेक्षां हीं वऱ्हाडचीं पुस्तकें पुष्कळ अंशानें अधिक ग्राह्य होतील असें आमचें मत आहे. भाषेच्या दृष्टीनेंहि हीं पुस्तकें मुंबईकडील पुस्तकांना मागें सारतील. या पुस्तकांतील निरनिराळ्या धड्यांची योजना इतकी उत्कृष्ट साधली आहे कीं, क्रमाक्रमानें वर वर शिकत जाणाऱ्या विद्यार्थ्याला ते धडे सुगम वाटतात आणि निरनिराळ्या धड्यांच्या पायऱ्या चढत जात असतांना त्यास वाचनाची गोडी साहजिक लागत जाते. अशी ही चांगली पाठमाला असून ती अनिबात बंद करण्यांत येणार आहे असें आह्मी ऐकितों. ही प्रांतिक पुस्तकमाला बंद करून त्या ऐवजीं मध्यप्रांतांतील पुस्तकें सुरूं करण्याचा सरकारी विचार आहे. मध्यप्रांतांतील पुस्तकें आमच्या अवलोकनांत आलीं नाहींत तेव्हां त्यांच्याशीं इकडील पुस्तकांची तुलना आह्मी सध्यांच करूं शकत नाहीं. पण ही गोष्ट खास आहे कीं इकडील पुस्तकें बंद करण्या लायक नाहींत. कदाचित त्यांत जीं दोष स्थळें असतील तीं सुधरून घेण्याचा विचार स्थानिक सरकारानें करावयास पाहिजे असें आमचें मत आहे. हीं पुस्तकें कै. रा. रावबहादुर श्रीराम भिकाजी जठार, व कै. वा. यजाबा रामचंद्र प्रधान आणि रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी व रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट यांनीं त्या वेळच्या स्थितीला अनुसरून रचलेलीं आहेत. त्या वेळची अशी योजना होती कीं, प्राथमिक चार यत्तांमध्यें बहुतेक सर्व व्यवहारिक शिक्षण विद्यार्थ्यांस मिळावें. त्या वेळेच्या या गरजेला धरून या क्रमिक पुस्तकांतील धडे लिहिलेले होते. सध्यांच्या स्थितीला पुष्कळशा सुधारणा यांत करण्या सारख्या आहेत. मुंबई इलाख्यांत सध्यां क्रमिक पुस्तकें सुधारण्या संबंधीं खटपट चालूं आहे तशीच इकडेहि खटपट केली असती तर रा. अण्णासाहेब महाजनी व बाळकृष्ण शास्त्री बापट या दोघां गृहस्थांनीं वऱ्हाडचीं पुस्तकें सुधारण्याच्या कामाला चांगली मदत केली असती. हल्लीं मुंबईकडे सातही क्रमिक पुस्तकांत फेरफार करण्याचें काम चालूं आहे. आणि मराठी ६ व्या पुस्तकासाठीं इतिहासपर व बोधपर गोष्टी लिहिण्याचें कार्य रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्याकडे देण्यांत आलें आहे. अशा उत्कृष्ट ग्रंथकाराची मदत साहजिक मिळण्यासारखी असून तिचा उपयोग आमचें स्थानिक सरकार वऱ्हाडांतील क्रमिक पुस्तकें सुधारण्याकडे करून घेणार नाहीं तर ही गोष्ट कांहीं बरोबर नाहीं. सारांश, वऱ्हाडची क्रमिक पुस्तकें बंद करण्याचा जो बूट निघाला आहे तो कोणासहि पसंत पडणार नाहीं. इकडील

चांगलीं पुस्तकें बंद करून मध्यप्रांतांतील पुस्तकें नव्यानें चालू करण्याचा द्राविडी प्राणायाम नको असें आह्मांस वाटतें. प्राथमिक शिक्षणाची तऱ्हा या प्रांताची जशी वेगळी आहे तशीच ती कायम राखण्यांतहि पुष्कळ फायदे आहेत. पुष्कळ वर्षांपासून चालत आलेला क्रम बदलणें केव्हांहि फायदेशीर नसतें आणि मध्यप्रांतांतच दोन प्रकारच्या प्राथमिक पाठमाळा सारख्या चालूं राहिल्यानें उभय पद्धतींचे विशेष गुणधर्म चांगले कळून येतील आणि परस्परांच्या सुधारणे-साठिंहि ही गोष्ट विशेष कारणीभूत होईल.

## रताळूं

अशी समज आहे कीं देशी रताळूंपेक्षां अमेरिकन रताळूं इंडियाच्या जमिनींत चांगलें पोसलें जातें. अमेरिकन रताळूंचा कंद फार मोठा येतो आणि तो गोडीलाहि अधिक चांगला असतो असा महाराष्ट्रांतील कित्येक भागांतील अनुभव आहे असें पूर्वीं ऐकिलें होतें. अमेरिकन रताळूंचें पीक या प्रांतींहि कसें काय येतें याचा अनुभव घेण्यासाठीं आमच्या जिल्ह्याचे पूर्वींचे डेप्युटी कमिशनर रा. रा. रुस्तुमजी साहेब यांनीं कांहीं लोकांस मुद्दाम सांगितलें होतें. आणि डिस्ट्रिक्ट इनस्पेक्टर आफ अग्रीकलचर यांच्याकडून त्यांनीं अमेरिकन रताळूंचे वेल मुद्दाम तयार करविले आणि त्या वेलांच्या पुष्कळशा कांड्या कांहीं खानगी शेतांतून पेरण्यास दिल्या. या प्रयत्नांपैकीं एक दोन प्रयत्नांची हकीकत आह्मांस जी कळली आहे ती लोकोपयोगासाठीं आह्मी आज प्रसिद्ध करीत आहों. या प्रयत्नास आरंभ करून सरासरी ८ महिने होत आले. सध्यां रताळूंचें जें पीक आलें आहे तें फारसें समाधानकारक नाहीं. या अमेरिकन रताळूंपेक्षां देशीच रताळूंचें पीक अधिक जोरदार येतें असें शेतकरी सांगतात. सध्यां जमिनींतून काढलेलें रताळूं पुष्कळ गिराचें व चांगलें लठ्ठसें नसून अगदीं बारीक व निसत्व आहे. गोडीलाहि हें रताळूं बेचव लागतें. देशीच रताळूं फार गोड असतें. पिकाच्या मानानेंहि या अमेरिकन रताळूंचें पीक फायदेशीर नाहीं. देशी रताळूंचें पीक याच्या दिडी दुपटीनें येतें.

वरील हकीकतीवरून हा प्रयत्न फसला असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. तथापि ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं अमेरिकन रताळूंला कोणच्या प्रकारची जमीन लागते, त्याला कोणत्या विशिष्ट गुणाचें खत लागतें, त्याची लागवण कोणत्या विशिष्ट मोसमांत करावयाची असते व त्याची जोपासना करण्याचे कांहीं विशिष्ट प्रकार आहेत कीं काय या संबंधाची माहिती कांहींच अद्याप मिळालेली नाहीं आणि आमच्या मतें ही माहिती मिळाल्यानंतर तिच्या धोरणानें हा प्रयत्न व्हावयाला पाहिजे होता आणि तसा प्रयत्न करून पाहिल्याशिवाय अमेरिकन रताळूंच्या उत्पन्नाविषयीं कांहींच ठाम असा अभिप्राय देतां येत नाहीं. आह्मी असें सूचवितों कीं, अमेरिकन रताळूंच्या लागवडी संबंधाची माहिती सरकारांनीं गोळा करून ती लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केल्यास ठीक पडेल.

## प्राथमिक शिक्षण

मध्य प्रांतांतील प्राथमिक शिक्षणांत पुष्कळसा फेरपालट होणार आहे असा रंग दिसतो. तिकडे असा फरक करण्यांत येणार आहे कीं, शेतकरी विद्यार्थ्यांच्या शाळा फक्त तीन घंटेपर्यंत दररोज उघड्या ठेवाव्या, शारीरिक व्यायामासाठीं त्यांस देशी मल्लविद्या शिकवावी आणि त्यांच्या हातून प्रत्येक शाळे भोंवतीं कृषिकर्म शिकविण्यासाठीं एक एक बगीचा तयार करवावा. या तीन गोष्टी प्राथमिक शाळांतून प्रचलित करण्याकडे स्थानिक सरकाराचें मुख्य धोरण आहे. या तिन्ही गोष्टी आह्मांसही फार महत्वाच्या व जरूरीच्या वाटतात. मध्य प्रांतांत कागदी डामडौल विशेष असतो तसा प्रकार वरील फेरफारा संबंधानें होऊं नये अशी आमची मनापासून इच्छा आहे.

लहानपणीं शालागृह मनापासून नको असतें. खेळावयाचें मैदान मोठें प्रिय वाटतें. पुस्तकी विद्या ग्रहण करण्यापेक्षां बालोद्यान पद्धतीनें विद्याशिक्षणाकडे स्वाभाविक कल जातो. सहा सहा तास शाळेंत कोंडून घेण्याकडे मनाची प्रवृत्ती नसते. शाळेस जाणारीं मुलें शेतीच्या कामाला व बाह्य सृष्टींतील इतर कामधंद्याला नालायक होतात असा मोठा आक्षेप मुलांच्या आईबापाचा असतो. आणि ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं, शाळागृहाच्या थंड छायेंत सर्व काल घालविणाऱ्या विद्यार्थ्यांस नैसर्गिक उन्हाचा ताप किंवा थंडी सहन होत नाहींशी होते. एका प्रकारें थंडी किंवा उन्ह सहन करण्याच्या त्यांच्या अंगांतील शक्तीच मरतात असें ह्मटलें असतां चालेल. वरील अडचणी दूर होण्याला अर्ध्या दिवसाची शाळा फार चांगली असें आह्मांस वाटतें; आणि याच विचारानें आह्मी तीन धंद्यांच्या शाळा चांगल्या पसंत करितो.

दुसरी सुधारणा—देशी मल्लविद्या थोड्या खर्चाची आहे. देशी खेळांला सामानसुमान फारसें लागत नाहीं आणि व्यायामही चांगला होतो. विद्यार्थ्यांची शरीर कांठी मजबूत राखण्याला मल्लविद्येची फार अवश्यकता आहे पण ती शिकवितांना तिचा कंटाळा न येईल अशा विषयीं विशेष खबरदारी घेण्यांत आली पाहिजे. निम्म्या दिवसाची शाळा झाल्यानें शारीरिक संपत्तीकडे लक्ष पोंचविण्यास विद्यार्थ्यांस व शिक्षकांस चांगली फुरसत सांपडेल.

तिसरी सुधारणा शाळागृहाला जोडावयाच्या बगीच्या विषयींची आहे. फुलझाडें लावणें, भाजीपाला तयार करणें व शेतीचीं पिकें उत्पन्न करणें या गोष्टी या बागबगिचांत शिकविण्यांत येतील. आमच्या शेतीच्या प्रांतांत हें शिक्षण फार आवश्यक आहे हें कोणीही कबूल करील आणि त्याची सोय खरोखरच प्राथमिक शाळांतून करण्यांत येईल तर त्यापासून पुष्कळ बाजूंनीं फायदा होण्यासारखा आहे.

## लढाईची बातमी.

गेल्या आठवड्यांतील लढाईची विशेष अशी बातमी कांहीं नाहीं. यालू नदीवरील जयामुळें दक्षिण म्यांचुरिआंतील मान्याच्या जागा जपानी लोकांच्या हातांत पडल्या असून ते पुढें पुढें सरकत आहेत. फेंग हॉंग-चॅंग हें ठिकाण जपाननें रशियापासून सर केलें. तसेंच जपानचें दहा दहा हजार सैन्य किंचो व फ्यूचॅन येथें असून पिटाओ येथें ७ हजार सैन्य येऊन थडकलें आहे. पोर्ट-आरथरचा वेढा अद्याप कायम आहे व त्यामुळें सध्यां समुद्रावर जपानास रशियापासून भीति उरलेली नाहीं.

जपाननें आपल्या झालेल्या जयाबद्दल राजनगरींत मोठा उत्सव केला जपानचे लोक विजयामुळें धुंद झाले नाहींत ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. कोरियांतील जपानी सैन्याची शिस्त व आत्मसंयमन हीं फारच वाखाणण्या लायक होत. त्यांची शिधासामुग्री फार तुटपुंजी असतांहि हे शिपाई मुळींच लुटालूट करीत नाहींत. व दोन जपानी कामगारांजवळ नियमापेक्षां जास्त सामान निघाल्यामुळें त्यांस तोफेच्या तोंडींहि देण्यांत आलें.

ह्या लढाई संबंधानें एक जपानी मुत्सद्दी ह्मणतात कीं, रशियास चित करण्याची किंवा लढाईचा भयंकर होणारा शेवट अजमावण्याची जपानची इच्छा मुळींच नाहीं. लढाईमुळें राष्ट्राची सर्वतोपरी फार मोठी हानि होत आहे ही गोष्ट जपान समजून आहे. पण आशियांतील राष्ट्रांना पादाक्रांत करण्याचा जो रशियाचा मदोन्मत्तपणा आहे तो जिरवावयाचा आहे. आणि या साठींच पोर्टआर्थर आणि व्ह्लॅडीव्हॉस्टाक हीं ठिकाणें सर करून कोरियांतील रशियाचा पाय पुरता उठवल्यावर तह करण्यास जपान तयार आहे. पण तों पर्यंत जपान माघार घेऊं इच्छीत नाहीं.

इकडे रशियाच्या सैन्याची जपानच्या होणाऱ्या जयामुळें पोंठी गाळण उडून गेली आहे व त्यांस एक प्रकारची दहशत बसली आहे. पुढें सरसावलेल्या जपानचा पाय तोडावा ह्मणून रशिया तयारी करितच आहे आणि खुद्द झार साहेबांनीं आपले खाजगी ८ कोटी पौंड या लढाई प्रीत्यर्थ रशियन राष्ट्रास बिनव्याजी देण्याचें कबूल केलें आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— दिवसा उन्हाचा ताप फार प्रखर असतो पण यंदाच्या हवामानांत हें विशेष आहे कीं, रात्रीं हवेंत थंडावा लौकर येतो. वारा फार तुफानचा असतो आणि मधून मधून रितें ढगहि पुष्कळ जमतात. कदाचित यंदा वर्षाकालाला प्रारंभ लौकर होईल असें वाटतें. रोगराई बिलकूल नाहीं.

रा. रा. हेअर साहेब कमिशनर यांच्या चाकरीची मुदत जून महिन्याच्या अखेरीला पुरी होते तेव्हां ती मुदत ते पुन्हां वाढवून न घेतां विलायतेस पेनशन घेऊन जाणार आहेत.

राय बहादूर मनसुखराय ए. अ. कानसव्हेटर उमरावती यांची ३ महिन्यांची हक्काची रजा ता० १ जुलै पासून मंजूर करण्यांत आली आहे.

राव साहेब गणपत बाबाजी सहस्त्रबुद्धे बी. ए. ए. अ. क. सेक्रेटरिएट नागपूर यांचें तिकडील स्पेशल ड्यूटीचें काम संपल्यावर त्यांच्याकडेस दुसरी स्पेशल ड्यूटी देण्यांत येणार आहे. हे दुसरें काम असें कीं, वऱ्हाडचे वार्षिक रिपोर्ट व तक्ते हे मध्य प्रांतांतील चालूं नमुन्यावर आणवून त्यांची आवश्यक छाटाछाट करावयाची आहे. या शिवाय मध्य प्रांतांतील निरनिराळ्या खात्यांची म्यानुअलें वऱ्हाडास लागूं करितांना जे जरुरियात फेरफार करावे लागतील तत्संबंधाची कामगिरी यांच्याचकडे सोपविली आहे.

**उदार हस्त**— 'ज्ञानप्रकाश'कार लिहितात कीं, अंदुरें (वऱ्हाड) येथील राजमान्य व लोकप्रसिद्ध रावसाहेब खुशालराव देशमुख यांनीं आमचे पुणें येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परमनंट फंडास २००० रुपये दिले असें खातरीलायक आधारावरून कळतें. मोठी स्तुत्य गोष्ट ! असे उदार पुरुष निपजल्यास विद्याप्रसाराचें काम लीलेनें होणार आहे. परमेश्वर करो आणि रा. सा. खुशालरावांसारखे पुष्कळ पुरुष होवोत.

## नोटीस

बेशमी रा० रा० मोतीराम रंगारी नवलखे वस्ती कोळंत्रे तालुके मलकापूर यांसः— बाळापूर पेठ येथील भावसार रंगारी पंच लोक याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी बाळापूर पेठेंतील रंगार हटींत गंधर्व करून त्याबद्दल पंचायती धाव वगैरे रुपये १२॥ साडेबारा दिले नाहींत तर ही नोटीस पावताच रुपये देऊन पावती घ्यावी. असें न कराल तर दिवाणी कोर्टात दावा करून नोटीस खर्च व सर्व खर्च समेत रुपये घेऊं आणि बेअदबी केल्या बद्दल कायदेशीर तजवीज केली जाईल. कळावें मिती वैशाख वद्य १४ शनिवार संवत १९६० तारीख १४।५।०४ इसवी.

सही

१ रामचंद्रसा वल्लद तुकाराम महाजन निशानी खुद्द

१ तुकारामसा भवानसा दस्तुर खुद्द

१ भोलासा वल्लद कासीराम दस्तुर खुद्द.

१ छली वल्लद बाळासा रंगारी दस्तुर खुद्द.

१ मारुती वल्लद महेसा रंगारी दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

**पुनर्विवाह**- मिती वैशाख वद्य ६ ता. ५ मे गुरुवार रोजीं नागपुरास रा. ब. वामनराव कोल्हटकर यांचे घरीं एक पुनर्विवाह झाला. वधूचें वय १८ वर्षांचें असून ती कोंकणस्थ आहे आणि वराचें वय ३२ वर्षांचें असून ते देशस्थ आहेत. लग्नमंडप सुंदर आणि विस्तृत असून समारंभाकरितां नागपूर आणि आसपासच्या गांवचे सुमारें २५० बडे गृहस्थ हजर होते. भोजनसमारंभाकरितांही पुष्कळ मंडळी आली होती. मध्यप्रांतांत हा २० वा पुनर्विवाह आहे. आह्मी हा नूतन वधुवरांचें अभिनंदन करितों.

**एक योगी पुरुष**–भरुच येथें नर्मदा किनाऱ्यावर थोड्या दिवसांपासून एक विलक्षण योगी येऊन राहिले आहेत. या योगीराजांबरोबरची शिष्य मंडळी असें सांगतात कीं ते ११० वर्षांच्या वयाचे असून सुमारें बारा वर्षांपासून त्यांनीं उपास व मौनव्रत धारण केलें आहे. यांची दाढी चांगली लांब असून दांत सर्व पडलेले आहेत. ते जें बोलतात तें खरें होतें असा सहजच्या भाविक लोकांचा समज असल्यामुळें त्यांच्या दर्शनास स्त्रीपुरुषांची सारखी गर्दी असते. दररोज सध्याकाळीं फक्त दोन तासच ते लोकांस दर्शन देत असतात ते कोणाशीं बोलत नाहींत पण लोक निरनिराळे हेतू मनांत बाळगून त्यांचे दर्शनास जात आहेत व साधु महाराजांपुढें रुप्याच्या व तांब्याच्या नाण्यांची रेलचेल उडत आहे.

**एका मुलीस झालेला साक्षात्कार**–सादरा येथें गेल्या तारीख २६ रोजीं संध्याकाळीं एका लव्हाराची मुलगी पाणी आणण्याकरितां नदीवर जात होती. इतक्यांत एका पिंपळाच्या झाडांतून दोन माणसें बाहेर पडलेली तिच्या दृष्टीस पडलीं. तीं माणसें तीस 'तूं हिंदु असून कांचेच्या बांगड्या घालतां हें चांगलें नाहीं. ही रीत जर तुम्ही सोडली नाहीं तर तुमच्यावर संकटें गुदरतील' वगैरे गोष्टी सांगत नदीवर गेलीं व तेथें पाण्यांत गुप्त झालीं. तें पाहून ती मुलगी ताबडतोब घरीं गेली व देवीपुढें दिवा वगैरे लावून तिनें तिला चुडे अर्पण केले. या साक्षात्काराबद्दल त्या गांवांत हल्लीं बरीच चर्चा चालू आहे.

### लांकडें खाणारे लोक

सायबेरियांतून प्रवास करून आलेला एक गृहस्थ म्हणतो कीं, उत्तर किनाऱ्यावर कित्येक ठिकाणीं राहणारे लोक एक प्रकारचें लांकूड अन्न म्हणून नेहमीं खातात. तेथील लोकांना तें फार आवडतें. मासे ज्या दिवसांत विपुल मिळतात, त्या दिवसांतहि त्या लांकडाचे ढीग प्रत्येक झोंपडीपुढें पडलेले असतात व ते लोक त्याचा नेहमीं उपयोग करितात आणखी दुसरी अशी गम्मत आहे कीं, आपण लांकडें खातों हें पाहून परकी लोकांच्या मनांत दया उपजते व ते आपल्याला चहा, तंबाकू वगैरे पदार्थ देतात, हें जाणून कोणी परकी गृहस्थ आला असतां त्याच्यापुढें लांकडें खाऊन दाखविण्याचे ते लोक प्रदर्शनच करितात. हीं लांकडें ते शिजवितात; व कधीं कधीं त्याबरोबर मासही शिजवितात; कधीं कधीं तीं लांकडें तेलांत तळूनही खातात.

**दुगंधी झाडांना सुगंधी करणें**–एखाद्या झाडास वाईट वास येतो व तो आपल्यास नको, तर त्या झाडाचे बियाला पुढील उपाय योजावा. शेळवामेंढ्यांच्या लेंड्या घेऊन त्या विंडनिगरमध्यें चांगल्या भिजवाव्यात व भिजविते वेळीं विंडनिगरमध्यें आपल्यास आवडेल तो वास (कस्तुरी वगैरे) घालावा. बीं कांहीं दिवस भिजूं द्यावें. अशा बियांच्या फुलांच्या झाडास छान वास येतो. कदाचित् एका खेपेंत कार्य न झाल्यास ह्या अशा झाडाच्या बियांत तीच कृति करावी.

शिवाय रोपें लहान असतांना जो वास त्यांत घालला असेल त्याचें पाणी रोपांना घालावें. एका घाणेरडा वास येणाऱ्या आफ्रिकेंतील झाडांच्या फुलांना जाईसारखा वास आल्याचें सांगतात.

**कागदाचे कपडे**– पुष्कळ जपानी शिपायांचे कपडे कागदाचेच आहेत. त्याचे शर्टस् व विजारी एक प्रकारच्या नवीन तयार केलेल्या कागदाच्याच केलेल्या आहेत. हा कागद पिवळसर रंगाचा असतो. त्यांना कापडाचे कांठ लावलेले असतात; ते कांहीं ठिकाणीं खळीनें चिकटवलेले व कांहीं ठिकाणीं शिवलेले असतात. हे कागदाचे कपडे पुष्कळ दिवस टिकतात.

### टोळास उपाय

पतंगाप्रमाणें टोळही प्रकाश उजेडाकडे धांवत येत असतात. तेव्हां रात्रीं डोंगरावर किंवा इतर उंच जागीं मोठी होळी पेटविली तर टोळांच्या झुंडी त्यात येऊन पडतील, असा कित्येकांचा तर्क आहे. टोळाचा दुसरा उपद्रव असा आहे कीं, यांनीं अर्धवट खाल्लेलें गवत मेंढ्या व गुरें यांनीं खाल्लें तर त्यांस आजार होतो, असें म्हणतात.

**एका जपानी गृहस्थाची गर्वोक्ती**–शरीरांत जोंपर्यंत जिवंत रक्त खेळत आहे, तोंपर्यंत जपानी राष्ट्र माघार घेणार नाहीं कीं शरण येणार नाहीं. संपत्ती पुरेशी नसल्यामुळें जपानला युद्ध चालवितां येणार नाहीं, असें पुष्कळ म्हणतात. जपानची संपत्ती इतरांहून कमी आहे, हें खरें; पण लोकांस वाटते तितकी ती खास कमी नाहीं.

**प्रचंड प्रदर्शन**—ता० ३० रोजीं वॉशिंगटन येथें प्रे. रूझवेल्ट यांनीं सेंटलुईचें जंगी प्रदर्शन खुलें केलें. प्रेसिडेंट साहेबांनीं एक कळ दाबतांच विद्युत्प्रवाह सुरू होऊन प्रदर्शनांतील सर्व यंत्रें एकदम सुरूं झालीं; आणि निशाणें व पताका फडकावयास लागल्या! प्रदर्शन पाहण्यास जमलेले लोकांनीं आवेशपूर्वक अमेरिका राष्ट्रीय गीत म्हटलें. हें प्रदर्शन फारच मोठें आहे. त्यानें १२४० एकर जमीन व्यापली आहे! ५० परकीय देशांतील जिन्नस आले असून त्यांपैकीं १९ नीं आपापल्या वेगळ्या इमारती बांधल्या आहेत; जगांत आजपर्यंत एवढें प्रदर्शन केव्हांही भरलें नव्हतें. हें शिकागोच्या प्रदर्शनापेक्षांही मोठें व विस्तीर्ण झालें आहे.

**बेडक्यांचा हंगाम**– अमेरिकेंत बेडक्या खाणारे लोक बरेच झाल्यामुळें, अलीकडे तिकडे बेडक्यांचा दांडगा व्यापार सुरू झाला आहे!

**मास्तरांची युक्ती**–पुण्याच्या आजुबाजूच्या लोकलफंडाच्या शाळांतील ७८ रुपयांचे कांहीं शाळामास्तर रजा काढून येथें बंदराच्या कामावर आले आहेत. सध्यां लष्करी असल्यामुळें काम पुष्कळ असून, रोजमुराही रोजीं दीड दोन रुपये पडतो. महिना पंधरा दिवस या धंद्यात घालविले कीं, सहजीं २५।३० रुपये मिळतात. एक महिन्याची बिन पगारी रजा घेतली तरी ७।८ रुपयांचें काय तें नुकसान होईल, गुरुवर्गाची काय ही दशा! गरीब बिचारे मास्तरांचा पोटासाठीं निरुपाय आहे. याचा दोष कोणावर बरें?

**जनावरांना भोजतां येतें**– सिग्नार मानसिनी यांनीं हा बरील शोध लाविला आहे. घोड्यांना, कुत्र्यांना व माकडांना कांहीं गोष्टी बिनचूक मोजून ओळखतां येतात कांहीं पक्ष्यांनाहि हें ज्ञान उपजत असतें. ते आपलीं अंडीं मोजून लक्ष्यांत ठेवितात असा अनुभव आहे.

**तान्ह्या मुलासंबंधानें दोन स्त्रियांत वाद**– बंगलोर येथें मरवाड जातीच्या दोन गरोदर स्त्रिया एकाच घरांत राहत होत्या. त्या थोड्या महिन्यावर प्रसूत होऊन दोघीस एक एक मूल झालें. पुढें कांहीं दिवसांनीं या दोन स्त्रियांच्या दोन मुलांपैकीं एक मूल मरण पावलें. तेव्हां जिवंत राहिलेले बालक आपलें असल्याबद्दल त्या दोन्ही स्त्रियामध्यें वाद उपस्थित होऊन हें प्रकरण तेथील पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत जाऊन पोंचलें आहे. या मुलासंबंधानें भानगड कशी उपस्थित झाली तें समजलें नाहीं.

**फलाहाराची महती**– भोजनोत्तर तांबूल सेवनापूर्वीं मुखशुद्धीसाठीं म्हणून ताजीं फळें खावीं, असें आपल्या वैद्यशास्त्राचें मत आहे. आणि तें अगदीं खरें आहे. आपले फळफळावळीचे बगीचे हे डाक्तरांच्या औषधांच्या कारखान्याहून अधिक मोलवान् आणि आरोग्यरक्षणास आवश्यक आहेत, असें म्हटलें असतां चालेल. ज्याला काळजाचा रोग असेल त्याला सफरचंद म्हणजे अगदीं रामबाण औषधच आहे. मानसशुद्धीच कामीं त्याची योग्यता फार श्रेष्ठ प्रतीची आहे. डाळिंब आणि लिंबू हीं रक्तशुद्धीला फार आवश्यक आहेत. नारिंगेंहि या कामाला चांगलीं. शिवाय त्याच्या सेवनानें कोठा साफ रहातो. पिकलेलीं केळीं मेंदूस फार गुणकारी असतात. इंग्लंडांत टायफाईड तापाचे कित्येक रोगी केळ्याच्या सेवनानें दरसाल बरे झालेले आढळतात. अंजीर पुष्टीकारक आहे, या विषयीं अनुभवानें कोणालाहि खात्री करून घेतां येईल. अंजीरांच्या बारीक बारीक बिया खाल्ल्या असतां बद्धकोष्ठ दूर होऊन चांगले जुलाब होतात. परंतु या सगळ्या फळांत उत्तम फळ म्हटलें म्हणजे अक्रोड हें होय. मनुष्याच्या शरीरस्वास्थ्याला अवश्य लागणारीं जेवढीं तत्वें आहेत तेवढीं सगळीं या फळांत सांपडतात. आणि त्यामुळेंच हीं फळें फार लवकर पचतात. त्यांच्यांत चरबी उत्पन्न करणारें द्रव्य जितक्या मोठ्या प्रमाणांत सांपडतें तितक्या मोठ्या प्रमाणांत दुसऱ्या कोणत्याहि फळांत तें सांपडत नाहीं.

### अमिराची लहर

गेल्या वर्षीं प्रमाणें अमिरास या वर्षींहि एक धर्माच्या गोष्टीची लहर आलेली आहे. चार पेक्षां जास्त बायका कोणीहि करतां कामा नये असा हुकूम धर्माचा रक्षक या नात्यानें त्यानें फिरविला होता. आतां असा हुकूम फर्मावला आहे कीं, चारा पेक्षां ज्या जास्त बायका असतील त्यांचीं लग्नें दुसऱ्यांशीं करून टाकावींत. या नियमा प्रमाणें त्यानें स्वतां आपल्या जास्त असलेल्या बायकांचीं लग्नें दुसऱ्या बरोबर लावून दिलीं अर्थात् इतर सरदार उमरावांसहि तोच प्रसंग येऊन पडला, आणि असा मळें आपल्य पेक्षा कमी दर्जाच्या मनुष्यांच्या हातां घरून पुष्कळ स्त्रियांस जाणें भाग आलें. अमिराची ही लहर चमत्कारिकच होय.

चीन प्रतिनिधींची तारीख १४ एप्रिल रोजीं अमृतसर येथें नाभ्याचे राजे साहेब ह्यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. शीख लोक हे फार शिस्तीचे व व्यवहारज्ञ आहेत.

अमृतसरच्या कॉलेजची सांपत्तिक स्थिति सुधारण्याकरितां संगच्या बँकेंत २० लक्ष रुपये जमले. आतां कॉलेजची सांपत्तिक स्थिति चांगलीच सुधारेल व अंतर्व्यवस्थेबाबतीं ठिकठिकाणच्या प्रतिनिधींच्या सल्ल्यानें समाधानकारक निकाल लागेल.

**स्तुत्यकृत्य**— बौद्धधर्माचे प्रसिद्ध उपदेशक मि. धर्मपाल हे नुकतेच अमेरिका व युरोपचा प्रवास करून आले आहेत. त्यांनीं तिकडे असतांना अमेरिकनांची सहानुभूति संपादन करून हिंदुस्थान व सिलोन यांतील ९ विद्यार्थ्यांसाठीं सहा हजार रुपयांच्या ४ वर्षांच्या स्कॉलरशिपा त्यांजकडून देवविल्या आहेत. ह्या स्कॉलरशिपा शिकागो युनिव्हर्सिटींत औद्योगिक शिक्षण घेण्यासाठीं ठेवल्या आहेत. बर्क्ले न्यूयॉर्क व हार्वर्ड या युनिव्हर्सिट्यांनींही कांहीं इंडियन विद्यार्थी फी न घेतां घेण्याचें कबूल केलें आहे. मि. धर्मपाल हे एक फंड उभारून हिंदुस्थानात धंदेशिक्षणाच्या शाळा काढणार आहेत. तेथें युरोप व जपान यांतील शिक्षक आणविण्याचा यांचा विचार आहे. त्यांनीं बरोबर शेतकीचीं व इतर धंद्यांचीं अनेक यंत्रें आणलीं असून पहिली शाळा ते कलकत्यास स्थापणार आहेत.

× + +

इंदूबाई– तुमची गंगी मोठी चहाटळ पोर आहे हां! कालीकला जिभेला हाडच कसं तें नाहीं! मला पहून काय म्हणते 'ही पहा त्राटिका आली–'

रमाबाई–ना वर्षांची पोर, तिला काय कळतें! दुसऱ्यांचें ऐकून तोंड म्हणा असेल अजाण पोरीच्या बोलण्याकडे तुम्ही कशाला लक्ष देता, सुंदराबाई?

× × ×


## बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा! किंमत पाहून आणा प्रती बेताच्याच आहेत.

इंग्रजी शाळेंतील मुलांस मुलांकरितां दहा अंकांची माहिती लौकर व उत्तम करून देणारें सोपें साधन. १० हेडगे, भोगडे, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळींचे अभिप्राय. पुस्तकें मेवढ्यें मिळतील. मेचे आंत एक रुपयाची घेणारांस टपाल खर्च माफ.

पत्ता– नारायण रामचंद्र नागरकर सेगांव

जि० आकोला (वऱ्हाड)

advance.
Single copy ........ 2 as
dvertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 8 a
Repetitions Per line ,, 2 as

समाचार.

R SAMACHAR

23 MAY 1904 NO 20

...रीख २३ माहे मे सन १९०४ इ० अंक २०

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं माझा प्रत्यक्ष चुलत बंधू चंद्रभान वल्द अमृत गावंडे पाटील हा गेल्या आक्टोबर महिन्यांत दुर्दैवानें आकोट येथें प्लगानें मरण पावला त्यास वारस मी व मयताच्या दोन विधवा कौतुकी नांवच्या ह्या आहेत. विधवांचा फक्त त्यांचे हयाती पर्यंत मयताचे स्थावर जंगम जिनगींत अन्नवस्त्राचा हक्क आहे. कांहीं आपमतलबी व लबाड लोकांचे चिथावणीवरून सदरहू विधवा मयताची स्थावर जिनगी ह्मणजे औरंगाबाद तालुके आकोट येथील सर्वे नंबर १३ टिके आडव्यावाले व सर्वे नंबर १६ टिके भेटकरीवाले व घरदार व जंगम जिनगी विकून अफरातफर करण्याचे विचारांत आहेत. तरी या जाहीर नोटिशीनें कळवितों कीं सदरहू विधवांपासून कोणीहि मयताची जिनगी विकत अगर गहाण घेऊं नये घेतल्यास सदरहू व्यवहार बेकायदेशीर ह्मणून रद्द होईल व आपले कांहीं नुकसान ते सर्व भरून घेतलें जाईल सबब या जाहीर नोटिशीनें कोणी फसूं नये ह्मणून सूचना केली आहे. कळावें. ता. ९।५।०४ इसवी.

(सही) रामजी व० भानाजी पाटील
राहणार आकोट दस्तुर खुद.

## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील तर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

**धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.**

जनरल मरचन्टस
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

## नोटीस

पारवती उर्फ अंबाई जवजे मारुती देशपांडे राहणार जळगांव तालुके मजकूर जिल्हा आकोला यांसः—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे पिंपरी खोद्री तालुके जळगांव येथील सर्वे नंबर २० एकर गुंठे ३१ ७५ आकार ६२ याचे खाते अन्याजी अंबूजी ठाकरे वस्ती सुलज याचे नावांनीं असून यांतील $\frac{1}{4}$ हिस्सा माझा असून सदरहू हिस्सा अंदाजा १२ वर्षें झालीं तुह्मी वहीत केला आहे दरम्यान माझा बापहि सुमारे १० वर्षें झालीं मयत झाला. माझे अज्ञानपणांत तुह्मी माझे सदरहू हिशाची जमीन वहीत केली आहे ते कोणते आधारांनीं वहीत केली याबद्दल तुमचे जवळ असेल तो लेख ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत मजला लेखी जबाबानें कळवावे या प्रमाणें तुह्मी न केल्यास आजपावेतों तुह्मी पीक खाल्याचे नुकसानी बद्दलची रकम तुमचे पासून घेण्याची तजवीज कायदेशीर केली जाईल हे आपणास कळावें. तारीख ९ माहे मे सन १९०४ इसवी.

(सही) निबाजी वल्द संभु माळी
वस्ती सुळज तालुके जळगांव
निशानी खुद्द.

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

**धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अभ्रो सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत**

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षें आंजर्ले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल [illegible]स अशी सविनय प्रार्थना आहे कीं, [illegible]ांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

**पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.**
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

पीक पट्टा लिहून द्यावा व ह्या शेताचा गहाणखताचा कागद माझा मला परत द्यावा. त्याप्रमाणें मी सर्वानुमते दोन वर्षांचा पीकपट्टा लिहून दिला व गहाणखताचा कागद मागितला असतां तो तुह्मी आकोल्यास वकिला जवळ आहे तो मी लवकरच आणून देतों व आणतों. ह्मणाले वीं तुह्मी लिहून दिलेला पीकपट्टा तिऱ्हाईताजवळ ठेवा मी जेव्हां गहाणखताचा कागद तुह्मांस देईन तेव्हां तुह्मी मला पीक पट्ट्याचा कागद द्यावा असे ह्मणून तुह्मी शेर जमखान वल्द शुकुरउल्लखा राहणार लाखनवाडा याचे जवळ तुह्मी स्वतः आपले हातानें मी लिहून दिलेला कागद ठेविला. त्यांस आज सुमारे ९ महिने होत आले तरी आजपावेतों गहाणखताचा कागद आणून दिला नाहीं व पीक पट्ट्याचा कागदहि नेला नाहीं तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसांत गहाणखताचा कागद माझा मला परत देऊन पीकपट्ट्याचा कागद शेरजमखान यानपाशीं असलेला तो घेऊन जावा. असे मुदतींत न झाल्यास व मांगे पुढें फिर्याद केल्यास त्या बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व दोन वर्षें तुमचे भरल्यावर माझे शेत मी आपले कबजांत घेईन. कळावे ता० १९।५।०४ इ०

(सही) मेहराजखा वल्द चांदखा मुसलमान राहणार लाखनवाडा
बुजरूक ता० बाळापूर
पोष्ट—लाखनवाडा.

## नोटिस

बेशमी मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुजरूख यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, सन १९०१ साले मी तुह्मांस एक गहाणखत करून दिलें होतें त्या अन्वये दरसाल तुह्मांस ६० रुपये देण्याचा करार केला होता व हप्ता पडल्यास त्याचे २ रुपये व्याज देईन असें होतें. माझा पहिला हप्ता चुकला सबब त्याचे व्याजासह रुपये आणि दुसरे हप्त्याचे रुपये घेऊन मी तुमचेकडे आलों असतां तुह्मी ते रुपये घेण्याचें नाकारिलें सबब कळवितों कीं, दोन्हीं हप्त्याचे रुपये व पहिल्या हप्त्याचे व्याज मी दलेलखा वल्द नामदारखा राहणार लाखनवाडा यांचे पाशीं अनामत ठेविले आहेत. पावती देऊन त्यांजपासून घेऊन जावे. या पुढें तुमचें व्याज बंद आहे. येणें प्रमाणें न करितां पुढें मांगे फिर्याद वगैरे कराल तर त्याची जबाबदारी आह्मांवर नाहीं कळावें. तारीख १९ मे १९०४ इ०

(सही) रहिमानखा वल्द नामदारखा
राहणार लाखनवाडा बुजरूख दस्तुरखुद

## नोटीस.

बेशमी अहेली मर्द लक्ष्मण कुणबी वगैरे, यादो वल्द लक्ष्मण मुलमुले, व सदु वल्द लक्ष्मण मुलमुले, सर्वत्र राहणार कसबे जळगांव तालुके मजकूर जिल्हा आकोला यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझें घर खेलमाळी कसबे जळगांव येथील चार धारणी आहे त्यांत बिर्‍हाडें वेगवेगळे दरवाजे पाडून राहता त्यास तुह्मांस घर खालीं करून देण्या विषीं शिमग्याचे महिन्यांत कळविलें असतां तुह्मी पंचवा समक्ष कळविलें कीं बरसातीचे अगोदर आह्मी दुसरे घर पाहून तुमचे घर खालीं करून देऊं त्यास तीन महिने होऊन बरसात नजीक आली आहे ह्मणून नोटीस देण्यांत येतें कीं नोटीस पावले दिवसापासून घर माझें खालीं करून द्यावें पुढें राहत असल्यास रीती प्रमाणें भाडेपट्टा करून द्यावा तसें न केल्यास या नोटीसीचे खर्चासुद्धां व दोन वर्षाचे भाड्यासह फिर्याद केली जाईल ह्मणून अगाऊ सुचविलें आहे. कळावें ता. १८।५।०४ इ०

सही
बापू वल्द गजपोल पाटील
राहणार जळगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी रा. रा. मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुजरूक यांसः-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, मौजे धदम तालुके खामगांव येथील सर्वे नंबर २ एकर १९ गुंठे ३९ आकार रुपये २५८।४ यांतील $\frac{1}{8}$ हिस्सा मध्यमभागाचा हा तुमचे पाशीं १०० रुपयांस गहाण ठेविला होता त्याचे दोन वर्षांचे व्याज पूर्वीच दिलेलें आहे. दोन महिने पूर्वीं मी मुद्दल रुपये १०० व व्याज २५ मिळून १२५ रुपये घेऊन तुह्मांकडे आलों व गहाणखत फाडून मागितलें तर तुह्मी रुपये न घेतां मला परत पाठविलें. तर कळवितों कीं हे रुपये आह्मी मेहेरानखा वल्द चांदखा लाखनवाडा यानपाशीं धरवर ठेविले आहेत. रुपयांची पावती व गहाणखत परत देऊन रुपये घेऊन जावे. असें न करितां पुढें मांगे फिर्याद कराल तर आह्मांवर कांहीं जबाबदारी नाहीं. आपलें व्याज बंद असे. कळावें. तारीख १९।५।०४ इसवी.

सही
रहिमानखा वल्द नामदारखा
राहणार लाखनवाडा बुजरूक
दस्तुर खुद.

ORIENTAL
**GOVERNMENT SECURITY**
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.
Established 1874.
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

# TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

It is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life ssurance, is a means by which this danger is got over. Lfe being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS, WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
Chief Agent
*for C. P. Berar and, Khandesh*

## मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेत खाली लिहिल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकी एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल त्यावर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

## नोटीस.

कौतकी मर्द चंद्रभान पाटील गावंडे सोमीळवाली राहणार आकोट इजला खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझ्या सख्या चुलत भावाची तूं विधवा आहेस त्याचे स्थावर जंगम जिनगीचा मी वारस आहे. तुझा फक्त अन्न वस्त्राचा हक्क आहे. तुझे कांहीं आपमतलबी आप्त व लबाड लोकांच्या सांगण्यावरून मयत चंद्रभान याचे स्थावर जंगम जिनगिची विक्री गहाण वगैरे अफरातफर करण्याचा तुझा इरादा आहे असें समजतें. करितां या नोटिशीनें कळवितों कीं तुह्मी कोणतेही प्रकारें सदर्हू जिनगीची विल्हेवाट करूं नये केल्यास रीतिप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. तारीख ९।५।१९०४ इसवी.

सही

रामजी व० मोनाजी पाटील राहणार आकोट दस्तुर खुद.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके याच "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as

# समाचार.

dvertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetitions Per line ,, 2 as

AR SAMACHAR

Y 23 MAY 1904 NO 20

ारीख २३ माहे मे सन १९०४ इ० अंक २०

...ीचा ...ाचा ...वानी ... २० मे

( वर्दीत )
...इर शेत बाबा
...होट दस्तुर खुद.

पीक पट्टा लिहून घ्यावा व ह्या शेताचा गहाणखताचा कागद माझा मला परत द्यावा. त्याप्रमाणें मी सर्वानुमते दोन वर्षांचा पीकपट्टा लिहून दिला व गहाणखताचा कागद मागितला असतां तो तुह्मी आकोल्यास वकीला जवळ आहे तो मी लवकरच आणून देतों व आणतेवेळीं तुह्मी लिहून दिलेला पीकपट्टा तिऱ्हाईताजवळ ठेवा मी जेव्हां गहाणखताचा कागद तुह्मांस देईन तेव्हां तुह्मी मला पीकपट्याचा कागद द्यावा असे ह्मणून तुह्मी शेर जमखान वल्लद शकुरउल्लखा राहणार लाखनवाडा याचे जवळ तुह्मी स्वतः अपेक्षेप्रमाणें हस्तानें मी लिहून दिलेला कागद ठेविला. त्यांस आज सुमारे ९ महिने होत आले तरी आद्याप पावेतों गहाणखताचा कागद आणून दिला नाहीं व पीक पट्याचा कागदहि नेला नाहीं तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसांत गहाणखताचा कागद माझा मला परत देऊन पीकपट्याचा कागद शेरजानखान यांजपाशीं असलेला तो घेऊन जावा. असे मुदतींत न झाल्यास व मानें पुढें फिर्याद केल्यास त्या बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व दोन वर्षे तुमचे भरल्यावर माझे शेत मी आपले कबजांत घेईन. कळावे ता० १९।५।०४ इ०

(सही) मेहराजखा वल्लद चांदखा मुसलमान राहणार लाखवाडा बुजरूक ता० बाळापुर पोष्ट—लाखनवाडा.

## नोटिस

बेशमी मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुजरूक यास:—

मी खाली सही करणार या लेखानें कळवितों कीं, सन १९०१ मध्ये मी तुह्मांस एक गहाणखत करून दिलें होतें त्या अन्वये दरसाल तुह्मांस ६० रुपये देण्याचा करार केला होता व हप्ता पडल्यास त्याचे २ रुपये व्याज देईन असें होतें. माझा पहिला हप्ता चुकला सबब त्याचे व्याजासह रुपये आणि दुसरे हप्त्याचे रुपये घेऊन मी तुमचेकडे आलों असतां तुह्मी ते रुपये घेण्याचें नाकारिलें सबब कळवितों कीं, दोन्हीं हप्त्याचे रुपये व पहिल्या हप्त्याचे व्याज मी दलेलखा वल्लद नामदारखा राहणार लाखनवाडा याचे पाशीं अनामत ठेविले आहेत. पावती देऊन त्याजपासून घेऊन जावे. या पुढें तुमचें व्याज बंद आहे. येणेंप्रमाणें न करितां पुढें मांगें फिर्याद वगैरे कराल तर त्याची जबाबदारी आह्मांवर नाहीं कळावें. तारीख १९ मे १९०४ इ०

(सही) रहिमानखा वल्लद नामदारखा राहणार लाखनवाडा बुजरूख दस्तुरखुद

## नोटीस.

बेशमी अहेल्ली मर्द लक्ष्मण कुणबी वनारसे, यादो वल्लद लक्ष्मण मुलमुले, व सदू वल्लद लक्ष्मण मुलमुले, सर्वत्र राहणार कसबे जळगांव तालुके मलकूर जिल्हा आकोला यांस:—

नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझें घर खेलमाळी कसबे जळगाव येथील चार धारणी आहे त्यात तीघांनीं वेगवेगळे दरवाजे पाडून राहता त्यास तुह्मांस घर खालीं करून देण्या विषयीं शिमग्याचे महिन्यांत कळविलें असतां तुह्मी पंचवा समक्ष कळविलें कीं बरसातीचे अगोदर आह्मी दुसरे घर पाहून तुमचे घर खालीं करून देऊ त्यास तीन महिने होऊन बरसात नजीक आली आहे ह्मणून नोटीस देण्यांत येतें कीं नोटीस पावले दिवसापासून घर माझें खालीं करून द्यावें पुढें राहत असल्यास रीतीप्रमाणें माडेपट्टा करून द्यावा तसें न केल्यास या नोटीसीचे खर्चासुद्धां व दोन वर्षाचे भाड्यासह फिर्याद केली जाईल ह्मणून अगाऊ सुचविलें आहे. कळावें ता. १८।५।०४ इ०

सही

बापू वल्लद गजपोळ पाटील राहणार जळगांव दस्तुर खुद.

## नोटीस

बेशमी रा. रा. मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुजरूक यास:-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, मौजे धदम तालुके खामगांव येथील सर्व्हे नंबर २ एकर १९ गुंठे ३९, आकार रुपये २६।८।४ यांतील ½ हिस्सा मध्यभागचा हा तुमचे पाशीं १०० रुपयांस गहाण ठेविला होता त्याचे दोन वर्षांचें व्याज पूर्वींच दिलेलें आहे. दोन महिने पूर्वीं मी मुद्दल रुपये १०० व व्याज २९ मिळून १२९ रुपये घेऊन तुह्मांकडे आलों व गहाणखत फाडून मागितलें तर तुह्मी रुपये न घेता मला परत पाठविलें. तर कळवितों कीं हे रुपये आह्मी मेहेराजखा वल्लद चांदखा लाखनवाडा यांजपाशीं धरोवर ठेविले आहेत. रुपयांची पावती व गहाणखत परत देऊन रुपये घेऊन जावें. असें न करितां पुढें मांगें फिर्याद कराल तर आह्मांवर कांहीं जबाबदारी नाहीं. आपलें व्याज बंद असे. कळावें. तारीख १९।५।०४ इसवी.

सही

रहिमानखा वल्लद नामदारखा राहणार लाखनवाडा बुजरूक दस्तुर खुद.

ISTERED No. N. 4

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........॥१ ०१
दुसरे खेपेस .... ........॥

Mofussil ... ... ... 2 ( With posta
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 an
dvertisement
below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......3 a
Repetitions Per line ,, 2 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 23 MAY 1904 NO 20

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २३ माहे मे सन १९०४ इ० अंक २०

## नोटीस

रा. रा. पन्नालाल शालीग्राम मारवाडी आगरवाले वस्ती पंचगव्हाण तालुका आकोट यास:—

खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं मौजे अडगांव जाहगीर तालुके अकोट येथील शेत सर्वे नंबर ८९, एकर १८८२६ आकार ३९. सदरहू शेता पैकीं दक्षीण बाजूचें जें शेत आहे त्यांकीं उत्तरेचा भाग निम्मे डिशाचा रधाबाई जनन कट्टू पाटील हे मालकीन आहे. ती जमीन तिजकडून तुमचेपाशीं तारणगहाण रुपये देनशें, यत त्याजबद्दल इस्तेत्र वेण्याचें असून तुमचा हिस्सा रुपये २०० देनशेंचा. व शिवाय रकम नगदी देऊन असें रकमेंत आम्ही तारीख ११ एप्रिल सन १९०४ रोजीं रुपये ६०० सहाशें यत सदरहू मिळत तिजपासून आम्ही खरेदी घेतली आहे. करून तुम्हास कळविण्यांत येते कीं तुम्हास समक्ष रकम घेऊन शेत सोडून द्यावें म्हटलें परंतु तुम्ही तसें केलें नाहीं. तर आतां ही नोटीस पावले दिवसापासून दहा दिवसांत तुमची रकम घेऊन मिळकत सोडून द्यावी असें न केल्यास तुमचेवर शेताचा कबजा मागण्याविषयीं दावा करून त्यांत रकम भरून देऊन कोर्टखर्चाचा पैसा व नोटिशीचा खर्च शेताचा ताबा आणि तिचे नुकसानीची रकम असें सर्व मागणें तुमचेवर कोर्ट मार्फत होईल. कळावें. तारीख १४।५।०४ इसवी.

सही
गोमतीबाई जवो काशीप्रसाद
निशाणी खुद्द

## नोटीस

बेशमी मोतीलाल दयालदास अगरवाला दुकान आकोट हल्लीं वस्ती रामपूर परगणे धरूर तालुके आकोट यास:—

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही रंगारहाटीतील आपली ९ खाची घराची माडी २०० रुपयांत आम्हाला विकत देऊन त्याबद्दलचें खरेदीखत लिहून नोंदून दिलें. घराचा प्रत्यक्ष ताबा देण्यासाठीं तुम्ही मुदत मागितली म्हणून आम्ही तेंच घर तुम्हांस तीन महिन्यासाठीं भाड्यानें दिलें. आतां ही मुदत संपत आली. ही मुदत पुरी होतांच घर आमच्या स्वाधीन करून द्यावें. आम्हास घराची मोठी अडचण आहे हें तुम्हांस आम्ही समक्ष कळविलें असून तुम्ही घर खालीं करून देण्यासंबंधानें उडवा उडवीचे जबाब सांगत आहां. रीती प्रमाणें घर आमच्या ताब्यांत न मिळाल्यास या घराबद्दल तुम्हाला दरमहा सात रुपये प्रमाणें भाडें द्यावें लागेल. या नोटिशीचा खर्च तुम्हावर पडेल. कोर्ट मार्फत घराचा ताबा मिळेपर्यंत तत्संबंधाची इतर नुकसानी तुम्हावर पडेल. कळावें. तारीख २० मे १९०४ इसवी०

सही ( उर्दूत )
शेख हैदर वल्लद शेख बाबा
राहणार आकोट दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशर्मी गणपत उघडे रा० खानापूर प्रगणें मोर्शी ता० मजकूर जि० उमरावती यास:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझा लग्नाचे भ्रतार असून हिंदुधर्मप्रमाणें तुमचा व माझा सशास्त्र विवाह झाला. त्यास अंदाज सात वर्षें झालीं तुम्ही मजला नांदवीत नसून टाकून दिलें. हल्लीं सुमारे मी आपल्या बापाच्या घरीं आहे. करितां या नोटिशीनें तुम्हांस कळविण्यांत येते कीं दरमाहा रुपये सातप्रमाणें पूर्व रकम माझे नांवास देऊन त्याची रसीद घ्यावी. व मला नांदविण्याकरितां घरीं घेऊन जावें. याप्रमाणें तुम्हाकडून न झाल्यास मी अन्नखर्चाचा दावा न करितां दुसरे मनुष्याबरोबर गांधर्व विवाह करीन मग तुमचा कोणतेच प्रकारचा मजवर हक्क राहणार नाहीं. या नोटिशीचें उत्तर आठ दिवसांचे आंत पाठवावें. कळावें ता. १७।४।१९०४ इ०

सही
निशाणी बांगडीची सकू भ्रतार गणपत उघडे राहणार झोलअंबा परगणें हिरवाडी तालुके मोर्शी दस्तुर राजाराम व्यंकटेश दिवटे.

## नोटीस

रा. रा. गुलाबचंद गणेशदास मारवाडी राहणार लाखनवाडा बुद्रुक पोष्ट लाखनवाडा ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मी तुमचे जवळ गोंड या नावाचें शेत सर्वे नंबर २३ एकर गुंठे २०८३ आकार ५८१४८६ हें शेत मी ८।१० वर्षांपूर्वीं १०० रुपयास गहाण ठेविलें होतें. मजकडून पैशाची फेड न झाल्यामुळें तुम्ही मजवर फिर्याद केली परंतु मध्येंच तुमची व माझी समजूत होऊन १५० रुपयांत तेंच शेत मी दुसऱ्यांदा तुमचे पाशीं गहाण ठेविलें त्यासही अजमासें ७ सात वर्षें झालीं असतील. ते शेत मीच स्वतःच वहात होतों अलीकडे जानेवारी महिन्यांत चार चौघासमक्ष तडजोड होऊन ठराव झाला कीं मजपासून तुम्ही दोन वर्षांचा पीक पट्टा लिहून घ्यावा व ह्या शेताचा गहाणखताचा कागद माझा मला परत द्यावा. त्याप्रमाणें मी सर्वानुमते दोन वर्षांचा पीकपट्टा लिहून दिला व गहाणखताचा कागद मागितला असतां तो तुम्ही आकोल्यास वकिला जवळ आहे तो मी लवकरच आणून देतों व आणतों म्हणालें वीं तुम्ही लिहून दिलेला पीकपट्टा तिऱ्हाईताजवळ ठेवा मी जेव्हां गहाणखताचा कागद तुम्हांस देईन तेव्हां तुम्ही मला पीकपट्ट्याचा कागद द्यावा असें म्हणून तुम्ही शेर जमनखान वल्लद शुकुरउल्लखा राहणार लाखनवाडा याचे जवळ तुम्ही स्वतः अपेक्षेने हस्तानें मी लिहून दिलेला कागद ठेविला. त्यास आज सुमारे ५ महिने होत आले तरी आद्याप पावतों गहाणखताचा कागद आणून दिला नाहीं व पीक पट्ट्याचा कागदहि नेला नाहीं तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसांत गहाणखताचा कागद माझा मला परत देऊन पीकपट्ट्याचा कागद शेरजमानखान यांजपाशीं असलेला तो घेऊन जावा. असें मुदतींत न झाल्यास व मागें पुढें फिर्याद केल्यास त्या बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व दोन वर्षें तुमचे भरल्यावर माझे शेत मी आपले कबजांत घेईन. कळावे ता० १९।५।०४ इ०

(सही) मेहराजखा वल्लद चांदखा मुसलमान राहणार लाखनवाडा बुद्रुक ता० बाळापूर पोष्ट–लाखनवाडा.

## नोटिस

बेशमी मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुद्रुक यास:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, सन १९०१ साली मी तुम्हास एक गहाणखत करून दिलें होतें त्या अन्वयें दरसाल तुम्हांस ६० रुपये देण्याचा करार केला होता व हप्ता पडल्यास त्याचे २ रुपये व्याज देईन असें होतें. माझा पहिला हप्ता चुकला सबब त्याचे व्याजासह रुपये आणि दुसरे हप्त्याचे रुपये घेऊन मी तुमचेकडे आलों असतां तुम्ही ते रुपये घेण्याचें नाकारिलें सबब कळवितों कीं, दोन्हीं हप्त्याचे रुपये व पहिल्या हप्त्याचें व्याज मी दलेलखा वल्लद नामदारखा राहणार लाखनवाडा यांचे पाशीं अनामत ठविले आहेत. पावती देऊन त्याजपासून घेऊन जावे. या पुढें तुमचें व्याज बंद आहे. येणें प्रमाणें न करितां पुढें मागें फिर्याद वगैरे कराल तर त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं कळावें. तारीख १९ मे १९०४ इ०

(सही) रहिमानखा वल्लद नामदारखा राहणार लाखनवाडा बुद्रुक दस्तुरखुद्द

## नोटीस.

बेशमी अहेली मर्द लक्ष्मण कुणबी बनार्से, यादो वल्लद लक्ष्मण मुलमुले, व सदू वल्लद लक्ष्मण मुलमुले, सर्वत्र राहणार कसबे जळगांव तालुके मजकूर जिल्हा आकोला यास:—

नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझें घर खेलमाळी कसबे जळगांव येथील चार धारणी आहे त्यांत तिघी वेगवेगळे दरवाजे पाडून राहता त्यास तुम्हांस घर खालीं करून देण्या विषयीं शिपायाचे महिन्यांत कळविलें असतां तुम्ही चववा समक्ष कळविलें कीं बरसातीचे अगोदर आम्ही दुसरे घर पाहून तुमचे घर खालीं करून देऊ त्यास तीन महिने होऊन बरसात नजीक आली आहे म्हणून नोटिस देण्यांत येतें कीं नोटीस पावले दिवसापासून घर माझें खालीं करून द्यावें पुढें राहत असल्यास रीती प्रमाणें माडेपट्टा करून द्यावा तसें न केल्यास या नोटीसीचे खर्चासुद्धां व दोन वर्षांचे भाड्यासह फिर्याद केली जाईल म्हणून अगाऊ सुचविलें आहे. कळावें ता. १८।५।०४ इ०

सही
बापू वल्लद गजपोळ पाटील
राहणार जळगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी रा. रा. मथुरादास सुरजमल मारवाडी राहणार लाखनवाडा बुद्रुक यास:-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, मौजे धदम तालुके खामगांव येथील सर्वे नंबर २ एकर १९ गुंठे ३९ आकार रुपये २५।८।४ यांतील $\frac{१}{३}$ हिस्सा मडवमागचा हा तुमचे पाशीं १०० रुपयास गहाण ठेविला होता त्याचे दोन वर्षांचे व्याज पूर्वींच दिलेलें आहे. दोन महिने पूर्वीं मी मुद्दल रुपये १०० व व्याज २५ मिळून १२५ रुपये घेऊन तुम्हांकडे आलों व गहाणखत फाडून मागितलें तर तुम्ही रुपये न घेतां मला परत पाठविलें. तर कळवितों कीं हे रुपये आम्ही मेहेराजखा वल्लद चांदखा लाखनवाडा यांजपाशीं धरून ठेविले आहेत. रुपयांची पावती व गहाणखत परत देऊन रुपये घेऊन जावे. असें न करितां पुढें मागें फिर्याद कराल तर आम्हांवर काहीं जबाबदारी नाहीं. आपलें व्याज बंद असे. कळावें. तारीख १९।५।०४ इसवी.

सही
रहिमानखा वल्लद नामदारखा
राहणार लाखनवाडा बुद्रुक
दस्तुर खुद्द.

नमुना नंबर १४३

सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें क्लास १९

दिवाणी किरकोळ मुकदमा नंबर ९/१९०४

विद्यमान दिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत

नांव— लक्ष्मण वल्लद रामजी जात कुणबी राहणार मोर्शी हल्लीं उमरावती. यांसः

कळविण्यांत येते कीं मयत बायजाई मर्द खुशालजी राहणार मोर्शी तालुके मजकूर जिल्हा उमरावती इचे इस्टेटीचे प्रोबेट मिळावें ह्मणून अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरात द्वारें कळविण्यांत येतें कीं त्यांनीं तारीख २९ माहे जून १९०४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

Dated Amraoti the 23rd April 1904 — H. Godwin Austin, District Judge, Amraoti District.

## जाहिरात

चिरंजीव लक्ष्मण प्रसाद मोहनलाल आणि सर्वत्र लोकांस या जाहिर खबरीनें कळविण्यांत येतें कीं हा माझा धाकटा भाऊ असून मी माझ्या व आईच्या खुशीनें व कांहीं महत्वाच्या कारणांमुळें जी इस्टेट माझे कैः वडील रा० मोहनलाल रघुनाथराय ह्यांनीं आपल्या स्वकष्टानीं संपादन केलेली ती ह्मणजे मौजे ओणी येथील सर्वे नंबर १९, ३९ पैकीं एकर १३-२१, ७-२; आकार रुपये २५, १३ व हिंगणें येथील सर्वे नंबर २५, ३१, २७; एकर १४-२०, २०-१४ २३-२०; आकार रुपे २६-३-०, ३४ १९-६, ४२-९-६ चे जमिनीचें खातें माझा धाकटा भाऊ चिः लक्ष्मण प्रसाद मोहनलाल ह्याच्या नावानें केलें. ह्या इस्टेटीचे आह्मी बनसीलाल मोहनलाल व लक्ष्मण प्रसाद मोहनलाल हे समायीक सारखे हकदार आहेत. परंतु हल्लीं त्याचे चाल चलणूक चांगले प्रकारें नसल्यामुळें वर दर्शविलेल्या स्थावर जंगम व इतर समायीक इस्टेटीपैकीं लक्ष्मण प्रसाद यानीं कोणास कोणताही भाग गहाण, ताबेगहाण विक्री, देवघेवसंबंधीं व्यवहार वगैरे माझ्या व माझे मातोश्रीच्या सम्मती खेरीज करूं नये. केल्यास ती रद्द समजली जाईल. कळावें तारीख आकोला २१ मे १९०४ इ०

सही

बनसीलाल मोहनलाल राहणार आकोला दस्तुर खुद्द.

## नोटीस

काशीराम लक्ष्मणदास मारवाडी राहणार उकळी तालुके जळगांव जि० आकोलें यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्मांस तारीख २४।४।१९०४ इसवी रोजीं रजिस्टर नोटीस दिली ती तुह्मांस पावल्या बद्दल तुमची सहीची पावती आमचे कडेस आलली आहे परंतु त्या नोटिशीचें, उत्तर तुह्मी आह्मांस दिलं नाहीं. हल्लीं या नोटिशीनें आपणास कळवितों कीं सन १९०३।१९४ या सालचे विकाचा हिशेब तुह्मी आह्मांस लिहून कळविणें, खर्च वजा जातां किती रक्कम आपणाकडेस जमा झाली याजबद्दल कळविणें तसेंच सन १९०४।१९०५ या एक सालाकरितां मौजे उकळी परगणें पातुडे ता० जळगांव येथील शेत सर्व्हे नंबर २ व ३७ मीं तुमचे जवळ ताबेगहाण आहेत तीं आह्मी वहितीस घेण्यास कबूल असून त्याचें स्वामीत्वाबद्दल रक्कम रुपये ४०० रोख व वायद्याची रक्कम आपणास आह्मी देण्यास तयार आहोत तरी वरील रक्कम आपणाकडेस आह्मी केव्हां व कोणते ठिकाणीं आणावी याजबद्दल खुलासा करणें ह्मणजे त्या प्रमाणें आह्मी आपणास रक्कम अदा करूं. या नोटिशीचें उत्तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत देणें. कळावें तारीख २१ माहे मे सन १९०४ इसवी.

सही

श्रीराम मोहनलाल मारवाडी राहणार उकळी यांची मारवाडींत सही.

## नोटीस

सिताराम वल्लद लक्ष्मण तेली राहणार आकोलें यांसः—

बालचंद बनसीलाल साहू दुकान आकोलें याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, ता० २० माहे डिसेंबर सन १९०३ इ० रोजीं वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांतून सिताराम सुंदरलाल या दुकानचे हिशेब समजून देण्या करितां नोटीस दिली होती त्याप्रमाणें तुह्मी आज पर्यंत कांहींच तजवीज केली नाहीं. सदरहू दुकानचें कर्ज पांडु वल्लद मोती तेली राहणार मौजे सांगवी याजकडेस तारीख २४ अक्टोबर सन १८९६ इ० तारखेचें गहाण खतावरून घेणें आहे असें दिसतें सुदर्हू असामीचें असल गहानखत फिर्यादी करितां आमचे कडेस पाठवावें. तसेंच सदर्हू असामी कडून वसूल आल्यास किती व केव्हां आला याजबद्दलचा खुलासा करणें ह्मणजे त्याप्रमाणें सदर्हू असामीवर फिर्याद करून रक्कम वसूल करितां येईल. वर प्रमाणें आपण न केल्यास त्याजबद्दलची सर्व प्रकारें जबाबदारी आपणावर राहील, व दुकानचें नुकसान होईल तें तुह्मास एकट्यास भरून द्यावें लागेल. तसेंच वरील असामी खेरीज इतर असाम्यांचे जे दस्त ऐवज वगैरे आपणापाशी असतील ते ( खात्यावर ज्या रकमा आहेत त्या असाम्याशी रुजुवात करून द्याव ह्मणजे फिर्याद करण्यास ठीक पडेल. ) फिर्यादी करितां आमचे कडेस पाठवून द्यावे ह्मणजे आह्मी त्याजवरून वरील असाम्यावर फिर्याद करून रकम वसूल करण्याची तजवीज करूं. वर्णे प्रमाणें न केल्यास त्याबद्दलची सर्व प्रकारची जबाबदारी आपणावर राहील. व त्यामुळें जे नुकसान होईल ते तुह्मांस एकट्यास भरून द्यावे लागेल. वर प्रमाणें तजवीज ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आपण करावी. कळावें ता० २२ माहे मे सन १९०४ इ०

सही.

बालचंद बनसीलाल राहणार आकोला दस्तुर खुद्द.

# वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेष्ठ शुद्ध ९ शके १८२६

## पुनश्च रुरुदितम्

( इन कम टॅक्सावरील आक्षेप )

हा कर आकारण्या संबंधानें व तो वसूल करण्यासंबंधानें सरकारी व्यवस्था जारीनें व झपाट्यानें चालू आहे. आमच्या प्रांतांतील लोकांस हा कर फारच त्रासदायक वाटत आहे आणि या करा इतका दुसरा जबरदस्त कर आज पर्यंत आह्मी कधींच दिला नाहीं असें सर्व लोक बोलतात. हा कर प्रांतांतील मुखवस्तु लोकांवरच पडणारा आहे आणि त्याची कटकट गरीब रयतेस नाहीं तेव्हां हा कर नव्यानें बसवून वसूल करण्याला हरकत नाहीं असें मात्र सरकारनें समजूं नये. हा कर किती त्याज्य आहे याची बरोबर कल्पना येण्यासाठीं ह्याचा पूर्व इतिहास थोडासा चाळला पाहिजे.

संसारामध्यें आपद्धर्म ह्मणून एक वेगळा धर्म आहे. आपत्ती आली असतांना नेहमींची धर्म बंधनें हा आपद्धर्म शिथिल करितो आणि तो अपरिहार्य प्रसंग जाणून कांहीं त्याज्य गोष्टीहि विहित गोष्टींच्या पंक्तीला येऊन बसतात. या आपद्धर्माचें मुख्य तत्व असें असतें कीं, अनेक वाईट गोष्टी ज्या त्याज्य असतात त्यां पैकीं जी कमी वाईट गोष्ट असेल तिचा स्वीकार करावा. प्रपंचांत जसा हा आपद्धर्म प्रसंग विशेषीन स्वीकारावयाचा असतो तसा राजनीतींतही ह्या आपद्धर्माचा स्वीकार कारण परत्वेंच करावा लागतो. प्रजेवर कर बसविणें हें राजनीतीचें पहिलें मोठें कार्य होय. कां कीं राज्याचें शकट चालविण्यासाठीं द्रव्यबळ अगोदर पाहिजे असतें आणि निरनिराळ्या करांच्या उत्पन्नावर सर्व राज्यकारभाराची बरी वाईट स्थिती अवलंबून असते. करांचें उत्पन्न हीच राज्यशकटाची खरी चालक शक्ती होय आणि याच दृष्टीनें सरकारी देणें प्रजाजन प्रथम देत असतात. ही गोष्ट विहित करा संबंधानें झाली. जसें जमिनीचा सारा. पण उत्पन्नावरील कर किंवा मिठावरील कर यांची गणना या विहित करांमध्यें केलेली नाहीं. हे आपद्धर्मांतलेच कर होत, जेव्हां हे कर १५।२० वर्षांपूर्वी प्रथमतः बसविण्यांत आले तेव्हां सरकारी खजिना अगदीं रिता पडला होता. उत्पन्नाच्या बाजूनें हात बांधले गेल्यामुळें राज्यकारभाराच्या अत्यावश्यक गोष्टीहि सरकारास बाजूस ठेवाव्या लागल्या. नवीन कर बसविल्याशिवाय सरकारला दुसरा उपायच नाहींसा झाला होता आणि त्याच वेळीं नवीन कर बसविण्याची अंतिम समिाहि येऊन पोहोंचली होती. प्रजेवर नवीन कर बसवावे अशी प्रजेची स्थिती नाहीं असें सरकारनेंहि त्यावेळीं कबूल केलें आहे. कर बसविण्याची पूर्णच पराकाष्टा होऊन गेली आहे असें लक्ष्यांत आणून निरुपायानें आह्मी हे कर बसवितो. आणि जेव्हां सरकारी खजिन्याची थोडीशी सुस्थिती येईल तेव्हां हे कर कमी करूं असें उत्पन्नावरील कर, मिठावरील कर इत्यादि त्याज्य कर बसवितांना सरकारानें कबूल केलें आहे. आणि जेव्हां जेव्हां प्रसंग आला तेव्हां तेव्हां या करांचा बोजा हलका करण्याची प्रतिज्ञा सरकारानें अंशतः तरी खरी केली आहे आणि उत्पन्नावरील कराची अंतिम सीमा १००० रुपया पर्यंत वाढविल्याबद्दल व मिठावरील कर कमी केल्याबद्दल लोकांनीं लॉर्ड कर्झन साहेबांचे धन्यवाद नुकतेच गाइले आहेत.

ब्रिटिश इंडियांत हे आपद्धर्माचे कर कमी करण्या संबंधानें सरकाराचें मुख्य धोरण आहे आणि इकडे पहावें तों आमच्या या कौलपत्र्यानें सुरु केलेल्या प्रांतांत सरकार हे कर जारीनें सुरू करूं पहात आहेत, तेव्हां हा आपद्धर्माचा कायदा लागू करण्या इतका वऱ्हाडच्या राज्यकारभारावर दुर्धर प्रसंग आला असला पाहिजे. पण वस्तुतः तसा मुळींच प्रकार नाहीं. आमच्या प्रांतांतील लोकांवर करांचा बोजा किती पडतो याची कल्पना येण्यासाठीं आह्मी सरकारी कांहीं आंकडे येथें उतरीत आहों. वऱ्हाडचें उत्पन्न एकंदर २ कोटी ३५ लक्ष ४५ हजार ६८८ रुपये आहे. या पैकीं १ कोटी १२ लक्ष ९५ हजार ४२ रुपये ऐन सरकारी उत्पन्न असून बाकीचे १९ लक्ष रुपये बोर्डाचें आणि ३। लक्ष म्युनसिपालिटीचें आहे. ही सर्व रक्कम रयतेवर नानाविध कर बसवून उत्पन्न करण्यांत येते. या उत्पन्नाची वाटणी करितांना लष्करी खात्याकडे ३८ लक्ष रुपये खर्च करण्यांत येतो व निजाम सरकारास खंडणी दाखल २५ लक्ष रुपये द्यावे लागतात. इतका हा खर्च ह्या लहानशा प्रांतावर फारच जबरदस्त आहे. एवढा मोठा खर्च कोणत्याही प्रांतावर लादला जात नाहीं ही गोष्ट इंडिया सरकारानें वारंवार कबूलहि केलेली आहे. एवढा अवाढव्य खर्च नसता ह्मणूनच ही कायमच्या कौलपत्र्याची शकल प्रथमतः निघाली आणि हल्लीं तर राज्यकारभाराच्या खर्चाची काटकसर सर्व बाजूंनीं चालू आहे. अगोदरच आमच्याकडून वसूल केले जात असलेले कर फार भारी आहेत आणि त्या करांच्या पैशांतून वरील सारखे अवाढव्य खर्च बिनदिक्कत चालत होते आणि सध्यांचा कारभार अति कृपण दृष्टीचा व अत्यंत काटकसरीचा होत चालला आहे, तेव्हां सरकारानें खजिन्याच्या दृष्टीनें अशा सुखाच्या व आबादीच्या कालांत आपद्धर्माचे कर प्रजेवर बसवावेत हें न्यायास संमत नाहीं. प्रजा ही

सरकारची कामधेनू आहे आणि दुग्धाच्या क्षति तृष्णेनें तिला अधिकाधिक पिळीत गेलें असतां दुग्धाच्या ऐवजीं सरकार अशुद्धाचें ह्मणजे रक्ताचें दोहन् करीत आहे हें निराळें सांगणें नको. सरकारास आह्मी एवढेंच सांगतो की त्यांनीं इसापनीतींतील सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या राजहंस पक्ष्याची गोष्ट विसरूं नये.

## उदार पुरुषाचा मृत्यु.

इंडियाचा एक महा उदार लक्ष्मीपुत्र निवर्तला! रा० रा० जमशेटजी नसरवानजी टाटा हे गेल्या गुरुवारीं मरण पावले हें ऐकून सर्व इंडियांतील लोकांस मोठी हळहळ वाटेल. राजश्री टाटा हे एक राष्ट्रीय पुरुष होऊन गेले. यांच्या मृत्यूनें इंडियांतील एक नवकोट नारायण नाहींसा झाला. अव्वल इंग्रजाचपावेळीं जीं पुरुषरत्नें उदयास आलीं त्यापैकीं हे एक होते. यांचा जन्म नवसरी येथें १८३९ मध्यें झाला. पुढें त्यांनीं आपल्या स्वपराक्रमानें सर्व संपत्ती मिळविली, हे चारहि खंडें फिरून आलेले होते. महाराष्ट्रांत निरनिराळ्या गिरण्यांचे कारखाने यांनीं प्रस्थापित केले. शेवटचा त्यांचा हेतू असा होता कीं मध्यप्रांतांतील चांद्याकडील भागांत लोखंडाच्या खाणी चालू करा-व्यात. हा शेवटचा त्यांचा हेतू सिद्धीस ने-ण्यासाठीं त्यांनीं हींदुस्तानांत लोकांतून खनिजवेत्ते लोक बोलावून आणिले होते. त्यांचा हेतु सिद्धीस गेला नाहीं तथापि देशी उद्योगामध्यें हा निराळाच राष्ट्रीय उद्योग सुरू करण्याची दिशा यांनीं उत्कृष्ट तऱ्हेनें दाखवून दिलेली आहे. यांच्या इतका उद्योगशील, धोरणी, व भाग्यवान पुरुष विरळा आढळेल. चारहि खंडांत आपल्या देशी पैशा असण्यात असा त्यांचा मोठा मानस होता. त्यांचा हा मनोरथ अजून सिद्धीस गेला नाहीं तरी त्यांचे चिरंजीव त्यांनीं घालून दिलेल्या कार्य-दिशेनें वडिलांचा संकल्प पुरा करितील अशी आह्मांस बळकट आशा आहे. राजश्री टाटा यांस मोठमोठे भव्य, रमणीय व लक्ष्मी-विलासाचीं वाडे बांधण्याचा मोठा शोक असे. मुंबई बंदरावर त्यांनीं बांधलेली ताजमहाल हॉटेल ही एक अप्रतिम इमारत उभारली जात आहे आणि ही इमारत ह्मणजे शिल्प-शास्त्राचें वैभव व गौरव यांचें प्रदर्शन होय. राष्ट्रहिताची गोष्ट त्यांच्या मनानें एकदां घेतली ह्मणजे ते कर्णा सारख्या उदार बुद्धीनें या गोष्टीत. रिसर्च युनिव्हर्सिटी स्थापित करण्यासाठीं त्यांनीं ३५ लक्ष रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यांच्या मनोदया प्रमाणें ही युनिव्हर्सिटी स्थापित व्हावयाची आहे आणि मुंबई सरकारनें नुकताच या बाबतींत जो ठराव प्रसिद्ध केला आहे त्यावरून पाहतां ही संस्था चांगल्या नांवारूपास येईल अशी आशा आहे. या संस्थेच्या संबंधानें राजश्री टाटा यांचें नांव आह्मामध्यें चिरकाळ राहील आणि अशा अजरामर पुण्यश्लोक कीर्तीच्या माणसाच्या उदाहरणानें मृतवत् होत चाल-लेल्या राष्ट्राचे निव्हाळे पुन्हां जोरानें वाहूं लागतील.

राजश्री टाटा यांचें वय ६५ वर्षांचें होतें. हे प्रकृतीस आराम नसल्यामुळें गेल्या ४-५ महिन्यापासून युरोपांत हवा पालटीसाठीं गेले होते. त्यांच्या बरोबर आप्तपरिवारहि होता. गेल्या गुरुवारीं जर्मनींतील न्यानहॅम गांवीं यांचें देहावसान झालें. त्यांचें शव लंडन जवळील पारशी स्मशानभूमींत नेण्यांत येणार आहे. यांच्या उदार आत्म्यास ईश्वर परम शांति देवो.

## लढाई

आज काल लढाईचे हातपाय थंडावलेले दिसतात. गेल्या आठ दिवसांत ह्मणण्या सारखी अशी एकहि लढाई झाली नाहीं. जपानचें पुढें पुढें सरकण्याचें काम अव्याहत चालूं आहे. असें ह्मणतात कीं रशियाची जितकी पिच्छेहाट करितां येईल तितकी करावयाची आणि कोरियांत रशियाला बिलकुल थारा द्यावयाचा नाहीं असा जपानचा कृत संकल्प आहे. लढा-ईच्या गडबडींतच जपानी लोक स्वदेशभक्तांस शोभेल असें एक कार्य करित आहेत ह्मणजे पोर्ट आरथरच्या लढाईंत शौर्यानें लढत लढत मरण पावलेला जपानी वीर हिरोंज याच्या सारका प्रीत्यर्थ ते त्याचा पुतळा उभारीत आहेत.

पहिल्या दिवसापासून रशियाचा पाय आंत आंतच ओढ खात आहे. तरी त्याच्या लढाईच्या तयारींत कांहीं दिलाई नाहीं. आपलीं गलबतें शत्रूच्या हातीं सांपडूं नये ह्मणून तीं तोफेनें उडवून देण्याचा सपाटा रशियानें चालविला आणि याच विचारानें रशियानें डानले बंदरचा नाश करून टाकला. लिओयांग येथें एक मोठी लढाई होण्याचा संभव आहे असें ह्मणतात कारण ५० हजार जपानचें सैन्य व ७० हजार रशियाचें सैन्य एकमेका जवळ येऊन थडकलेलें आहे.

## पण्यांगना

आमच्या शहरच्या मध्य वस्तींत पुष्कळ ठिकाणीं वेश्यांचा सुळसुळाट झाला आहे. ग्रामस्थ सुखवस्तू लोकांच्या घरांना लागूनच यांची वसती होत चालली आहे. यांचा धंदा समाजाला आवश्यक असो वा नसो पण त्यांची वसती जवळच्या राहणाऱ्या घरच्या मंडळीस फार पीडाकारक होते. संसारिक कुटुंबाच्यापुढें त्यांच्या डोळ्या देखतच या पण्यांगनांचे नानाविध रोजगार चालतात हें फार वाईट आहे. त्यांचा संसर्ग मोठा बाधक व हानीकारक असतो. गृहस्थ लो-कांपासून ही मंडळी फार दूर पाहिजे. हल्लीं त्यांची रहदारी या शहरांत अशी वसत चालली आहे कीं तिचा प्रतिकार योग्य वेळीं न होईल तर त्यांनें चालविलें भरवस्तींतील वास्तव्य दूर करण्याला पुढें फारच प्रयास पडतील. किंबहुना ती गोष्ट अगदीं दुःसाध्यहि होईल. या शहरांतील पुष्कळशा भरवस्तींच्या ठि-काणीं आणि देवालयांच्या पुण्य-भूमी समोरहि यांचीं बिऱ्हाडें दृष्टीस पडतील. कलकत्त्या सारख्या शहरीं वेश्यांस अशा भर-वस्तीच्या ठिकाणीं राहूं देत नाहींत. यांचीं बिऱ्हाडें ह्मणजे लबाड, लुच्च्या व अनीती-मान् लोकांची धर्मशाळाच असते. प्रत्यक्ष पण्यांगना पेक्षां त्यांच्याशीं सलगी करणाऱ्या लोकांपासूनच आसपासच्या संसारी लोकांस फार उपद्रव होतो. आकोल्यामध्यें ही इडापीडा फार वाढली आहे आणि ती नाहींशी करण्याचें काम येथील पोलिसांचें व म्युनसि-पाल कमेटीचें आहे असें आह्मी समजतों. या कामीं एखाद्या कायद्याची मदत लागली तरी ती सरकारांतून त्यांनीं मिळविली पाहिजे. या कामीं आळस किंवा काना डोळा होऊं नये असें आह्मी मुद्दाम ह्मणतों. आणि अशा कार्यांत पुरस्कर्त्या मंडळीस नागरिक लोकांकडूनहि खानगी मदत मिळेल अशी आह्मांस बळकट आशा आहे.

या संबंधानें पण्यांगनास भाड्यानें घरें देणाऱ्या घर मालकांस आह्मी सूचना करूं इच्छितों कीं, त्यांनी आपल्या घराचा होतां होईल तितका असा दुरुपयोग करूं नये. वेश्या घरभाडें अधिक देतात ही गोष्ट खरी आहे आणि भाड्याच्या आशेनें घराचा मालक ती गोष्ट कबूलही करीत असेल. पण घरमालकांची ही दृष्टी कोती व क्षुद्र आहे. त्यांनीं आपल्या घरांचा शेजार नजीकच्या गृहस्थाश्रमी लोकांस पण्यांग-नांच्या द्वारानें हानीकारक करूं नये. शेजारधर्माच्या त्यांच्या मनांतील जुन्या खुणा बुजालेल्या दिसतात. त्यांचीं मनें फारच खालावलीं आहेत असें ह्मणावें लागतें, नाहीं तर थोड्या लाभासाठीं कोणी आपलें घर या रीतीनें भाड्यानें देणार नाहीं. ही अनिवदन करण्यास लावणारी भाड्याची इच्छा आमच्या शहरांतील श्रीमान् घरवाल्यांच्या मनांतून नाहींशी होईल तर त्यांच्या हातून सर्व नागरिकांवर एक मोठा उपकारच होईल.

## सदुद्योग

बंगालच्या मंडळींनीं एक चांगला उद्योग आरंभिला आहे. तिकडील प्रमुख मंडळींनीं एक मोठें राष्ट्रीय कार्य आपल्या शिरावर घेतलेलें आहे. हे लोक अगदीं निरपेक्ष बुद्धीनें गांवोगांव फिरतात, ठिकठिकाणीं सभा भरवितात आणि लोकां-कडून वर्गणी गोळा करीत असतात. त्यांचा हेतु असा कीं, ह्या एकत्र जमविलेल्या फंडांतून कारागीर लोकांस परराष्ट्रीं पाठ-वावें आणि पर राष्ट्रातून शिकून आलेले कारागीर स्वदेशीं परत आल्यानंतर त्यांच्या नव्या विद्या व कारागिरी फैलावण्यासाठीं शालागृहें काढावीं व नानाविध कारखाने सुरू करावेत. हल्लीं वर्षे पर्यंत उमेद होती कीं, सरकार राष्ट्रीय कार्याला चांगला राजाश्रय देईल पण ती बहुत वर्षांची वाढत चाललेली आशा अगदीं विलयास गेली. सर्व हिंदुस्थानाकरितां १०१५ स्कालरशिपा ठेवण्या संबंधानें जो हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे त्याच्यामुळें एक निराशा तर झालीच पण या निराशेनें स्वावलंबनाचा धडा चांगला शिकविला आहे. हल्लीं देशी कारागिरी व देशी उद्योग प्रचलित करण्याच्या उद्योगाला जी मंडळी लागली आहे ती फार जोरदार, श्रीमान व श्रेष्ठ घराण्यांतील आहे. सध्यां ही मंडळी लहानशी आहे पण उत्तरोत्तर त्या मंडळीला पुष्कळ लोक येऊन मिळत आहेत. [illegible] ऐकिलें ह्मणजे एका प्रकारें मोठा आनंद होतो. या गांवोगांव फिरून वर्गणी मिळविण्याच्या उ-द्योगामुळें बंगालकडे दुसरी एक गोष्ट आपोआप घडून येत आहे. देशी वस्तू वापरण्या संबंधानें भेठमोठे कट होत आहेत. ज्या देशी वस्तु तिकडे उपलब्ध आहेत त्यांच्या तोडीच्या विलायती वस्तु तिकडील बाजारांत खपणार नाहींत अशी ही क्रांती लौकर घडून येईल असा योग दिसतो. बंगालच्या मंडळीच्या वरील उद्योगाचें अनुकरण इतर प्रांतांतील लोकांनीं अवश्य करावें आणि देशी वस्तु वापरण्या संबंधानें मनाचा पक्का निग्रह करावा असें आह्मी सुचवितों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—हल्लीं उष्मा अतिशय होतो आणि तो इतका होतो कीं, वऱ्हा-डांतील उन्हाळा आपल्या उग्रनाम स्वरूपाला पोहोंचला आहे असें लोकांस चांगलें जाण-वतें. तरी यंदा सांथीच्या आजारापासून सध्यां आमचा प्रांत मोकळा असून सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

लेफ्टनंट कर्नल इ० डब्ल्यू रेली सिव्हिल सर्जन आकोला हे रजेवरून परत येतांच उमरावतीस सिव्हिल सर्जनचे कामावर रुजू होतील. डाक्टर रेली साहेबांची बदली सदर स्टेशनला करण्याचा हेतु हाच दिसतो कीं, त्यांच्या इतके जुने सिव्हिल सर्जन वऱ्हाडांत दुसरे कोणी नाहींत. येथील सिव्हिल सर्जन-च्या जागीं डाक्टर रेली साहेब ध्रुवा सारखे अचल होते पण त्यांच्या या अढळ पदाव-रून त्यांस हलविण्यांत आलें असें पाहून कांहीं लोक तर्क करितात कीं येथील जेलाच्या प्रकर्णा संबंधानें त्यांची बदली मुद्दाम करण्यांत आली असावी पण हा तर्क खरा असेल असें मानण्याला आह्मांला कांहीं कारण दिसत नाहीं.

डाक्टर रेली साहेब उमरावतीस दाखल झाल्या नंतर तेथील सध्यांचे आफिशिएटिंग सिव्हिल सर्जन लेफ्टनंट फौलर हे येथील जागीं दाखल होतील.

रा० रा० लक्ष्मण नारायण गोखले तहशिलदार पुसद यांची बदली मोर्शी तहशिलीवर करून रा० रा० सय्यद फरुके हुसेन यांस पुसद तहशिलीवर बदलण्यांत आलें.

रा० रा० भास्करराव वैचलेकर ऑफ मुंबई बँक आकोला यांस सिंधखेड मधुर येथील ऑफिसावर तूर्त ६ महिन्याकरितां बदलीवर धाडण्यांत आलें आहे. हे गृहस्थ आपल्या कामांत फार निपुण व दक्ष असून स्वभावानें फार सुशील आणि वर्तनानें अगदीं बाळबोध असे आहेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८- |
| सोनें २४।= | चांदी ७१ |
| जवारी ६० | मसूर ७९ |
| गहू काठे ७२॥ | बनशी ६[illegible] |
| सरकी | [illegible] |
| मीठ | ३।= रु. मण |
| चणे | २॥= रु. मण |
| तूप | ९॥ रु. मण |
| तेल | ४। रु. मण |
| रुई जीन | [illegible] |
| कापूस | १०-[illegible] |

**संततीवर कर**— अमुक मुलांपेक्षां ज्यास्त मुलें झालीं कीं कांहीं कर दिला पाहिजे असा फ्रान्स देशांत कायदा आहे. असा कायदा आपल्याकडे होईल तर सर्वांचा गोंधळच उडेल.

**किळस येते**— चिन देशाकडील उत्तर-शान संस्थानामध्यें प्रवास करणारा एकजण ह्मणतो कीं, टोटाई गांवच्या तहशिलदारानें मेजवानी दिली ! तींत हिरवीं केळीं, पाया, कांदा, लसूण, आलें, चिंच व कांहीं कोम इतके पदार्थ वस्त्रेन आमच्या पुढें ठेविले. आतां मी खात नाहीं, असी खूण करण्यावरून एक सूप भरून मऊ शा आणल्या, त्या पाहतांच मला शहारे आले ! मी तोंड फिरवून हातानें नको ! नको ! असें करतांच सर्व माणसें खदखदा हांसली ! तुह्मी खा ! असें मी खुणेनें दर्शवितांच कमावीसदाराच्या धाकट्या मुलानें एकावर एक मशी उचलून पंख तोडून चावून चावण्यास आरंभ केला !

**सुलतानाची दौलत**— तुर्कस्थानच्या खजिन्यांत सुलतान दुसरा अहमद व त्यानंतर झालेल्या सर्व सुलतानांची पागोटीं व कपडे ठेवण्यांत आले आहेत. हा प्रत्येक कपडा हिऱ्यांच्या सरांनीं सुशोभित केलेला आहे. सन १५१४ सालीं तुर्कस्थानानें हस्तगत केलेली इराणची बादशाही गादी याच खजिन्यांत ठेवलेली आहे या गादीसभोंवतीं हिरे मोती, माणके, त्रिलिअन, पोखराज वगैरे मौल्यवान रत्नें लावण्यांत आलीं आहेत. यात्रप्रमाणें पहिल्या सुलेमानची अशीच गादी तेथें ठेवण्यांत आली आहे. या गादीची किंमत करितां येणें अशक्य आहे. अशाच तऱ्हेच्या इतर पुष्कळ मौल्यवान वस्तु तेथें ठेवण्यांत आल्या आहेत.

**मौजेचा पलंग**— हिंदुस्थानपैकीं एका संस्थानिकानें पारिस येथून एक मौजेचा पलंग मागविला आहे. हा पलंग अरेबियन नाइट्स पुस्तकांत वर्णन केलेल्या पलंगाप्रमाणें फारच खर्चीदार तयार झाला आहे. तो फार उंची लांकडांचा बनविलेला असून त्यावरील कोरीव काम पाहून मन सुप्रसन्न होतें. या कोरीव कामांत सदर संस्थानिका संबंधीं एक सुंदर लेख कोरण्यांत आला असून पलंगाच्या चार पायांशीं एक एक उत्तम पुतळी उभी करण्यांत आली आहे या पुतळ्या शृंगारिक नेत्रकटाक्षांनीं पलंगावर शयन करणाऱ्या मनुष्याचें चित्त सारखें रमवीत असतात. त्यांच्या हातांत उंची अलंकार घातलेले असून त्या हातांनीं त्या बिछान्यावर निजणाऱ्या मनुष्यास पंखानें वारा घालतात, याहीपेक्षां या पलंगांत विशेष खुबी ही आहे कीं त्यावर मनुष्य निजल्या-बरोबर उत्तम प्रकारच्या सुस्वर निजानागण्यास सुरवात होते. या योगानें निजलेल्या मनुष्यास त्वरित झोंप लागते.

**थंडी तापावर उपाय**— रुटेनशाचा भाजीचा पक्का हातावर चोळून, तो ग्लेशा कोणत्याही हाताच्या नाडीवर थंडी वाजूं लागतांच गच्च बांधावा आणि थंडी राहिल्यावर अर्ध्या तासानें सोडावा.

असें केल्यानें दुसऱ्या दिवशीं ताप यावयाचा नाहीं असा अनुभव आहे.

**दुसऱ्याचें बोट असें शिरकतें**— सावंतवाडी संस्थानांत अभ्रकाची खाण असल्याचें पुष्कळ दिवस पूर्वींच लोकांत उमगलें आहे. पण एकाही स्वदेशभक्तानें आपल्या ज्ञानाचा उपयोग आजपावेतों या गोष्टीकडेस केलेला नाहीं. आतां असें सांगतात कीं मि० न्यॉइल नांवाचे एक गृहस्थ विलायतेहून सावंतवाडी संस्थानांत आले व त्यानीं कडावली नांवाच्या गांवीं असलेल्या अभ्रकाच्या खाणी शोधून काढल्या. त्यानीं तूर्त एक लहानसा कारखाना काढला आहे. हें अभ्रक चांगलें उंच प्रतीचें असल्यानें आढळून आलें.

**सत्तर वर्षांचा माणूस पाळण्यांत निजतो**— पारिस शहरांत वॉलेस सुर्नो नांवाचा एक माणूस आहे. त्याचें वय ७० वर्षांचें आहे. तो लहान मूल असतांना ज्या पाळण्यांत निजत असे, त्याच पाळण्यांत अद्यापही निजतो. इतकेंच नाहीं, तर आज सत्तर वर्षांत तो या पाळण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं निजला नाहीं. वॉलेस हा आपल्या आईचा पाचवें कानिष्ट मूल असल्यामुळें, या पाळण्यांत निजणारें मूलच नव्हतें. परंतु तो जसजसा मोठा होत गेला, तसतसे त्याचे पाय लांब झाले व या पाळण्यांत मावेनात. तेव्हां त्यानें पाय वर करून निजण्यास सुरवात केली. हल्लीं तर तो आसनवाडी घातल्यासारखे गुडघे टुपकून निजत असतो. गुडघे इकडे तिकडे हालवून तो झोंपा काढतो व झोंपीं जातो. ही लहानपणीं जडलेली संवय अद्याप कायम आहे.

**रेशमाचें झाड**— पनामा संयोगिभूमीवर एक विलक्षण झाड आहे. हें झाड १५ ते २० फूट वाढतें. दिसण्यांत इतर झाडांसारखेंच दिसतें. त्याची आंतली साल ह्मणजे निवळ रेशमाचे तंतु होत. ते लांब, मऊ व मजबूत असतात. तेथील लोक ती साल मोठ्या युक्तीनें काढून घेतात. ती साल वेगळी करून तिचे धागे बनविले ह्मणजे त्यांचें सुंदर कापड विणतां येतें. तें इतकें रेशमी कापडासारखें दिसतें कीं, ज्याला तें माहीत नाहीं, त्याला तें ओळखतां येत नाहीं. या रेशमाचें कापड त्या प्रांतातील लोकांना विशेषेंकरून स्त्रियांना फार आवडतें.

**विषाची दरी**— जावा बेटांत 'ग्वुएडहा युपास' नांवाची एक दरी आहे. ती ह्मणजे आसपासच्या लोकांच्या मनांत अत्यंत भय उत्पन्न करणारें एक स्थान आहे. या दरींत जाणारा प्रत्येक प्राणी—मनुष्य, पशु, पक्षी—तात्काळच मरून पडतो. या दरींतून कार्बोनिक ॲसिड ग्यास सारखा ग्यास बाहेर पडत असतो, तो मध्यभागीं सांचला जाऊन त्याचें एक तळेंच बनलेलें आहे या प्राणघातक दरींत शेंकडों प्राण्यांचीं हाडें आंत पडून राहिल्यामुळें ती पांढरी दिसते.

**मनोऱ्यावरून उडी घातली**— सुमारें दहा वर्षांपूर्वी मुंबईच्या राजाबाई टॉवरवरून पडून दोन परशी तरुण स्त्रिया मेल्या होत्या. गेल्या शुक्रवारी ११॥ वाजतां टॉवरवरून २० वर्षांच्या एन. एन. रुटेना नांवाच्या तरुण पारशी मुलानें उडी घालून प्राण घालविला; धीवरांती त्यानें आत्महत्या केल्याचें बाहेर आलें आहे.

**गुणी मनुष्य**— मुंबईचे प्रो. भिडे हे नुकतेच विलायतेकडे सहकुटुंब गेले आहेत. यांचें वय ३८ वर्षांचें आहे. हे मॅट्रीक परिक्षा पास आहेत हे गृहस्थ पूर्वीं देखील तीनदां विलायतेस मुद्दाम गेले होते. हे मोठे कल्पक बुद्धीचे असून यांनीं इतक्या दिवसांत दोनशे नवीन शोध लाविलेले आहेत. हे फार गरीब होते तरी आपल्या चिकाटीवर व गुणावर यांनीं आज पोठीत कीर्ति संपादन केली आहे. ह्यांचा हिंदुस्थानच्या कल्याणाकडे विशेष ओढा आहे आणि ह्मणून कांहीं यांत्रिक सुधारणा व शोध करून हिंदुस्थानचें पाऊल जरा पुढें पडेल असें कांहीं तरी करावें असें यांच्या मनानें पक्कें घेतलें आहे व त्या प्रीत्यर्थ त्यांची सर्व खटपट व खटाटोप सुरू आहे. यांच्या विलक्षण कल्पनाशक्तीचें एक ठळक उदाहरण दिलें ह्मणजे बस आहे. १८९७ सालीं यांनीं एक नवीन यंत्र तयार केलें. या यंत्रानें साखर, कणीक वगैरे पिठूळ पदार्थ एकंदर जसे लागतील तसे आपोआप वजन करितां येतात. या यंत्राबद्दल बक्षीस लाविलें होतें व तें बक्षीस यांनींच मिळविलें. इतकेंच नव्हे तर यंत्राची उपयुक्तता व सुधारणाबद्दल त्यांनें बक्षीस मुद्दाम जाहीर पदवी देण्यात येणार आहे. असे गुणीजन हिंदुस्थानास लाभोत व त्यांस यश येऊन हिंदुस्थानाचें कल्याण होवो ही ईश्वरापाशीं प्रार्थना आहे.

**जखमेवर घरगुती उपाय**— जखम होऊन शरीरांतून रक्त वाहूं लागल्यास तांदळाचें पीठ जखमेवर घातलें ह्मणजे रक्तप्रवाह बंद पडतो.

**स्वस्त तारेचा फायदा**— चार आण्यांत तार पाठवितां येऊं लागली तेव्हां पुष्कळ लोकांस वाटलें कीं यापासून कांहीं तसा फायदा होणार नाहीं. पण आतां या चार आण्यांच्या तारा इतक्या तारा जात आहेत कीं, सरकारला अधिक सिग्नलर्स ठेवण्याची वेळ आली आहे व लवकरच पुष्कळ लोकांस कायमच्या चाकऱ्या मिळतील यांत संशय नाहीं.

**पाईन झाडांचा उपयोग**— या झाडापासून पटकीची साथ बंद होते असा अनुभव आहे. आणि ताप व फुफ्फुसाचे रोग नाहींसे करण्यास तर हीं झाडें अमृतोपम होत.

### चमत्कार

(रामनामाचीं झाडें)

आउटराम बागेंतील झाडांच्या खोडावर राम, राम, आणि दोन तीन ठिकाणीं राम नाम असे शब्द दृष्टीस पडले. प्रथमतः एकाच झाडावर असे शब्द दिसले. त्यामुळें संशय येऊन आणखी एक दोन तशींच झाडें पाहिलीं, तर त्यावरही सदरहूच शब्द दिसले. एक दोन ठिकाणीं फांदीची साल काढून पाहिलें तरी सदरहू शब्द दिसलेच. यावरून ती रामनामाचीं झाडें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सदरहू झाडें ८ आगस्ट ९ मेलांच्या दरम्यान आहेत. पुढें तपासांअंतीं असें कळून आलें कीं एक हिंदू ठिकाणीं एक रूप रामनामाचा जप करित होता. यावरून त्याच्या आसपास असलेल्या झाडांवरही रामनाम बठलेलें आहे. सदरहू शब्द कृत्रिम नसावेत अशी मनाची पक्की खातरी झाली आहे.

### नोटीस

बेशमी— रा. रा. माधोसिंग वल्लद हरिसिंग रजपूत दुकान केळीवळी तालुके आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविलें जातें कीं केळीवळी येथील शेत सर्वे नंबर १३९ पैकीं एकर गुंठे ८।१९ आकार २१ याचे खातें माझे नांवें असून त्यांतील ॥ हिश्याचे भागणीदार मय्या, गजराई वगैरे अज्ञान त्रिवर्गापासून ॥ हिस्सा तुह्मी तारीख २२ जानेवारी सन १९०४ रोजीं १६० रुपयांस खरेदी केला. नवीन वडिलोपार्जीत असून अज्ञानांचा मला अधिकार असल्यामुळें माझे संमति शिवाय हिस्सेदारांनीं विकलें व आपण घेतलें हे योग्य नाहीं. "तुमचे १६० रुपये घेऊन खरेदी करून द्या" ह्मणून तुह्मांस चार पांच वेळा विनंति केली. पण आपण ऐकत नाहीं सबब मुद्दाम कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत १६० रुपये घेऊन मला खरेदीखत करून द्यावें व आमच्या नोटीचा खर्च भरून द्यावा अंतर न केल्यास कोर्टांत दावा करावा लागेल. व एकंदर सर्व खर्च तुमचेवर बसेल मग तुमची कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. तारीख. १९ माहे मे सन १९०४ इ०

सही
नन्ही वल्लद अंबू महार राहणार
वडाळी परगणे व ता०
आकोट निशाणी हातनि
काठी.

## बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा ! किंमत पाऊण आणा प्रती बेताच्याच आहेत.

इंग्रजी शाळांतील मुलांस मुळाक्षरांची व दहा अंकांची माहिती लौकर व उत्तम करून देणारें सोपें साधन. रा० शेवडे, मोगदे, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळींचे अभिप्राय. पुस्तकें मेपर्यंत मिळतील. मेचे आंत एक रुपयाची बेरजेस टपाल खर्च माफ.

पत्ता—नारायण रामचंद्र नागलकर शेगांव जि० आकोला (वऱ्हाड)


## स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील तेर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

**धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.**
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट
मुंबई.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........।१ ०।
दुसरे खेपेस.... .....।

advance.
Single copy ........................ 2 as
dvertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 30 MAY 1904 NO 21

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ३० माहे मे सन १९०४ इ० अंक २१

## ग्रेट इंडियन पानिनसुला रेलवे.

### जाहिरात

तमाम लोकांस या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं, एक वाघीण भर कोळसा तारीख २० नोव्हेंबर सन १९०३ रोजीं भागा नांवाच्या स्टेशनावर चढवून 'चांदूर' नांवाच्या स्टेशनाला रवाना करण्यांत आला. हा माल कोणीहि येऊन घेऊन न गेल्यामुळें, तो चांदूर स्टेशनवर तसाच पडून राहिला आहे. सबब कळविण्यांत येतें कीं ह्या जाहिरातीच्या प्रसिद्धीच्या तारखे-पासून १५ दिवसांचे आंत हा माल नेण्यांत आला नाहीं आणि त्या माला बद्दल रेलवेचा महसूल जो देणें निघत असेल तो दिला नाहीं तर सन १८९० च्या इंडियन रेलवे आक्ट ९, च्या ५५ आणि ५६ कलमा अन्वयें हा माल जाहीर लिलावानें विकला जाईल.

सही

मुंबई ता. ७।५।०४ — ए. मूर हेड. जनरल ट्राफिक म्यानेजर जी. आय. पी. रेलवे.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, 'भागा' स्टेशनावरून एक कोळशाची वाघीण 'मूर्तिजापुरा'स आली आहे. त्याचा मालक कोणीहि न आल्यामुळें 'मूर्तिजापूर' स्टेशनावर ती वाघिण तशीच पडून राहिली आहे, सबब या लेखाअन्वयें जाहिर खबर देण्यांत येतें कीं, ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसांचे आंत जर हा माल नेला गेला नाहीं आणि या माला संबंधानें देणें असलेला सर्व महसूल दिला गेला नाहीं तर सन १८९० चा दि इंडियन रेलवे आक्ट १० वा यांतील कलम ५५ व ५६ अन्वयें हा माल जाहीर लिलावानें विकण्यांत येईल.

सही

मुंबई ५ मे १९०४ — ए. मूर हेड. जनरल ट्राफिक म्यानेजर जी. आय. पी. रेलवे.

## नोटीस

रा. रा. राजाराम वल्लद जयराम पाटील राहणार पाटखेडे तालुका आकोला यांसः—

या लेखानें कळवितों कीं तुह्मी भूल-थापींत गोविंदा वल्लद चिमणाजी पाटील राहणार पाटखेडें यांस समाइक स्थावर इस्टेटी पैकीं कांहीं जिन्नगी विकली आहे पण ती विकण्याचा अधिकार तुह्माला नाहीं आणि तुमच्या गैरकायदा विक्री मुळें आमची जी नुकसानी होईल ती सर्व तुह्मास द्यावी लागेल. आणि ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत ती खरेदी रद्द करण्या विषयीं जलदी तजवीज करावी कळावें २४ मे सन १९०४ इ०

सही

आकातराव जयराम पाटील राहणार पाटखेडें दस्तुर खुद.

## नोटीस

बेशर्मी— गोविंद वल्लद चिमणाजी पाटील राहणार पाटखेडे तालुका अकोला -यांसः—

खालीं सही करणार याजकडून या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मी माझा वडील पण वेडसर भाऊ राजाराम पाटील याजपासून आमच्या अविभक्त कुटुंबांतल्या स्थावर इस्टेटीचा हिस्सा विकत घेतला आहे. खरेदीखतांत जो हिस्सा लिहिला आहे तितका हिस्साच विकण्याचा राजाराम याला कायद्यानें अधिकार नाहीं. हा तुमचा खरेदीचा व्यवहार खरेपणाचा नाहीं. नोंदणी अंमलदारासमोर ७०० रुपये दिले पण ते तुह्मी कशा रितीनें रोख रुपये मोजले व ते मागाहून घरीं नेलें योग्यवेळीं शाबीत करीन. असो. तुमची खरेदी बातल आहे. माझ्या भावाला फसवून तुह्मी तो व्यापार केला आहे. त्या खरिदीचे आधारानें तुह्मी शेतीचा किंवा घराचा ताबा करूं पाहाल तर ती गोष्ट आह्मी चालूं देणार नाहीं. तुह्माला शेतींत येऊं देणार नाहीं. तुह्याला दिवाणी कोर्ट खुलें आहे.

या शिवाय तुमचा बाप चिमणाजी पाटील जिवंत होता तेव्हां त्यानें माझा बाप मरण पावल्या नंतर राजारामाचें पालन करण्याचें काम आपल्याकडे घेतलें आणि त्याच्या पोटापाण्यासाठीं ह्मणून मौजे पाटखेडें येथील सर्व्हे नंबर ७३ यांतील ½ हिश्याची जमीन त्यानें माझी मातोश्री कौतिकाबाई इजकडून तोडून घेतली. पुढें राजाराम वयांत आला तरी ती ½ जमीन आपल्याच घरीं आटोपून बसला आहे. ही ½ जमीन ताब्यांत परत घेण्याविषयीं मी कोर्टांत दावा करून सर्व नुकसानी मुद्दां हा ½ हिस्सा ताब्यांत घेईन. आमची बिन-वाटलेली समाईक शेती मी विठू वल्लद नव्लाजी याला नफ्यानें लावून काढली आहे. ही गोष्ट तुमच्या माहितीसाठीं कळविली आहे. कळावें. तारीख २४ मे १९०४ इ०

सही

आकातराव वल्लद जैराम पाटील राहणार पाटखेड दस्तुर खुद.

## शेतीची जमीन

मळई जमिनींत वाळू व चिकणी माती यांचें प्रमाण बहुधा समसमान असतें ह्मणून त्यांत दोघांचेही चांगले गुण सांपडतात. परंतु निव्वळ वाळू अगर चिक्कण माती यांत जे दोष असावयाचे ते मात्र तींत नाहींत.

शाडवट जमिनीचा रंग बहुधा करडा व कधीं कधीं पांढरा असतो. ह्या जमिनी, तत्स्थानिक प्रकारच्या असल्यामुळें त्या बहुत करून नापिकी व वाईट असतात. परंतु थंड प्रदेशांत ज्या ठिकाणीं पाऊस बेताबातानें व वरचेवर पडतो त्या ठिकाणीं ह्या जमिनीवर कड धान्यें, नीळ व ज्या ज्या पिकांना चुना फार लागतो अशीं पिकें चांगलीं होतात.

**मोजणी खात्यांनीं केलेलें जमिनीचें वर्गीकरण—** या प्रदेशांत मोजणी खात्यामध्यें जमिनीची प्रत लावतानां तिच्या रंगाकडे लक्ष्य देतात. त्यांनीं एकंदर जमिनीचे मुख्य तीन वर्ग केले आहेत.

**१ काळ्या जमिनी—** ही जमीन सर्व वऱ्हाडांत सांपडते व ज्या ज्या ठिकाणीं ट्रॅप नांवाचा काळा भोर फत्तर असतो त्या ठिकाणीं बहुत करून काळी माती सांपडण्याचा संभव जास्त असतो. अशा जमिनीत कापूस फार पिकतो ह्मणून त्यास कपाशीचें रान असें ह्मणतात. त्या जमिनींत दगड फारच क्वचित् दृष्टीस पडतात. कधीं कधीं ह्या जमिनी खालीं चुनखडीचा एक पातळ थर असतो. उन्हाळ्यांत ही जमीन वाळून कठीण होते व तींत अनेक भेगा पडतात. पावसाळ्यांत भिजली ह्मणजे ती चिकट होऊन नांगरणी वगैरे करतां येत नाहीं. ही जमीन बरीच खोल असते व तींत शेंकडा ४ पासून ७ भाग पर्यंत अग्निदाह्य असतो. हवेंतून आर्द्रता शोषून घेण्याचा गुण या जमिनीच्या अंगीं असल्यामुळें त्या पुष्कळ दिवसपर्यंत ओलसर राहतात. तींत ज्वारीचीं पिकेंही चांगलीं होतात.

**नांवड्या जमिनी—** या जमिनींत लोखंड थोड्या बहुत प्रमाणानें असतें. जमिनीच्या पृष्ट भागावर जे लोहकण असतात ते जंगून त्यामुळें जमिनीस हा तांबूसपणा आलेला असतो. लोहरस जमिनींत असणें अत्यावश्यक आहे कारण त्याचमुळें हवेंतील आर्द्रता शोषण होतें व त्यामुळेंच जमिनीवर उगवणाऱ्या झाडानां हिरवा रंग येतो. अशा जमिनींत चिकण माती फार असणें चागलें नाहीं. तांबड्या जमिनी जर चिकण असल्या तर त्या बहुत करून नापीक असतात. या जमिनींत रेतीचा अंश जर अधीक असला तर त्या ज्यास्त सुपीक निघतात.

**भुरक्या किंवा हलक्या रंगाच्या जमिनी—** अशा जमिनी पिंवळसर दिसतात. त्यांचा रंग निव्वळ तांबडाही नसतो व काळाही नसतो. यांत अग्निदाह्य अंश फार कमी असतो. अशा जमिनी जर उष्ण प्रदेशांत असतील तर त्यांत सेंद्रिय अंश असणें फार जरूर आहे. सेंद्रिय ( प्राणिज व वनस्पतिज ) अंश ज्या मानानें या जमिनींत असेल त्या मानानें हवेंतील आर्द्रता शोषून घेण्याची, पावसाचें पाणी आपले पोतांत सांठवून ठेवण्याची व तीवर उगवणारीं झाडें उन्हाळ्यांत पोसण्याची योग्यता या जमिनीच्या अंगीं ज्यास्त येते.

**उसार जमिनी व त्यांची दुरुस्ती—** जी जमीन पांढरी असते तिच्यांत कदाचित् चुना फार असला किंवा क्षार फार असला तर तिच्या पृष्ट भागावर पावसाळ्या नंतर एक प्रकारचा पांढरा थर दृष्टीस पडतो अशा जमिनीस उत्तर हिंदुस्थानांत उसार असें ह्मणतात. यांत आपण खातों तें मीठ असतें व परीट लोक कपडे धुण्याकडे पापडखार नांवाच्या ज्या अशुद्ध क्षाराचा उपयोग करितात तो बऱ्याच प्रमाणानें असतो. पाण्यांत घालून ढवळल्या नंतर जे क्षार त्यांत विरघळतात त्यांस द्राव्य असें नांव आहे. हे द्राव्य क्षार ज्या जमिनींत शेंकडा दोन पेक्षां अधीक प्रमाणानें असतील त्या जमिनी बहुतकरुन सुपीक असत नाहींत.

उसार जमीनीची सुधारणा खालील उपायांनीं सहज होण्यासारखी आहे.

( १ ) सेंद्रिय अंश पुष्कळ घालावा.
( २ ) उसार जमिनींत चिकण माती जर फार असेल तर तींत वाळू मिसळावी.
( ३ ) रागी, नारळ, कॅसुरिना व आणखी ज्या झाडानां मीठ लागतें अशीं झाडें नेहमीं लावावींत.
( ४ ) जमिनीच्या खालून पाण्याचा पाट काढून द्यावा.

या देशांत जमिनीच्या पोटांतून पाट खोदून पाणी काढून लावणें फार कठीण व त्रासदायक आहे या साठीं दोन्ही बाजूस उतरते व मध्यें उंच असे वाफे पाडावे.

प्रत्येक वाफ्याच्या शिगीवर ( उंच भागावर ) नारळीचीं झाडें लावून दोन्हीं बाजूंच्या उतरणीवर रागाचीं पिकें काढावीं उन्हाळ्यांत पाण्याची वाफ होऊन ती वर येऊं लागली ह्मणजे क्षार जमिनीच्या

घष्ट भागावर येतील व पाऊस पडला ह्मणजे पाण्याच्या जोरानें दोन वाफ्यामध्यें नाली सारखी सखल जागा ( दांड ) पडतो त्यामधून ते शेताबाहेर वाहून जातील. शेताच्या उतरत्या बाजूस या नाल्याशीं काटकोनांत येईल असा दुसरा एक मोठा चर खणावा; ह्मणजे शेतांतील लहान चरांतून क्षारयुक्त पाणी निघालें कीं तें तात्काळ या मोठ्या चरांतून लांब निघून जाईल.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेठ वद्य १ शके १८२६

## पुनः पण तेंच

( इनकम टॅक्स वरील आक्षेप )

या करा संबंधानें आह्मी पुष्कळ आक्षेप घेतले आहेत आणि त्या प्रत्येक आक्षेपाचें विवेचन सप्रमाण मागील चार पांच अंकांत केलेलें आहे. हा विषय आह्मी आज पुनः हातांत घेणार नव्हतों पण गेल्या इंडिया गॅझेटमध्यें नुकताच सरकारी ठराव प्रसिद्ध झाला आहे कीं, वऱ्हाड प्रांतांत जो टौनफंड नांवाचा कर बसविण्यांत येत असे तो कर वसूल करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल साहेबांनीं १९०४ च्या एप्रिल महिन्यापासून काढून घेतला आहे. या हुकुमाचा अर्थ इतकाच कीं या पुढें टौनफंड टॅक्स वसूल करण्यांत येणार नाहीं. आतां ज्या अर्थी उत्पन्ना वरील कर या नांवाचा बादशाही कर नव्यानें बसवावयाचा आहे त्याअर्थी टौनफंड व इनकम टॅक्स असे उत्पन्नावर दोन कर होतील ह्मणून पूर्वीचा बंद करून दुसरा सुरू करण्यांत येईल. उत्पन्नावर दोन कर असूं नयेत एवढाच या ठरावाचा भावार्थ दिसतो. या नवीन व्यवस्थेनें लोकांचें मोठें नुकसान होणार आहे. इनकम टॅक्सचें उत्पन्न हिंदुस्थानच्या खजिन्यांत जाणार आहे आणि तो कर बसविल्यामुळें लोकल बोर्ड व म्युनिसिपालिटी या दोन संस्थांना मिळणारें टौनफंडाचें उत्पन्न मात्र नाहींसें होत आहे. इनकम टॅक्सचें उत्पन्न टौनफंडाच्या उत्पन्ना ऐवजी वरील दोन संस्थांस मिळेल अशीहि आशा करण्याला आधार नाहीं. सर्वच म्युनिसिपाल हद्दींत टौन फंड वसूल करण्यांत येतो असा आमचा ह्मणण्याचा अर्थ नाहीं, पण ज्या कांहीं म्युनिसिपल हद्दींत टौन फंड वसूल करण्यांत येतो त्या म्युनिसिपाल कमेट्यांना हिंदुस्थान सरकारकडून असें फर्माविण्यांत आलें आहे कीं, इनकम टॅक्सामुळें त्यांचें टौन फंडाचें उत्पन्न नाहींसें होईल तेव्हां त्यांनीं आपापल्या स्थानिक गरजाप्रमाणें नवीन म्युनिसिपल कर बसविण्याची व्यवस्था करावी. लोकल फंडाच्या संस्थेला सरासरी १ लक्ष ४० हजार रुपये पर्यंतचें उत्पन्न टौन फंडाच्या करापासून दरसाल मिळत असे. तें उत्पन्न या पुढें अतां कमी होईल आणि ही उत्पन्नाची निवूर भरून काढणें साठीं लोकल बोर्डाला दुसरा एखादा कर बसविण्याचा अधिकार मिळण्याचा संभव आहे. आणि असा अधिकार नच मिळाला तर कमी झालेल्या उत्पन्नाच्या मानानें लोकल फंडाचीं तितकीं कामें कमी होतील. पण ही दुसरी गोष्ट होईल तरी लोक सरकारचे उपकारच मानतील कारण, लोकांना हल्लींचेच कर फार भारी वाटत आहेत. पण असा प्रकार बहुधा घडणार नाहीं आणि उलट सार्वजनिक कार्याचा हव्यास आमच्या सरकाराला नवीन नवीन कर बसविण्याचीच गोष्ट सुचवील.

इंडिया सरकारचें मुख्य धोरण असें दिसतें कीं उत्पन्नावर दोन कर नसावेत. अर्थशास्त्र दृष्ट्या उत्पन्नावरील कर हा त्याज्य करा पैकीं आहे आणि आपद्धर्माच्या वेळींच असा कर बसवावा असें राजनीतीहि सांगते. अर्थातच एक त्याज्य कर बसविला तर त्याच स्वरूपाचे दुसरे कर बंद करावे असें सरकारास जरूर वाटलें आणि ह्मणूनच टौनफंडाचा कर बंद करण्यांत आला आहे. टौनफंड बंद करून इनकमटॅक्स प्रचलित करण्याचा सरकारी ठराव कागदावर फार सोज्वळ दिसतो पण वस्तुतः प्रकार फार निराळा आहे. टौनफंडाचे ऐवजीं जे नवीन कर बसविण्यांत येतील त्यांचें नामाभिधान मात्र निराळें, पण अप्रत्यक्ष रीतीनें हे दुसरे कर ह्मणजे लोकांच्या प्राप्तीवर नवीन नवीन गदाच होत. घरपट्टी ह्मणून कर बसवा वा आयात मालावर कर बसवा किंवा एखादे दुसरें गोडसें नांव देऊन दुसरा कसला तरी कर बसवा. पण हे सर्व कर लोकांच्या प्राप्तींतूनच वसूल करण्यांत येतील. हल्लींचा प्रश्न फक्त इंग्रजी कल्पकतेचा आहे. सरकारचा भावार्थ असा कीं, आमचा इनकम टॅक्स हा तर लोकांनीं प्रथमच दिला पाहिजे आणि तो कर दिल्या नंतर त्यांनीं कांहीं एक कुरकुर न करितां दुसरे कर अशा संज्ञेखालीं दिले पाहिजेत कीं, त्या संज्ञेनें ते कर उत्पन्नाच्या कराच्या व्याख्ये खालीं येणार नाहींत. सरकाराला कागदावर अर्थशास्त्राचें सिद्धांत चांगले वठवितां आले ह्मणजे झालें आणि मग कल्पकतेच्या जोरावर त्याच अर्थशास्त्राचा जरी उच्छेद करण्यांत आला तरी कांहीं हरकत नाहीं.

इनकम टॅक्स ह्मणजे एक मोठा थोरला मगर आहे आणि या मगराची मिठी लहानसान पिल्लां भोंवतीं नाहीं हें खरें, पण आमच्या समाजांतील जे सुखवस्तू गजेंद्र आहेत त्यांना मात्र ही मगरमिठी चांगली जर्जर करून सोडील. ही मिठी एकवार पक्की बसली ह्मणजे तिच्यापासून कधींकाळीं सुटका होईल अशी आशा करणें व्यर्थ होय. ह्या मगराच्या तडाख्यांत आह्मी पक्के बांधले जात आहों हें आह्मी ओळखून आहों आणि ह्मणूनच अशा संकटांत पडतां पडतां मनाची विव्हळता विशेष होत आहे. ह्या मगरमिठीचा फास अगदीं अंगाशीं खेंचून बसेपर्यंत जी ओढाताण, धडफड व तडफड करवेल तितकी करण्याचा जो अंतःकरणाचा उत्तम धर्म आहे तो केला ह्मणजे समाधानी वाटेल. सरकाराशीं आपलें गाऱ्हाणें न्यावें मग आपली समजूत करून आपणांस आनंदी करण्याचें काम सरकारच्या मर्जीवर व रजीखुषीवर आहे.

## पिकांची फेरपाळी

सांप्रत काळीं आमच्या या प्रांतांतील मुख्य उद्योग धंदा झाला ह्मणजे शेती होय; आणि इतर हुन्नरांचे व कलाकौशल्याचे धंदे बुडाल्यामुळें लोकांच्या उपजीविकेला शेती हेंच एक साधन उरलें आहे. आणि त्यामुळें शेतीवरच चरितार्थ चालविणाऱ्या लोकांचा समूह एवढा मोठा वाढला आहे कीं, शेंकडा १० लोक देखील इतर धंद्यांत पडलेले सांपडणार नाहींत. अशा या स्थितींत शेती ही निकृष्ट अवस्थेला येत आहे ही गोष्ट फार वाईट होय. जमिनीचा कस फार उतरला आहे. आणि शेती नफ्यानें लावण्याची जी पद्धती प्रचारांत आलेली आहे तिच्यामुळें तर शेतीची स्थिती अगदीं नादान झाली आहे. या शिवाय शेतीच्या पिकामध्येंहि जसा फेर पालट व्हावला पाहिजे तसा तो अलिकडे बिलकुल होत नाहीं. हा फेरपालट ह्मणजे खरीप व रब्बी यांची फेरपाळी होय. अलिकडे खरिपाचेच पेरे पुष्कळसे होतात आणि रब्बीचीं पिकें उत्तरोत्तर फारच कमी होत चाललीं आहेत. खरिपाच्या व रब्बीच्या पिकांची फेरपाळी जमिनीला मोठी फायदेशीर होत असते. खरिपाचें पीक काढल्यावर त्या ठिकाणीं रब्बीचें पीक चांगलें येतें. तसेंच रब्बीच्या पिकाचा बीवड जमिनीला मिळाला ह्मणजे त्या जमिनींत खरिपाचा माल फार चांगला येतो. खरीप व रब्बी यांची ही फेरपाळी परस्पर फार पुष्टीदायक आहे. पण अलीकडे पाऊसपाण्याचा भरंवसा नसल्यामुळें लोकांचा भर खरिपाच्याच पेऱ्याकडे विशेष असतो आणि त्यांतल्या त्यांतहि कपाशीचा पैसा हातांत जलदी येतो आणि शेतीचा खटाटोपहि फारसा करावा लागत नाहीं ह्मणून लोकांची धांव कपाशीच्या पेऱ्याकडे फार असते. हल्लीं रब्बीचा पेरा बहुतेक बुडाल्यामुळें जवारी व कपाशी हींच दोन पिकें लोक फेरपाळीनें घेत असतात.

रब्बीचा पेरा फारच कमी झाला आहे ही गोष्ट सरकारांनीं प्रथमतः ध्यानांत घेतली पाहिजे. लोक रब्बीचा पेरा अधिक करितील अशा सवलती सरकारांतून लोकांस मिळाल्या पाहिजेत. रब्बी पैकीं गहूं आणि जवस यांच्या पेऱ्यासंबंधानें कांहीं माहिती आह्मी मुद्दाम खालीं उतरीत आहों. दहा वर्षांचे आंकडे पाहतां असें दिसून येतें कीं, सरासरी ९ लक्ष ३० हजार एकर जमिनींत गव्हाचा पेरा दरसाल होत असे आणि जर गेल्या पांच वर्षांची सरासरी काढली तर सुमारें २।। लक्ष एकर जमिनींत गहूं पेरला जात असे- यावरून हें लक्ष्यांत येईल कीं गेल्या ५ वर्षांच्या पूर्वींच्या संवत्सर पंचकांत निदान ७-८ लक्ष एकर जमिनींत गव्हाचा पेरा होत होता. चालूं १३१३ फसली सालीं सरासरी ४।। लक्ष एकर जमीन गव्हाच्या पेऱ्या खालीं होती. गेल्या सालची स्थिती पाऊस पाण्यासंबंधानें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी होती. वर्षा काळाच्या अखेरीला फार पाऊस झाल्यामुळें खरिपाचीं पिकें पुष्कळशीं बुडालीं आणि पुष्कळशा लोकांनीं खरिपाचीं उभीं पिकें कापून तेथें रब्बीचे पेरे केले. ह्मणूनच गुदस्तां रब्बीच्या पिकाकडे जमिनीचें अधिक क्षेत्र होतें. तर ही गोष्ट दरसाल रब्बीच्या पेऱ्या संबंधानें होईल असें ह्मणतां येत नाहीं, कारण आदल्याच वर्षी ह्मणजे फसली सन १३१२ मध्यें फक्त २ लक्ष १७ हजार एकर जमिनींतच गव्हाचा पेरा होता. गेल्या सालच्या पिकाचा अंदाज रुपयांतील १२ आणे होता. एकंदर गव्हाचें उत्पन्न ३६।। हजार टन असावें असा अदमास आहे. गव्हा प्रमाणेंच जवसाच्या पिकाची स्थिती आहे. जवसाकडे सरासरी १ लक्ष ८४ हजार ८ शें २३ एकर जमीन होती. खरीपाचीं पिकें पावसानें नासल्यामुळें पुष्कळशा ठिकाणीं पहिले पीक कापून जवस पेरण्यांत आला. जवसाचें उत्पन्न ११ हजार टन झालें असावें. येणे प्रमाणें १३१३ फसलींत आकस्मिक कारणामुळें रब्बीचा पेरा अधिक झाला आहे खरा पण तो हिशोबांत धरण्या सारखा नाहीं.

## धार्मिक शिक्षण

शाळांतून धर्म शिक्षण द्यावें किंवा नाहीं या संबंधोंन मोठा वाद आहे आणि सध्यां या वादाला पुन्हां नवीन स्वरूप येत चाललें आहे. इंडिया सरकारानें विद्या खात्यामध्यें पुष्कळ सुधारणा आरंभलेली आहे आणि या भावी सुधारणा विषयीं नाना विचार आणि नाना मतें प्रकाशित होत आहेत. अशा या समयाला जर एखाद्या कालेजचे मुख्य अध्यापक आपले विचार स्वतःच्या सहीनिशीं प्रसिद्ध करितील तर त्यांच्या त्या विचाराला अग्रस्थान मिळावें हें स्वाभाविक होय आणि जबाबदार व वजनदार अशा विद्याखात्याच्या गृहस्थांचे अभिप्राय जगापुढें मांडण्यांत येतात आणि ते जेव्हां एखाद्या जुन्या वादग्रस्त विषया संबंधानें असतात तेव्हा त्या अभिप्राया संबंधानें सर्वत्र चर्चा व्हावी हें अगदीं जरूरीचें आहे. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल रा. रा. रघुनाथराव परांजपे यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं शाळांतून व पाठशाळांतून धार्मिक शिक्षण देतां देण्यासारखें नाहीं आणि या शिक्षणाची सोय गृहशिक्षणाच्या क्रमामध्येंच झाली पाहिजे. धर्म शिक्षण हल्लीं जें मिळत आहे तें गृहशिक्षणाच्या द्वारें मिळतें आणि तें अपूर्ण असेल तर गृहशालेची कक्षा वाढविली पाहिजे. प्रो. परांजपे यांच्या या अभिप्राया सारखाच अभिप्राय प्रो. सेल्बी साहेबांचाहि आहे ही गोष्ट प्रो. परांजपे यांच्या मताच्या मंडनार्थ 'ज्ञानप्रकाश' कारांनीं पुढें आणिली आहे.

आमच्या मतें हल्लीं जो मुख्य वाद आहे तो धर्मशिक्षणाच्या संबंधानें नाहीं. धार्मिक शिक्षण उभयविध पक्षांनाहि पाहिजेच आहे. धार्मिक शिक्षणाच्या गरजे संबंधानें कोणचाहि द्विधा भाव नाहीं. धार्मिक शिक्षण अवश्य पाहिजेच या संबंधानें सर्वत्र एकवाक्यता आहे. पण तें कोठें, कसें व किती द्यावें

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली [illegible]च्या शास्त्रोक्त औषधांचा गुण शंभरी एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रपं, कोष, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, व ळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत वापरण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ गो० | १ रु० | ७९ गो० | २ रु० |
| ११९ गो० | ३ रु० | १६९ गो० | ४ रु० |
| २७९ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना——अलिकडे २।३। वर्षे आंजर्ले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांस नाना जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच काण जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

# ORIENTAL

**GOVERNMENT SECURITY**

LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.

Established 1874,

Head Office—**BOMBAY**

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED

# TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bomay, in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life assurance, is the means by which this danger is got over. Life being so uncertain the sooner a man makes up his mind to assure his life the better. One satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and, Khandesh.*

## मुंबई बॅंकची सेव्हिंग्स बॅंक

या बॅंकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

## बालशिक्षण भाग १ ला

त्वरा करा ! किंमत पाऊण आणा प्रती बेताच्याच आहेत.

इन्फंड क्लासांतील मुलांस मुळाक्षरांची व दहा अंकाची माहिती लौकर व उत्तम करून देणारें सोपें साधन. रा० शेवडे, जोगदंड, महाजन, देशमुख, देशपांडे वगैरे मंडळीचे अभिप्राय. पुस्तकें मेमध्यें निघतील. मेचे आंत एक रुपयाची घेणारास टपाल खर्च माफ.

पत्ता—नारायण रामचंद्र नागलकर शेगांव
जि० आकोला ( वऱ्हाड )

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.



द्यावे लागतील. ही नोटीस पोचतांच आठ दिवसांत शेतें आमच्या स्वधिन करावीं. कळावें. २८ मे १९०४ इसवी.

सही
देवराव उमाकांत मुंगी राहणार
शहापूर दस्तुर खुद्द.

## नोटीस

वेशमी यमी मर्द रामजी पाटील राहणार नांदुरा खुर्द परगणे लांजोड तालुका मलकापूर यांस—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं माझा बाप नामे रामजी वल्लद येडू पाटील यांनीं तुला गंधर्वाची बायको केली पण गंधर्व लागल्यापासून तूं मुळींच त्याचेपाशीं राहिलीस नाहींस आणि त्याचे मांदगीच्या वेळीं व मरणाच्या वेळीं देखील तूं आली नाहींस. तो मेल्यावर त्याची जिनगी माझ्या आईनें आटोपली तेव्हां तूं माझ्या आईशीं करार करून कृष्णा भारंब्या याच्या शेती नजिकचें शेत जन्मभर पर्यंत खाण्यासाठीं म्हणून घेतलेंस आणि तेव्हांपासून तूंच त्याचा उपभोग घेत आलीस. तें शेत मरेपर्यंत खाण्यासाठीं फक्त तूं घेतलेंस आणि बाकीच्या सर्व जिनगीवरील आपला वारशाचा हक्क सोडून दिलास. दीड वर्ष झालें माझी आईही मरण पावली. तिच्या नांवाची शेती सरकारांतून तुझ्या नांवें लागण्यांत आली. माझ्या आईच्या पश्चात दोन शेतें खामगांव सडकेचीं माझ्याकडे आली आणि त्यांचा भोगवटा मीच घेत आहे. बागाचा जो नंबर राहिला त्यांत रंगारी लोकांचीं घरें आहेत. घरांत मीच राहतें. बागाचा शेत सारा मीच देत असते.

खामगांव वाटेची दोन शेतें, बागाचा नंबर व राहतें घर ही जिनगी तुला विकण्याचा किंवा गहाण देण्याचा अधिकार नाहीं. असें असून तूं कांहीं लबाड लोकांच्या सांगासांगी वरून ह्या जिनगीचें गहाणखत २०० रुपयांचें लक्ष्मण वल्लद नारायण पाटील राहणार नांदुरे खुर्द याच्या नांवानें करून दिलें आहेस असें कळते, हा व्यवहार करण्याचें कारण कांहींच नव्हतें. विनाकारण मला त्रासविण्यासाठीं हा व्यवहार केला आहेस. तो बेकायदा असून रद्द आहे. गहाणाचा बोजा जिनगीवर पडूं शकत नाहीं. सदरहू जिनगी संबंधानें कोणी देवघेव करूं नये कां कीं जो व्यहार करील तो फसेल व त्यांच्या पैशाची जोखीम तुला भरावी लागेल. बागाच्या नंबरा बद्दल तुला कंपेनसेशन भरण्याचें कारण नव्हते. तरी तूं वृथा पुढाकार घेऊन रिकामी उठाठेव केलीस. कळावें. तारीख २८ मे १९०४ इ०

सही
साती मर्द नथू सुपे
राहणार नांदुरा खुर्द
निशाणी

## वर्तमानसार

या संबंधाच्याच विचारांत मतभेद दृष्टीस पडतो. असा मतभेद इंग्लंडांत नाहीं कारण तेथें एकच ख्रिस्ती धर्म असल्यामुळें विद्याखात्यांतूनच या शिक्षणाची योजना केलेली आहे. पण इंडियामध्यें नानाधर्म प्रचलित आहेत आणि राज्यकर्त्यांची वृत्ती सर्व धर्मासंबंधानें तटस्थपणाची आहे आणि ह्मणूनच सरकारांनीं आपल्या सार्वजनिक शाळांतून कोणत्याच धार्मिक शिक्षणाला स्थळ दिलें नाहीं. इंडियाच्या भिन्नस्थितीमुळें येथील विद्याक्रमांसंबंधानें ही भिन्न पद्धती सरकारास स्वीकारावी लागली आणि याच पद्धतीला धरून सर्व सरकारी शाळा चालतात इतकेंच नाहीं तर खानगी शाळा देखील सरकारी मदतीच्या लालचीनें आणि युनिव्हर्सिटींतील परिक्षांच्या धोरणानें सरकारी शाळांतीलच विद्याभ्यास शिकवीत असतात. सारांश विधेच्या दृष्टीनें सरकारी शाळा आणि खानगी शाळा यांच्यामध्यें आह्मांस फारसा फरक दिसत नाहीं. किंबहुना सरकारी शाळाहि आमचेच लोक सरकारचा पगार घेऊन चालवितात आणि खानगी शाळांची चालक मंडळी कमी वेतनावर आपल्या शाळा सरकारी नमुन्यावर चालवितात. खानगी शाळांतून देशाभिमान किंवा अशीच एखादी आवडती प्रेरणाशक्ती विद्यार्थ्यांमध्यें विशेष संचारत असेल असा जर कोणाचा ग्रह असेल तर तो ग्रह खोटा आहे असें आह्मी अनुभवावरून निक्षून कळवितों. खानगी विद्यालयांच्या प्रो. परांजपे यांच्या सारख्या चालकांना अ.प.त्या पुढील सरकारी किता वळवावयाचा आहे आणि जों पर्यंत त्यांच्या विद्यालयांतून निराळी नैसर्गिक प्रेरणाशक्ती खेळत नाहीं तोंपर्यंत आह्मी त्यांच्याच मताचा अंगिकार करून असें कबूल करितों कीं, सांप्रतच्या शाळा खात्याच्या वर्तमान स्थितींत धार्मिक शिक्षण देण्याची चांगलीशी संधी नाहीं आणि ही गोष्ट सरकारी शाळा संबंधानें जितपत खरी आहे तितपतच फर्ग्युसन कॉलेजासारख्या खानगी संस्थां संबंधानें खरी आहे.

येथपर्यंत प्रो. परांजपे यांचा व आमचा मतविरोध नाहीं पण त्यांच्या लेखानें धार्मिक शिक्षणाला एक वैगुण्य येऊं पाहत आहे ही गोष्ट कोणांसहि बरी वाटणार नाहीं. सार्वजनिक शाळांतून धार्मिक शिक्षणाला दूर सारण्याचीच गोष्ट प्राधान्यें करून त्यांनीं सांगितलेली आहे. धार्मिक शिक्षणासंबंधानें अशी ही होणारी निराशा आह्मांस मान्य नाहीं. धार्मिक शिक्षणाविषयीं शाळागृहांतून कांहीं कर्तव्य नाहीं असाच वरील प्रतिपादनाचा रोंख आहे. हा विचार विद्याखात्यांतील शिक्षकांचीच धार्मिक शिक्षणासंबंधानें जबाबदारी नाहींशी करितो. हाच या विचारांतील मुख्य दोष होय. आमच्या मतें ज्या शिक्षणांत धार्मिक शिक्षण नाहीं तें खरें शिक्षणच नाहीं. धार्मिक शिक्षण हें सर्व शिक्षणाचें प्रधान अंग होय. किंबहुना सर्व शिक्षणाचा अंतस्थ जिव्हाळा धर्म शिक्षण होय. धर्मशिक्षणाची उणीव गृहशिक्षणानें भरून येणारी नाहीं. आमच्यामधील गृहशिक्षण अगदीं लोपल्या सारखेंच आहे. इंग्रजी शिक्षण सुरू झाल्या बरोबर गृहशिक्षणाचा पाय आंत आंत येऊं लागला आणि थोड्याच पिढ्यांच्या कालांत गृहामध्यें धार्मिक शिक्षण मिळत नाहींसें झालें इतकेंच नाहीं तर गृहशिक्षण असें कांहीं निराळें उरलेंच नाहीं. सध्यां सर्व मिस्त शाळांतील शिक्षणावरच आहे आणि त्या धर्मरहित शिक्षणाच्या बोजाखालीं विद्यार्थी जन इतके चूर आहेत कीं त्यांना सध्यांच्या शिक्षणक्रमापुढें दुसरें कांहींच दिसत नाहीं. अर्थात् धर्म शिक्षणाची सोय शाळां गृहांमधूनच व्हावयाला पाहिजे आहे हें सहजच लक्षांत येईल. शाळांतून धार्मिक शिक्षण सुरू करण्यास अडचणी अनेक आहेत ह्मणून तें अजिबात वगळावें हें मात्र बरोबर नाहीं. खऱ्या कार्यकर्त्या माणसाची युक्ती अडचणींतून मार्ग काढण्याची असते. टाळाटाळ करण्यानें अडचण तर दूर होत नाहींच पण अनेक अडचणी नवीन नवीन उद्भवतात. धार्मिक शिक्षण शाळांमधून चांगलें देतां येईल ही गोष्ट विदुषी आनेबिझांट बाई यांच्या बनारसच्या सेंट्रल हिंदु कॉलेजनें चांगली निदर्शनास आणिली आहे. जी गोष्ट हिंदु कॉलेजनें केली आहे ती गोष्ट आह्माला सर्व कॉलेजमधून व्हावयास पाहिजे आहे. धार्मिक शिक्षणाचा विषय सर्व अभ्यासक्रमांमध्यें प्रथम पासून घातला पाहिजे. आणि याचा प्रारंभ श्रीगच्या धड्या बरोबरच व्हावयास पाहिजे. प्राथमिक शाळांतूनच जर प्रत्येक धर्माच्या ठळक ठळक गोष्टींचा प्रारंभ करण्यांत आला तर धर्म ग्रंथांतील उच्च तत्वें क्रमाक्रमानें समजूं लागतील आणि शेवटीं धर्माचें जें गुह्य ज्ञान त्याचीहि ओळख होईल. धार्मिक शिक्षणानेंच खरा मनुष्य बनतो. त्याची दानत, त्याचे सद्गुण आणि त्याच्यामधील स्पृहणीय गोष्टी या जितक्या धर्मद्वारां मनुष्याच्या अंगीं खेळूं लागतात तितक्या त्या दुसऱ्या कोणत्याहि द्वारानें साध्य होण्यासारख्या नाहींत. हिंदुस्थानांतील कोणताहि धर्म असो तो धार्मिक शिक्षण देण्यासंबंधानें जगाला वंद्यच दिसेल प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या धर्माचें जर योग्य शिक्षण मिळेल तर त्याला आपल्या धर्माचा अभिमान वाटेल, इतकेंच नाहीं, पण त्याच्या मनांत इतर धर्माविषयींहि पूज्यभाव उत्पन्न होईल. स्वधर्माचा खरा अभिमान आणि परधर्मा विषयीं पूज्यभाव ह्या दोन्ही जेथें एकत्र नांदतात तेथेंच आह्मी खरें धार्मिक शिक्षण मिळालें आहे असें समजूं. शाळागृहांतून धर्म शिक्षणाचा दरवाजा खुला केला पाहिजे आणि ही गोष्ट सिद्धीस नेण्यासाठीं सरकारी तटस्थ वृत्ती उपयोगाची नाहीं. खानगी शाळांचें जर कांहीं विशिष्ट कर्तव्य असेल तर तें धार्मिक शिक्षणासंबंधानेंच आहे असें आह्मी ह्मणतों.

---

## वऱ्हाड वृत्त

हवामान— या सप्तकांत पराकाष्टेचा उष्मा झाल्या नंतर आकाशांत ढग वारंवार जमत व वारा सोसाट्याचा सुटे आणि गेल्या शुक्रवारीं वर पुष्कळ ठिकाणीं पाऊसही झाला. हेंत हा मध्यंतरी गारवा आला खरा पण काल पासून उष्णतेचें मान पुनः प्रखर होऊं लागलें आहे. रोगराई कांहीं नाहीं. जनावरांच्या चाऱ्याची महगता फार आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार अ. कमिशनर, सुपरिंटेंडेंट रेसिडेन्सी बझार हैदराबाद हे हल्लीं रजेवर पुण्यास आहेत. यांस रेसिडेन्सीच्या आमल्यांतून काढून चीफ कमिशनर मध्यप्रांत यांच्या तैनातीस दिल्या अन्वयें रजा संपतांच त्यांची नेमणूक या प्रांतांत करण्यांत येईल.

यंदाच्या कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. च्या परीक्षेस बसलेल्या वऱ्हाडांतील विद्यार्थ्यांपैकीं रा. रा. माधव गोपाळ शिरसाळकर हे पसार झाले.

राव बहादूर नव गोपाळ सरकार ए० अ० कमिशनर यवतमाळ यांची बदली इंडिया गव्हर्नमेंटच्या फॉरेन आफिस मध्यें करण्यांत आली आहे.

पुढील महिन्याच्या अखेरीला रा. रा. हेअर साहेब कमिशनर हे पेनशन घेऊन गेल्या नंतर कर्नल वोरन हेस्टिंग्ज डेपुटी कमिशनर, एलिचपूर यांस कमिशनराच्या जागेची बढती देण्यांत येईल.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ९४ | मवस ७६॥ |
| गहू काठे ८० | बनशी ९९ |
| सरकी | ६ |
| मीठ | ३।= रु. मण |
| चणे | २॥।= रु. मण |
| तूप | ९॥। रु. मण |
| तेल | ४। रु. मण. |
| रुई जीन | ८१ |
| कापूस | ६०–६९ |

---

## नोटीस.

बेशमी (१) नारायण वल्लद खंडू सावळे राहणार शहापूर तालुका खामगांव आणि (२) कमरुद्दीन वल्लद निजामुद्दीन राहणार राहणार वाहळे खुर्द तालुका खामगांव. यांसः—

खाली सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं आमचे मालकीची दोन शेतें ह्मणजे शहापूर येथील सर्वे नंबर ९१ पैकी आणि देऊळखेडे येथील सर्वे नंबर ४० हीं दोन शेते १३१३ फसलीं साली तुह्मा कडे बटाईनें होतीं. बटाईचा माल तुह्मी कसा बसा दिला आहे. फसली १३१४ सालासाठीं सदर्हू शेतें तुह्माकडे वहितीला देणें नाहींत. तुह्मी आमच्या त्या शेतांत जाऊं नये. मी शेतें घरींच वाहणार आहे. तुह्मी दांडगाईनें माझ्या वहितीला व उपभोगाला हरकत केल्यास कोर्ट मार्फत शेतांचा ताबा घेई पर्यंत या नोटिशीचा खर्च आणि इतर नुकसानी तुह्मास द्यावी लागेल. या शिवाय १३१४ फसलीच्या पिकाबद्दल तुह्माला ६०० पांचशे रुपये द्यावे लागतील. ही नोटीस पोचतांच आठ दिवसांत शेतें आमच्या स्वधिन करावीं. कळावें. २८ मे १९०४ इसवी.

सही

देवराव उमाकांत मुंगी राहणार

शहापूर दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

बेशमी यमी मर्दे रामजी पाटील राहणार नांदुरा खुर्द परगणे लांजोड तालुका मलकापूर यांस—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं माझा बाप नामे रामजी वल्लद येडू पाटील यांनीं तुला गंधर्वाची बायको केली पण गंधर्व लागल्यापासून तूं मुळींच त्याचेपाशीं राहिलीच नाहींस आणि त्याचे मांदगीच्या वेळीं व मरणाच्या वेळीं देखील तूं आली नाहींस. तो मेल्यावर त्याची जिनगी माझ्या आईनें आटोपली तेव्हां तूं माझ्या आईशीं करार करून कृष्णा भारंड्या याच्या शेती नजिकचें शेत जन्मभर पर्यंत खाण्यासाठीं ह्मणून घेतलेंस आणि तेव्हांपासून तूंच त्याचा उपभोग घेत आलीस. तें शेत मेरपर्यंत खाण्यासाठीं फक्त तूं घेतलेंस आणि बाकीच्या सर्व जिनगीवरील आपला वारशाचा हक्क सोडून दिलास. दीड वर्ष झालें माझी आईही मरण पावली. तिच्या नांवाची शेती सरकारांतून तुझ्या नांवें लागण्यांत आली. माझ्या आईच्या पश्चात दोन शेतें खामगांव सडकेचीं माझ्याकडे आली आणि त्यांचा भोगवटा मीच घेत आहे. बागाचा जो नंबर राहिला त्यांत रंगारी लोकांचीं घरें आहेत. घरांत मीच राहते. बागाचा शेत सारा मीच देत असते.

खामगांव वाटेची दोन शेतें, बागाचा नंबर व राहतें घर ही जिनगी तुला विकण्याचा किंवा गहाण देण्याचा अधिकार नाहीं. असें असून तूं कांहीं लबाड लोकांच्या सांगासांगी वरून ह्या जिनगीचें गहाणखत २०० रुपयांचें लक्ष्मण वल्लद नारायण पाटील राहणार नांद्रिखुर्द याच्या नांवानें करून दिले आहेस असें कळते, हा व्यवहार करण्याचें कारण कांहींच नव्हतें. विनाकारण मला त्रासविण्यासाठीं हा व्यवहार केला आहेस. तो बेकायदा असून रद्द आहे. गहाणाचा बोजा जिनगीवर पडूं शकत नाहीं. सदर्हू जिनगी संबंधानें कोणी देवघेव करूं नये कां कीं जो व्यहार करील तो फसेल व त्यांच्या पैशाची जोखीम तुला भरावी लागेल. बागाच्या नंबरा बद्दल तुला कंपेनसेशन भरण्याचें कारण नव्हते. तरी तू वृथा पुढाकार घेऊन रिकामी उठाठेव केलीस. कळावें. तारीख २८ मे १९०४ इ०

सही

साती मर्दे नथू सुपे

राहणार नांदुरा खुर्द

निशाणी

---

## वर्तमानसार

**ख्रिस्ती लोकांची लुच्चेगिरी**– प्रांतीन, परिपूरित असा जो ख्रिस्ती धर्म त्या धर्माचे मिशनरी प्रथम पुढें पाठवावयाचे, आणि त्यांनीं पुढें जाऊन तयारी केली ह्मणजे तेथील नेटिव लोकांशीं कांहीं तरी भांडण उकरून कादावयाचें, आणि त्यासाठीं भांडतां भांडतां नेटिव लोकांचा मुलूख गट्ट करून टाकावयाचा, हें ख्रिस्ती लोकांच्या राज्य मिळविण्याच्या सगळ्या लुच्चेगिऱ्यांचें सार स्पेन्सर साहेबांनीं काढलेलें आहे.

**स्वातंत्र्याची महती**–आपलें स्वातंत्र्य जाण्याची वेळ आली असतां कोणत्याही देशांतील लोकांनीं हलगरजीपणा दाखवितां कामा नये. आपल्या देशाचें स्वातंत्र्य जिवंत राखण्याकरितां प्रत्येकानें मरण्यालाही तयार झालें पाहिजे. स्वातंत्र्य हा प्रत्येक देशाचा पहिला देव होय, आणि अतिशय पुरातन धर्म होय. स्वातंत्र्य हा प्रत्येक देशाच्या हक्कांतील पहिला हक्क होय, आणि स्वातंत्र्य हें प्रत्येक देशांतील लोकांना देवानें दिलेलें धर्मपुस्तक होय. याच्या वांचून राष्ट्ररूपी शरीरामध्यें प्राण नाहीं आणि याच्यावांचून राष्ट्राच्या ललाटभागाला शोभा नाहीं.

**फुकट पत्र देण्याचा विचार**–अमेरिकन् वर्तमानपत्रें फारच मोठी निघून फार स्वस्त असतात तरी तेवढ्यानें अमेरिकेच्या लोकांचें समाधान झालेलें नसून, आतां वर्तमान पत्रांनीं आपला सर्व खर्च जाहिरातीवर भागवून आपलीं वर्तमानपत्रें सर्वांना फुकट द्यावीं अशी व्यवस्था करण्याचा विचार त्या लोकांनीं चालविला आहे.

**पोरखेळ भोंवला**– जरसी येथें नुकतीच पुढील मजेदार गोष्ट घडून आली. तेथील आठ तरुण मुली व आठ तरुण मुलगे अशी एकत्र लग्नाचा खेळ खेळत होती. त्या खेळांत त्या आठी मुलींनीं थट्टेनें आपलीं लग्नें आठ मुलांबरोबर एका गृहस्था मार्फत शास्त्रोक्त विधिपूर्वक लावून घेतलीं. मागाऊन लग्न लावणारा गृहस्थ खरोखरच पाद्री उपाध्या असल्याचें आढळून आलें व तीं लग्नें त्यानें लाविलेलीं असल्यामुळें कायदेशीर खरीं ठरलीं. त्या मुळें हीं लग्नें खोटीं कशीं ठरवावीं त्या संबंधानें हीं आठ जोडपीं वकिलाचा सल्ला घेत आहेत.

**अत्यंत खुजें जोडपें**—चिकुवा नामक राजकुमारी २३ वर्षांची असून तिची उंची बुटासह दोन फूट चार इंच आहे. तिचें वजन एकोणीस पौंड ह्मणजे ९। शेर आहे. तिचा लग्न करण्याचा विचार पक्का झाल्यामुळें तिजकरितां तिच्या सारखे खुजे नवर देवांचा शोध चालला. शोध करितां करितां दोन इसम सांपडले आहेत. एक आगस्ट नांवाचा फ्रेंच गृहस्थ असून त्याची उंची ३॥ फूट आहे. दुसरा डेल्फिन नामक जर्मन गृहस्थ आहे. त्याची उंची २ फूट ७ इंच आहे. राजकन्येला जर्मन गृहस्थ पसंत पडून आतां लवकरच विवाह समारंभ मोठ्या थाटानें होणार आहे. अशा जोडप्याची संतती बहुतेक बोटा एवढीच होईल.

**दारू वेड लाविते**— अति मद्यपानानें मनुष्यें वेडी होतात, ही गोष्ट अनेक डाक्टरांनीं पुराव्यानें सिद्ध करून दाखविलेली आहे. हल्लीं राबर्ट जोन्स नामक विलायतेंतील वेड्याच्या हॉस्पिटलावरील डाक्टरांनीं स्वानुभवामुळें असें प्रसिद्ध केलें आहे कीं विलायतेंतील दवाखान्यांत प्रस्तुत १ लक्ष १६ हजार वेडे आहेत; त्यां पैकीं १७ हजार वेडे दारूमुळें डोकें फिरलेले आहेत!

**भिकाऱ्यांवर कर**– स्पेन देशांतील कित्येक शहरांत भिक्षेकऱ्यांस म्युनिसिपालिटीकडून परवाने काढावे लागतात. व त्यांच्या उत्पन्नावर म्युनिसिपालिटी कर घेतात.

**वधुवरांची चैन**—जर्मनीमधील कित्येक भागांत लग्नामध्यें होणाऱ्या मेजवानीचा खर्च लग्नाकरितां जमलेल्या पाहुणे मंडळीनें वधुवरांस देण्याची चाल आहे. हा खर्च पुष्कळच उंची तऱ्हेचा देण्यांत येतो, त्यामुळें वधुवरांस चांगलीच किफायत होऊन त्यांच्या पुढील संसारास पैशाची ददात पडत नाहीं. आपल्याकडेहि अशीच चाल पडेल तर चांगलें होईल, नाहीं!

**हवा, पाणी व झोंप यांची महती**— हवेच्या अभावीं पांच मिनिटांत, पाण्याच्या अभावीं एक आठवड्यांत व झोंपेच्या अभावीं दहा दिवसांत बहुतकरून मनुष्यप्राणी मरतो असा साधारण नियम आहे.

**मातीचे तेलापासून हानि**—एंरडोल येथें एका माळ्याची मुलगी घासलेट दिव्याची चिमणी विझविण्यास गेली तों धक्क्यानें चिमणी खालीं पडली व तिनें पेट घेतला त्यासरसी मुलीचा परकर पेटला मुलगी भीतीनें पळत. आई जवळ गेली तों आईचेंही लुगडें पटलें, या मुळें अखेर दोघी ४।५ तासांच्या आंत मरण पावल्या. घासलेट वापरणारांनीं अवश्य लक्ष द्यावें.

**नवी युक्ती**–प्रेताला रुप्याच्या रसानें मढवून मनुष्याचा पुतळा बनविण्याची युक्ती एका जर्मन शोधकानें काढिली आहे.

**संमतीनें मृत्यु**— ही चाल बेहरिंग समुद्रांतील बेटांतील लोकांत आहे. कोणीही स्त्री किंवा पुरुष ह्मातारा झाला, ह्मणजे तीं आपल्या सर्व इष्टमित्रांस बोलावून त्यांना मेजवानी देतात, आणि आपली सर्व इस्टेट मनास वाटेल त्यांना देऊन टाकतात. नंतर एका दोराचा फांस करून तो आपल्या गळ्यांत घालतात; नंतर ज्यांना ज्यांना इस्टेटीचा भाग मिळाला असेल, ते ती दोरी ओढून त्यांच्या गळ्यास फांस लावतात, व त्यांना या जगांतील यातनांतून सोडवितात.

**रागावणारीं झाडें**— पूर्वीय प्रदेशांत अकेशियाचे जातीचीं एक प्रकारचीं झाडें आहेत. रोज सूर्यास्ताचे वेळीं या झाडांच्या पानाच्या गुरळ्या बनतात आणि लहान लहान फांद्या वळून त्यांच्या वेण्या बनतात. अशा प्रकारें तीं स्थिर झालीं असतां त्यांना कोणी स्पर्श केल्यास तीं जणूं काय रागावल्याप्रमाणें फडफडतात आणि जों जों त्यांच्या पानांना जास्त जास्त डिवचावें तों तों तीं रागानें क्षुब्ध झालेल्या मनुष्याप्रमाणें जास्त जास्त कांपूं लागतात. आणि शेवटीं तीं इतकीं चिडल्यासारखीं होतात कीं, तीं एक प्रकारचा विषारी दुर्गंध सोडतात. तो इतका घातुक असतो कीं, त्यानें तात्काल डोकें दुखूं लागतें. या वरून त्यांना "रागावणारीं झाडें" असें नांव पडलें आहे.

**बिचारी दीन गाय**— प्रजा ही काय अगदीं गाई प्रमाणेंच असते. एका धन्यानें सोडून दिल्यावर दुसरा धनी बांधी पर्यंत काय धडपड करील तेवढीच.

**बायका विकत मिळतात**– आफ्रिकेंत बायका फारच स्वस्त किंमतींत मिळतात. डोक्यांत खोवण्याच्या टांचण्यांची दोन पुडकीं घेऊन कधीं कधीं आपल्या बायका दुसऱ्यांना विकणारे दानशूर पतिराज तिकडे आढळतात.

**मुलांचें नामाभिधान**—जपानी लोक आपल्या मुलींना फुलांचीं नांवें ठेवितात. चिनी लोक मुलींचीं नांवें 'नंबर एक, नंबर दोन, नंबर तीन' अशीं ठेवतात. आयर्लंड देशांतील लोकांत आपल्या मुलांनां नांवें ठेवण्याचे वेळीं आपल्या गत वाडवडिलांचीं नांवें ठेवणें अशुभ समजतात. चिनी लोकांत मुलांचीं नांवें वीस वर्षांपर्यंत निराळीं असतात. मुलगा वीस वर्षांचा झाला ह्मणजे त्याचा बाप आपल्या इच्छेस येईल तें त्याचें नांव ठेवित असतो. हिंदु लोकांत देवदेवतांचीं नांवें मुलामुलींस देतात.

**शुभ केशवपन**–मुलूख डॅलमेशील लोकांत नवरीने विवाहप्रसंगीं आपल्या शिरोभूषणाला केशपाशाला–बहुतेक रजाच दिली पाहिजे! नाहीं ह्मणायला सुमारें एक बोटभर जेमतेम ठेवून बाकीचे सर्व केश भादरून टाकतात! आपल्यांत तर केशवपन अशुभ समजतात. देशांतरांचे रीतिरिवाज गमती गमतीचे असतात.

**वधूस स्वयंपाक आला च पाहिजे**— सैबेरिअन लोकांत नवरीनें पतिगृहीं प्रवेश करतेवेळीं भोजनास अत्यावश्यक असे स्वतः तयार केलेले पदार्थ ताटांत घालून तें ताट पतिगृहीं नेलें पाहिजे व त्यांत–पाकशास्त्रांत– तिची कुशाग्रता दिसून आली पाहिजे.

### आजाऱ्यांच्या भेटीस जाणारांना सूचना–

१. रोग्याला त्रास होणार नाहीं व तुमच्या आगमनाचा कांहीं तरी फायदाच होईल अशी पक्की खात्री असेल तरच त्याच्या खोलींत जा. नसल्यास दरवाजांतूनच रोग्याचा कुशलसमाचार घेऊन मार्गे फिरा.

२ खोलींत जाणेंच असेल तर तेथें फार वेळ रेंगाळत राहूं नका, लवकर आणि गुपचूप रीतीनें परत फिरा.

३ खोलींत प्रफुल्ल मुद्रेनें जा. प्रिय आणि उत्साहजनक भाषण करा.

४ परंतु तसें भाषण करतांना खोटें मात्र बोलूं नका.

५ तुमच्या मित्राचें दुखणें कठीण असेल तर बळेंच आनंदी मुद्रा करितांना आणि उत्साहजनक भाषण करितांना आपल्या मुद्रेवर उदासीनतेची व गंभीरतेचा झांक येऊं देऊं नका. त्याच प्रमाणें असंबद्ध भाषणही टाळण्याचा प्रयत्न करा.

६ आजाऱ्याला बोलावें लागेल अशा प्रकारचे प्रश्न मुळींच करूं नका.

७ बोलतांना दुसऱ्याच कसल्यातरी गोष्टी बोला. आजाऱ्याच्या दुखण्या विषयीं फारच थोडें बोला. तो विषयच मुळीं टाळला तर फार उत्तम.

८ आजाऱ्यांच्या भेटीस जातांना त्याला प्रिय, हितकर आणि पथ्यकर होणारी अशी एखादी वस्तु बरोबर न्या.

**किती हिंदु बाटले पहा**– गुजराथेंत खेडा जिल्ह्यांत, अहमदनगर, केडगांव व कोल्हापूर या ठिकाणीं बाटलेले लोक, गेल्या दुष्काळांत फारच झालेले आहेत. हीं बहुतेक बाटलेलीं माणसें १० पासून १५ वर्षांपर्यंतचीं मुलें आहेत. मिशनरींच्या उद्योगामुळें, द्रव्या मुळें, व कार्यपटुत्वामुळें व कांहीं अंशीं हिंदु समाजाच्या गरिबीमुळें, अनास्थेमुळें व गैरमाहितीमुळें इतकीं माणसें परधर्मास बळी पडलीं आहेत. हीं बहुतेक कमी मानलेल्या जातींचीं आहेत हें खरें; पण ह्यांच्यांत उच्च वर्णाचीं ब्राह्मणाचीं माणसें नाहींत असें कोणी समजूं नये. मुंबईत एका मिशनरीच्या कळपांत तर वाईकडच्या पांच ब्राह्मणांच्या बाया आहेत. अंगावर कांटा येतो!

**फोटोग्राफरची युक्ती**– राशियन फोटोग्राफर बुढ्या कुळांचे फोटो आपल्या स्टुडियोच्या दरवाज्यावर उलटे टांगून ठेवतात. इकडील फोटोग्राफरनीं हवा असल्यास या युक्तीचा उपयोग करावा. ह्मणजे बुढवी कुळें लोक लज्जेनें तरी पैसे देऊन टाकतील.

**बहिरी ससाण्याची पलटण**– रशियन सैन्यामध्यें बातमी पोंचविण्याच्या कामीं बहिरी ससाण्यांची फलटण बनविली आहे. बातमी पोहोंचविणाऱ्या खबुतरांपेक्षां हे ससाणे सहा पट जास्त वेगानें काम करतात, असा अनुभव आला आहे.

---

### नोटीस.

मैनाई मर्द पुंजाजी माळी राहणार मुंढगांव इला आणि सर्वत्र लोक यांसः–

या जाहिर लेखानें कळविण्यांत येते कीं आमची चुलती मैनाई इला जन्मपर्यंत खाण्यासाठीं ह्मणून आह्मी मुंढगांव येथील सर्व्हे नंबर १२० पैकीं एकर २ गुंठे १८ आकार रुपये ६ आणि आढापूर येथील सर्व्हे नंबर ९ पैकीं एकर १ गुंठे ३१ आकार रुपये ४॥४ हीं दोन शेतें दिलीं आहेत. मालकी आमची असून त्या शेताचा उपभोग मात्र मरेपर्यंत मैनाई इनें घ्यावा असें ठरलें आहे. आह्मी असें पाहतो कीं मैनाई हीं शेतें फार कमी रकमेला लाऊन काढते. आतां ती जेवढ्या रकमेला लावून काढते तेवढ्या रकमेला आह्मीच ती शेतीं घरीं ठेवणार आहों. या बाईला फसवुन जर कोणी हीं शेतें गहाण खरेदी वगैरे घेईल तर तो व्यवहार इस्टेटी संबंधानें बातल व रद्द आहे. त्याची जोखीम शेतावर पडणार नाहीं आणि असा व्यवहार करून कोणी फसूं नये ह्मणून आह्मी हा जाहिर खबर दिली आहे. कळावें. तारीख २७ माहे मे सन १९०४ इसवी.

सही

मानाजी वल्लद नानजी माळी राहणार

बळेगांव तालुका आकोट निशाणी

खबर.